REGISTERED No.

वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत  रु० १
दर ओळीस.........रु१ रु६
दुसरे खेपेस.... .......रु१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII  AKOLA  MONDAY 1 FEBRUARY  1904  NO 5

वर्ष ३८  आकोला सोमवार तारीख १ माहे फेब्रुवारी सन १९०४ इ०  अंक ५

### विनंती

माझा मामे भाऊ चि० त्रिंबक नारायण पाध्ये ( उमर वर्ष ३४, रंग काळसर, उंची अजमासें ५ फुट ५ इंच ) हा सोमवार ता. १८।१।०४ पासून नाहींसा झाला आहे. सदर्हू इसम दिसण्यांत वेडसर दिसत असून अंगांत एक सदरा मात्र आहे. कोणा गृहस्थास सदर्हू इसमाचा पत्ता लागल्यास कृपा करून खालील पत्यावर कळवावें, ह्मणजे त्याला परत आणविण्याची तजवीज करण्यांत येईल. कळावें ता. २३।१।१९०४

विष्णु मोरेश्वर महाजनि
आकोला वऱ्हाड.

### शिवकल्याणांची रासपंचाध्यायीवरील विस्तृत ओवीबद्ध टीका

आजपर्यंत प्रसिद्ध न झालेला हा सुरस ग्रंथ जुन्या हस्तलिखित प्रतीवरून छापून काढण्याचा आमचा विचार आहे. ग्रंथ येत्या वर्ष प्रतिपदेस छपून तयार होईल. ग्रंथाची किंमत सारी १ रुपया आहे.

ग्रंथ सुमारें साडेचार हजार असल्यामुळें १ रुपया ह्मणजे अगदींच थोडी किंमत आहे. टाईप साधारण मोठा वापरूं. वर्गणी पाठविणें ती डा० दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर आकोला यांचेकडे पाठवावी. वर्गणीदारांचीं नांवें प्रसिद्ध केलीं जातील. पुस्तकाचें सर्व उत्पन्न दुसरे जुने ग्रंथ प्रसिद्ध करण्याकडे लावणार आहों. परमेश्वराची इच्छा असल्यास रक्कम हळूहळू वढत जाऊन पुष्कळ जुने ग्रंथ बाहेर निघतील. असो. सुज्ञास अधिक लिहून उपयोग नाहीं.

आकोला २६।१।१९०४ } गणेश बळवंत मोडक बी. ए. संपादक.

### नोटीस

बेशमी- - मंजाई मर्द सखाराम पाटील राहणार सिंदखेड ता० आकोला पोष्ट बारशीटाकळी यांस:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी साक्षांत चुलत आजी ह्मणजे माझे बापाची चुलती असून माझा चुलत आजा नामें सखाराम पाटील आतां नुकताच मरण पावला आहे. त्यामुळें वडिलोपार्जीत असलेला स्थावर माल सिंदखेड येथील शेत सर्व्हे नंबर ८९ यांतील ½ हिस्सा व राहतें घर असा तुझे ताब्यांत आला आहे. त्या पैकीं हल्लीं तूं वरील शेत विकण्यास तयार झाली आहेस. तरी सदर्हू शेत विकण्यास तुला अधिकार नाहीं. कळावें तारीख २८ माहे जानेवारी सन १९०४ इ०

सही
कृष्णाजी शिवराम पाटील राहणार
सिंदखेड दस्तुर खुद्द.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं आमची चुलत आजी नामें मंजाई मर्द सखाराम ही वडिलोपार्जित असलेला स्थावर माल शेत सर्व्हे नंबर ८९ तील ½ हिस्सा विकण्यास तयार झाली आहे. तरी सदर्हू शेत कोणी विकत घेऊं नये. कारण तिला तें विकण्याचा कोणतेही प्रकारचा हक्क नाहीं. कोणी विकत घेतलें असतां त्याचे रकमे बद्दल आह्मी जबाबदार नाहीं. ती खरेदी पोकळ व बातल होय. कळावें, तारीख २८।१।०४ इ०

सही
कृष्णाजी शिवराम पाटील राहणार
सिंदखेड दस्तुर खुद्द.

### वैश्य महासभा.

मागील अंकांत लिहिल्या प्रमाणें 'एकी' संबंधीं पहिला ठराव सर्वांच्या पसंतीनें पास झाल्या नंतर राजश्री बाबू राधा मोहनजी गोकुळ महोपदेशक यांनीं दुसरा ठराव सभेपुढें मांडला कीं, लोकांनीं आपल्या वाईट चालीरीती टाकून देऊन चांगल्या चालीरीतींचा प्रसार करावा आणि पैशाचा अपव्यय करूं नये. ह्या गोष्टीकडे अद्याप लोकांचें चांगलेंसें लक्ष्य गेलें नाहीं. जन्म, मृत्यु, विवाह वगैरे सारख्या प्रसंगीं अद्वातद्वा खर्च करणें बरें नाहीं. भुते, बकरे, आतषबाजी, बागबहारी, व देखावे यांत पैसा घालूं नये. तसेंच वारांगनांचे नाच तमाशे करणें, स्त्रियांनीं रस्त्यांत रुदन करणें, व अश्लील गाणीं गाणें चांगलें नाहीं. या पेक्षां देवभजनांत व सुश्राव्य व्याख्यानांत वाळ जाईल तर बरें होईल, जातीच्या वजनदार सभ्य गृहस्थांच्या पंचाईती नेमून त्यांच्या मता प्रमाणें ह्या बाबतींत सर्वांनीं वर्तनक्रम ठेवावा.

वरील ठरावा संबंधीं बाबूजींचें फारच उत्कृष्ठ व अस्खलित असें भाषण झालें. ते ह्मणाले कीं,— आपण जर परोपकार केला नाहीं, कोणावर दया केली नाहीं, किंवा आपल्या देवधर्मास विसरलों आणि आपलें कूळ व जात यांचा उद्धार केला नाहीं तर ह्या जगतीं आपलें जिणें व्यर्थ होय. फार दूर कशाला, आपण आपल्या ईश्वरापाशींच किती इमानदारीनें वागतो पहा! यज्ञादि कार्यांत होमहवना साठीं पाव शेराहून जास्त तूप कधींच आपल्या हातून खर्चवत नाहीं. पण तेंच आपण आपल्या प्रिय वारांगनेच्या नेत्रांना प्रसन्नकीं सव्वाशेर तूप जरूर देतो. ज्या लग्ना प्रीत्यर्थ आपण ५–७ लक्ष खर्च करितो त्यांत देवधर्माची अशी हेळसांड व्हावी काय! आपली ही वागणूक ईश्वरास संमत कशी असणार! हेंच आपल्या अधोपतनाचें कारण आहे. आपल्या जातींचीं मुलें, विधवा व गरीब लोक भुकेनें मरत आहेत. आपले लोक दुराचारी व दुष्ट झाले आहेत आपण आपला पैसा दुर्व्यसनांत व गैर गोष्टींत खर्च करीत आहोंत. तर हें सर्व आपण सोडून दिलें पाहिजे. आपण सत्पात्रींच दान धर्म केला पाहिजे. बुद्धिवानांच्या, विद्वानांच्या आणि सात्विक जनांच्या साहाय्यार्थ सढळ पैसा दिला पाहिजे. आपण आपल्या धर्मानें वागावें, यमनियमादि चांगलें कडकडीत पाळावेत आणि अंतःकरणांत सत्य, क्षमा, व दया यांस निरंतर ठेवावें.

नंतर राजश्री बाबू अवधबिहारीलाल सहारणपूर आणि राजश्री लाला शिवलाल पलवल ह्यांचीं अनुमोदनार भाषणें झालीं व दुसरा ठराव पसार झाला.

### स्त्री शिक्षण

तिसरा ठराव स्त्री शिक्षणा संबंधानें होता. हा राजश्री बाबू विश्वंभरनाथ रईस कानपूर ह्यांनीं सभे पुढें मांडला. तो असा — (१) ज्यांचा स्त्री शिक्षणासंबंधीं वाईट ग्रह झाला असेल त्यांचा तो दूर करावा. (२) स्त्रियांना शिक्षण असें दिलें जावें कीं जेणेंकरून त्यांना त्यांच्या योग्य धर्मकर्माची चांगली माहिती होईल, आणि आपल्या मुलाबाळांचें पालन पोषण व शिक्षण हीं कशीं करावींत हें त्यांस समजेल. (३) धर्म, नीति, स्वयंपाक, प्रपंच, मुलांचें संगोपन व शिक्षण या विषयावरील उत्तम पुस्तकें निवडून तीं आपल्या भाषेंत छापलीं जावींत. आणि अशीं पुस्तकें जे लोक तयार करून या महासभेकडे पाठवितील त्यास १०० रुपयापर्यंत बक्षीस दिलें जावें (४) स्कालरशिपफंड काढून त्यातून कांहीं मुलींना शिक्षण देण्या करितां शिकण्यासाठीं शाळेंत पाठवावें. (५) लोकल सभा व पंचायतींनीं शाळा वगैरे स्थापन करून मुलींच्या शिक्षणाची सोय करावी.

वरील ठरावावर बाबूजींचें संभाषण झालें कीं, स्त्री शिक्षणाची महती आतां सर्वांस चांगली कळूं लागली आहे. स्त्री शिक्षणा शिवाय गृहस्थाश्रमीचे व्यवहार सुरळीत चालूं शकत नाहींत. आपल्या स्त्रिया अशिक्षित आहेत हेंच आपल्या अवनतीचें एक मोठें कारण आहे. स्त्रियांना विद्या शिकविली पाहिजे. घरांत अंधेर असला तर घर त्याज्य होय, प्रथमारंभीं घरांतच विद्यादीप उजळत असला पाहिजे. विद्यादीपाच्या रम्य प्रकाशांत धर्म, कर्म, पातिव्रत्य, व प्रपंचांतलीं इतर कामें उत्कृष्ठ होतात. नाहीं तर घरांत भांडण तंटे माजून स्त्री पुरुषांच्या मनांतील एकमेकाबद्दलच्या विशद प्रेमाचा उज्वळ झरा वाळून जातो.

नंतर राजश्री बाबू अंबा प्रसाद मुख्तार मुरादाबाद यांनीं अनुमोदन देतांना सांगितलें कीं, मुलांच्या शिक्षणाची जितकी अवश्यकता आहे तितकीच मुलींच्या शिक्षणाची आहे. याची हेळसांड होतां कामा नये. शिक्षणाशिवाय स्त्रीच्या अंगीं सद्गुणांचा वास होणार नाहीं. पातिव्रत्य अंगीं बाणण्यास सद्विद्याच शिकली पाहिजे. लग्नाच्या वेळीं स्त्री पुरुष ज्या धर्म वचनांनीं आपणांस बांधून घेतात तीं वचनें त्यांस कळणें अत्यंत जरूर आहे. आणि ह्या सर्व गोष्टींच्या मुळाशीं स्त्रीशिक्षणच आहे.

वरील ठराव पास होऊन महासभेचें पहिल्या दिवसाचें काम आटोपलें.

( अपूर्ण )

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध १५ शके १८२५

### शेतीची उत्कृष्ट माहिती

सर्व हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रदेश शेतीवर कमी ज्यास्त प्रमाणानें अवलंबून राहत आहे, व शेतीवर गुजारा करणारांचें प्रमाणही आपले देशांत इतर ठिकाणांपेक्षां पुष्कळ पटीनें अधिक आहे, शिवाय लोकसंख्येचें प्रमाण दर दहा वर्षांत वाढतें असून जिच्यावर चरितार्थ चालवयाचा ती जमिन मर्यादित आहे व त्यापैकीं इतका कांहीं भाग वहिती खालीं आला आहे कीं आतां चांगली जमिन फारशी वहितीस मिळण्यास राहिली नसून, आहे तिजवर विकत घेणाऱ्या लोकांच्या उड्याच उड्या पडत आहेत व तीहि कांहीं दिवसांनीं मोकळी राहणार नाहीं अशा स्थितींत आहे. याच जमिनींतून देशस्थ लोकांपैकीं कोणावरही देशांतराची पाळी न आणितां पुरें इतकें अन्न कसें तयार करितां येईल हा प्रश्न प्रत्येकाच्या डोळ्यासमोर उभा राहतो व त्याला आणखी कांहीं काळगतीनें जास्तच महत्व येईल असें आतां वाटूं लागलें आहे.

प्रत्येक मनुष्याला शेतीच्या माहितीची अत्यंत अवश्यकता आहे असें जरी आहे तरी तिची

माहिती नसली तरी कांहीं अडत नाहीं, शेतांत धान्याची उत्पती व्हावयाची तितकीच होते असेंही ह्मणणारे पुष्कळ सांपडतील. शिवाय " उत्तम शेती, मध्यम व्यापार, व कनिष्ट चाकरी " या ह्मणी पैकीं उत्तमपणानें व कनिष्टपणानें आपाआपल्या जागेची आदलाबद्दल केल्यामुळें शेतीची शिक्षित वर्गाच्या लोकांकडून बरीच अवहेलना होत आहे, व पुष्कळांनां या व्यासंगाचा कमीपणाहि वाटतो. पण आपली एकटी जमीनच आपणांस आपल्या आपत्कालीं धीर देणारी आहे व ह्या जमिनीवरच आपल्या राष्ट्राचा पाया घातला आहे हें कोणाहि हिंदुस्थानच्या मनुष्यानें कधींहि विसरतां कामा नये.

आपण जें अन्न खातों, जे कपडे पांघरतों आणि मनुष्यास ज्या ज्या वस्तु उपयोगी पडतात त्यांपैकीं पुष्कळ प्राण्यापासून आणि वनस्पती पासून उत्पन्न झालेल्या असतात उदाहरणार्थ, तांदूळ, कापूस, आणि साखर हीं वनस्पतिज होत; आणि दूध, रेशीम, आणि मध हीं प्राणिज होत. प्राण्यांची उपजीविका वनस्पतींवरच होते. तेव्हां आपणांस लागणाऱ्या बहुतेक वस्तु प्रत्यक्ष अथवा पर्यायानें वनस्पती पासूनच मिळतात असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्मणून पीक चांगल्या रीतीनें यावें या करितां तें पीक ज्या जमिनीवर होतें त्या जमिनीची मशागत, नांगरणी वगैरे चांगली केली पाहिजे. कृषिकर्म अथवा शेतीभाती ह्मणजे जमिनीची मशागत करून पिकें काढणें असा अर्थ आहे खरा, तथापि या शद्बांत आपणांस लागणारे प्राणिज व वनस्पतिज पदार्थ उत्पन्न करण्या करितां जें जें करावें लागेल त्या सर्व गोष्टी येतात, व असाच अर्थ युरोपियन लोकांनीं घेतलेला आहे. तेव्हां शेतीभाती ह्मणजे जमिनींतून फक्त पिकें काढणें इतकाच अर्थ न घेतां पाळीव जनावरांची जोपासना करणें ह्याचाही पाश्चात्य लोक शेतीभातींत समावेश करितात. आणि ह्मणूनच त्यांनीं शेतींभाती हा शद्ब जरा व्यापक घेऊन त्याचे शेतकी व पशुपालन ( जनावरें पाळणें ) असें मुख्य विभाग केले आहेत. शेतीभातीस आपल्याकडे शेती, शेतकी व कृषिकर्म अशींही नांवें आहेत.

शेतीभाती—पिकें उत्पन्न करण्याकरितां आपणांस ज्या ज्या क्रिया कराव्या लागतात त्या सर्वांचा शेतीभातींत समावेश होत असून ह्या शिवाय मळे लावणें व बागाईत करणें हींही शेतकींतच मोडतात. फुलझाडें, शाकभाज्या, फळझाडें व इतर उपयुक्त वृक्ष ह्यांवर सतत देखरेख ठेवावी लागते ह्मणून ह्यांची लागवड लहानशा प्रमाणावर करितात त्यास बागाईत व बागाईत केलेल्या जागेस मळा ह्मणतात. मळ्यास मनुष्यापासून व रानटी जनावरां पासून उपद्रव होऊं नये ह्मणून कांट्याचें अथवा झाडाझुडुपांचें कुंपण लावावें लागतें. मळा एखाद्या मोठ्या शहराजवळ असला ह्मणजे त्याजपासून फार फायदा होतो; शिवाय कित्येक श्रीमंत लोक चैनी करितांहि बागबगीचे करितात.

पशूंच्या संगोपना संबंधानें जो भाग आहे त्यांत जनावरें, मेंढ्या, बकरीं हीं पाळणें, त्यांची काळजीपूर्वक व्यवस्था ठेवणें व त्यांची पैदास्त करणें ह्या गोष्टी धरल्या जातात- या धंद्यास विलायतेंत व मांसाहारी लोक ज्या इतर प्रदेशांत राहतात तेथें प्राधान्य दिलें जातें व अतिशय देखणीं व चांगलीं पोसलेलीं जनावरें प्रदर्शनांत आणून त्याजबद्दल मालकास इनामें दिलीं जातात. पशूसंगोपनाचा पोटविभाग दुभत्याचा कारखाना होय. पुरेशीं जनावरें ठेवून त्यापासून मिळणाऱ्या दुधदुभत्याच्या विक्रीपासून कमी फायदा होतो असें नाहीं. मांसाहारी लोक ज्या दृष्टीनें पशुसंगोपन करितात त्यापेक्षां दुधाचे कारखाने अथवा थढी ( डेअरी ) काढण्यासाठीं जनावरांची जोपासना करणें हें अधिक श्रेयस्कर आहे. शिवाय त्यापासून शेतीला जनावरें चांगलीं तयार होतात. पाश्चिमात्य राष्ट्रांत अशा कारखान्यांचा चांगलाच प्रसार आहे व ते लोक याकामीं लागणाऱ्या गाई व ह्मशी स्वतः पाळून त्यांच्या दुधाचें यांत्रिक रीतीनें तूप, चक्का, व लोणी असे निरनिराळे पदार्थ करितात. या कारखान्या बरोबरच कोंबडीं व बदकें ठेवणें फार सोईस्कर पडून त्यांच्या अंड्यांच्या व पिल्लांच्या विक्री पासून पुष्कळ फायदा होतो. आंबा, फणस, चिंच, नारळ, सुपारी यासारखे फळप्रद वृक्ष किंवा रस्त्यानें सावली साठीं उपयोगी पडणारे वड, लिंब या सारखे वृक्ष लावणें किंवा जंगल वाढविणें यांस वृक्षवर्धन असें ह्मणण्यास हरकत नाहीं व आपण वृक्ष लावून त्याचीं फळें आपण उपभोगीत बसणें यासारखा मनास आनंद दुसऱ्या कशानेंही होत नाहीं. कछीगल किंवा म्हैसूर संस्थानांत कित्येक टिकाणीं करितात त्या प्रमाणें रेशमी किड्यांच्या पोषणाकरितां तुतीच्या झाडांची लागवड करून रेशीम उत्पन्न करण्याकरितां रेशमी किड्यांचें संगोपन करणें; मध गोळा करितां यावा ह्मणून सुवासिक फुलझाडांचे ताटवे लावून मधमाशा पाळणें—मधुमक्षिका संवर्धन; या शिवाय तलावांत किंवा दुसऱ्या एखाद्या जलाशयांत मासे ठेवून व त्यांचें मत्स्याहारी प्राण्यांपासून रक्षण करून त्यांचें पालन करणें— मत्स्यपालन; व या शिवाय शेतीला लागून जितके धंदे असतील व जितके शेतकऱ्यास फायदेशीर व सोइस्कर रीतीनें चालवितां येतील तितक्या सर्वांचा शेतीभातींत समावेश करण्यास हरकत नाहीं.

शेतकरी व त्याचा उद्देश— ज्याचा धंदा शेतीचा असतो त्यास शेतकरी, कृषिकार, वहितदार व कोठें कोठें रयत अशी अनेक नांवें आहेत. प्रत्येक शेतकऱ्यानें ही गोष्ट मनांत ठेविली पाहिजे कीं, आपल्या जमिनी पासून अगदीं थोड्या खर्चांत, अल्प काळांत व जमिनीस कांहीं अपाय न होतां वनस्पतीज व प्राणिज माल पुष्कळ निघाला पाहिजे.

शेत व त्याची व्यवस्था— एका इसमा जवळ जितकी जागा असते तीस शेत अगर शेत ह्मणतात. एकाच इसमाजवळ पुष्कळ शेतें असून तीं सर्व एकमेकांला लागून असलीं तर फारच चांगलें. शेतकऱ्याचें घर शेताच्या जवळपास असलें ह्मणजे सोइस्कर असतें. कोंकणांतील खोत लोकां प्रमाणें अगर गुजराथेंत पुष्कळ ठिकाणीं वहिवाट आहे त्या प्रमाणें प्रत्येक शेतकरी आपल्या चाकर माणसांसह, गुरांकरितां छपरें, व मेंढ्या बकऱ्या करितां लहान लहान मेंढवाडे बांधून आपल्या शेतावरच राहील तर त्यापासून फार उपयोग होण्याचा संभव आहे. नाहीतर एका शेतीपासून दुसऱ्या शेतीवर व घरापासून दूरवरच्या शेताकडे जाण्यायेण्यांत रोज सकाळीं व संध्याकाळीं जाण्यायेण्यांत विनाकारण वेळ मोडतो. त्याचप्रमाणें शेतें एकमेकांपासून व घरापासून लांब असलीं ह्मणजे खत, शेतीचीं आउतें व इतर सामान शेतावर नेण्यास पुष्कळ त्रास पडतो. आणि शेतकरी खुद्द आपल्या शेतावरच राहत असला ह्मणजे त्यास आपलीं पिकें व गुरें राखण्यास फार सोपें जातें व गुरांनां सांसर्गिक रोग होऊं नये ह्मणून खबरदारी ठेवतां येते. शिवाय स्वच्छ हवेंत राहणें मालकासही सुखावह व आरोग्यकारक आहे. आपलें राहण्याचें घर व गुरांच्या पडाळी ह्या साधतील तितक्या शेताच्या मधोमध बांधाव्यात ह्मणजे चोहींकडे आपली नजर ठेवण्यास शेताच्या कोणत्याही भागाकडे खत वगैरे नेण्यास किंवा कोणीकडून ही माल मसाला घरीं आणण्यास सोपें जातें. आपल्या नोकर माणसांस व गुरा ढोरांस पिण्या करितां व आपल्या लहानशा बागबगीच्यास पुरण्यासारखी एखादी तरी विहीर असावी. घराच्या आसपास फळझाडें व आडजात लांकडाचीं झाडें लावलेलीं असावींत. त्याच प्रमाणें एकंदर जमीनी भोंवतीं मोठमोठ्या झाडांच्या रांगा असल्या ह्मणजे आपल्या पिकाचा व जनावराचा वाऱ्यापासून व रानटी जनावरां पासून बचाव होतो.

## जुनें स्त्रीशिक्षण

( पूर्वीची अविद्वान् पण सुशिक्षित स्त्री )

पूर्वीच्या काळीं आपल्या हिंदू स्त्रियांचें शिक्षण अगदीं निराळ्याच पद्धतीवर होत असें. आतां सारख्या त्या शाळेंत जाऊन पुस्तकें शिकत नसत किंवा मोठमोठ्या परीक्षांही देत नसत. आणि असें करण्याची त्या काळीं जरूरीही पण नव्हती. स्वतांस उत्तम पती मिळविण्यासाठीं त्यांस आपल्या कला कुसरींचें प्रदर्शन करावें लागत नसें. ती रीत बरी असो वा गैर असो, त्या वेळीं मुलीचे आईबाप किंवा इतर वडीलधारी माणसेंच तिजसाठीं वर शोधून तिचें पाणिग्रहण करून देत असत. स्वतां होऊन मुलगी कांहींच करीत नसे. तिच्या विवाहाची सर्व जबाबदारि घरच्या मंडळीवरच असे. आणि ह्मणून तिच्या विशेष गुणसंपन्नतेची मोठीशी किंमत नव्हती. तिच्या आयुष्यांतील मुख्य कर्तव्यकर्माची कक्षा अगदीं आंखूनच ठेविलेली होती. आणि हें कर्तव्य उत्कृष्ट तऱ्हेनें तिच्या हातून पार पडेल इतकें शिक्षण तिला मिळालें कीं पुरें असें. हें कर्तव्य ह्मणजे मातृपदाच्या जबाबदारीचें उच्च कर्तव्य होय. जोंपर्यंत तिचें पोरवय आहे तोंपर्यंत ती मातृगृहीं असो किंवा श्वशुरगृहीं असो, तिला वडील माणसांच्या हाताखालीं व नजरखालींच वागावें लागे व स्वतां सिद्धपणें ती कांहींच करूं शकत नसे. परंतु ह्या वयांत तिला पुढील मातृत्वाच्या कर्तव्यकर्माची थोडीशी ओळख होत असे आणि आपल्या स्वतांच्या मुलासंबंधीं, घरांतल्या लहान थोर मंडळी संबंधीं आणि तसेंच गांवांतल्या शेजाऱ्यां पाजाऱ्या संबंधीं आपल्या कर्तव्याचें तिला शिक्षण मिळें. हल्लीं प्रमाणें शाळेंतलें पुस्तकी शिक्षण, आणि पाश्चिमात्य समाजांतल्या स्त्रियांची गुणसंपन्नता ह्मणजे गाणें, वजावणें, चित्रें काढणें इत्यादि अनेक कुसरीचें शिक्षण हीं त्या काळच्या हिंदु स्त्रियांना नसत.

परंतु तिच्या शिक्षणाचा पहिलाच धडा आत्मसंयमनाचा होता. कारण आईचें खरें खरें ममत्व ह्मटलें ह्मणजे स्व स्वरूपाची ओळखच विसरून जाऊन मुलाकडे तन्मय वृत्ती होणें होय. आणि अलीकडील शहाणे लोक ह्यास किती हि वेडेपणाचें ह्मणून झिटकारून देवोत, पण ही गोष्ट खरी कीं, आपल्या वृद्ध आजीच्या बरोबर देवपूजा मांडून आपल्या मंजुळ बोबड्या बोलांनीं जें मंत्रपठण तिचें होत असें तेंच प्रत्यक्ष तिचें मोठें थोरलें शिक्षण असे. हेच मंत्र तिजपुढें पातिव्रत्याचीं, परोपकाराचीं, निरपेक्ष बुद्धीचीं आणि सर्वांठायीं प्रेमभावाचीं सर्वोत्कृष्ट उच्च तत्त्वें मांडीत असत. हेच मंत्र सीता, सावित्री, द्रौपदी इत्यादि स्त्रियां सारख्या साध्वी, निष्पाप व पवित्र स्त्रियांनी, कीं ज्यांच्या नुसत्या नामस्मरणानेंहि सर्व आपत्ती दूरावतील, अशा थोर स्त्रियांचीं प्रत्यक्ष उदाहरणें दाखवीत असत. त्याचप्रमाणें पूर्वीच्या त्या भारतरामायणांतल्या गोड कथा व पुराणें हीं त्या मुलीचें मन ओढून घेत असत, आणि स्वार्थत्याग कसा करावा, आईचें ममत्व किती प्रेमळ असतें, व स्वप्राणापलीकडे आपल्या कर्तव्यास किती जागरूक असावें इत्यादि गोष्टी तिच्या अंतःकरणांत ठसवून देत असत. ह्यामुळें तिच्या डोळ्यापुढें स्त्रीत्वाच्या उच्च कल्पना, मातृत्वाची पवित्र थोरवी, व धैर्याची व प्रीतीची उदार तत्त्वें हीं नेहमींच खेळत असत. या प्रकारच्या नैतिक व मानसिक शिक्षणाला हें अमोलिक उत्तम शिक्षण नाहीं असें कोण ह्मणूं शकेल ?

त्या काळची हिंदु मुलगी अविद्वान् होती ह्मणजे पुष्कळच मुलींना लिहितां वाचतां येत नसे. तरी ती सुशिक्षित नव्हती असें ह्मणतां येणार नाहीं. कारण साध्वी स्त्रियांच्या चरित्रांतील सद्गुणांनीं तिचें कोंवळें मन ओतप्रोत भरलेलें हें राहत असें. आणि खरोखर आपला स्वभाव सद्गुणी व्हावा हेंच जर सुशिक्षिणाचें बीज असेल तर साध्वी स्त्रियांच्या चरित्रांचें शिक्षण हें मोठेंच उच्च व उदात्त शिक्षण होय. ह्या शिवाय घरांतल्या तिच्या आईच्या, आजीच्या व इतर वडील स्त्रियांच्या वर्तनाचा कित्ता हेंहि एक दररोजचें शिक्षण तिला मिळें. केवळ दुसऱ्याच्या सौख्यांत जिचें सौख्य, व जिचें सर्व आयुष्य परोपकारांतच वेंचिलें गाई अशी तिची आई किंवा आजी ह्मणजे तिनें कथापुराणांत ऐकिलेल्या स्त्रियांची सगुण मूर्तीच होय.

त्या वेळच्या मुलीला अलीकडच्या स्त्री प्रमाणें आपल्या पतीच्या मित्राला पेगचा ( दारूचा ) कप मोठ्या नाजूक मोहकपणानें देतां येत नसे. ती इतकी भोळी बापुडी असे कीं तिला नुसता नीट नेटका अंगपेहराव कसा करावा हेंहि समजत नसें. सौख्याची तिची कल्पना मोठीशी विस्तृत नव्हती. आरोग्यशास्त्राच्या ज्ञानाचा तिला गंधाहि नव्हता ह्मटल्या

चालेल. तिला पिआनो किंवा हारमोनियम मधून मधुर स्वरहि काढितां येत नव्हते. ह्या सर्व गोष्टी अगदीं खऱ्या. पण तिला एक गोष्ट-उत्कृष्ठच येत होती. स्वयंपाक शास्त्रांत तिचा हातखंडाच असे. इतकेंच नव्हे तर स्वतां पाकनिष्पत्ती करून दुसऱ्यास सुग्रास गोड भोजन देण्यांत तिला अनिवार हर्ष होई. ती आपल्या पतीला ईहलोकींचा देवच मानीत असे. तिचें सर्वस्व आयुष्यांतील सुखदुःख दुसऱ्याच्या सुखदुःखांत ओतलेलें असें. आपल्या प्राणप्रिय, पती बरोबर सती जाण्याचें तिचें धैर्यबल हें तर मानवी कल्पनेच्या बाहेरचें होतें. हें जें सर्व पूर्वींचें स्त्रीशिक्षण तेंच, ती अक्षरशत्रू होती तरी— तिला मोठमोठ्या थोर वीर पुरुषांस जन्म देण्यास समर्थ करी. तिनें ह्याच शिक्षणाच्या बाहुबलावर व बुद्धिप्रभावावर अशा पुष्कळ स्त्रियांना जन्म दिला आहे कीं, ज्या स्त्रियांनीं स्वतां संन्यस्त वृत्तीनें राहून इतक्या न्यायानें व चतुराईनें राज्यें मिळविलीं व तीं राखलीं कीं अलीकडील थोर मुत्सद्यांनींहि तोंडांत बोटेंच घालावींत.

## प्लेग

प्लेगाचें टाणें आतां आकोल्यास पक्कें बसलें आहे. दुःखांत समाधान इतकेंच कीं मृत्यूचें मान अजून एकेरी आंकड्यांतच आहे आणि कधीं कधीं दोन चार मृत्यू पर्यंतच मजल पोंचते. इतरत्र जो मृत्यूचा कल्लोळ उसळला होता तो कल्लोळ किंवा त्या या आपत्ती आमच्या जिल्ह्यांत व मुख्यत्वेंकरून आकोल्यास नाहींत हें आह्मी मोठें भाग्य समजतों. प्लेगानें दूषित झालेला भाग खालीं करविण्याचा जो क्रम चालला होता त्याचा सुखकर परिणाम असा घडला कीं प्लेगाला बळी पुष्कळसे लोक पडले नाहींत. ही गोष्ट कितीहि खरी असली तरी हेंहि आह्मांस कबूल केलें पाहिजे कीं प्लेगाचा उद्भवच नागपुराप्रमाणें किंवा उमरावतीप्रमाणें आकोल्यास कधींच झाला नाहीं.

## सरकारी सक्ती

प्लेगासंबंधानें सरकारचा बंदोबस्त मोठा कडक होता. हा कडकपणा इतका विकोपाला गेला कीं, आमच्या जिल्हा—सरकारला आपला अंमल लोक तोडतात असा संशय आला आणि त्या अंमलाची श्री गाजविण्या साठीं येथील पेठेंतील कांहीं गरीब लोकांस शिक्षाहि देण्यांत आल्या. प्लेगाचा रोगी मेला आणि ह्या बरोबर आसपासच्या घरवाल्यांनीं हुकुमा प्रमाणें घरें खालीं केलीं नाहींत ह्मणून त्यांस पंधरा पंधरा दिवसांची कैद सांगण्यांत आली. हायकोर्टापर्यंत कैदी लोकांनीं आपला हल कल्लोळ केला पण त्या श्रेष्ठ न्यायमूर्तींसहि तो निकाल तसाच पसंत पडला. न्यायदेवतेचा पुतळा असा दाखवितात कीं, दोन्ही डोळे बांधले आहेत आणि हातांत तराजू आहे. या पुतळ्याची यथार्थता आणि उघड्या डोळ्यावर झांकण घालण्याची तऱ्हा हीं यावेळीं चांगली प्रत्ययास आलीं.

सदरहू गोष्टींत सरकारी अतिक्रम मोठाच झाला. हा अतिक्रम कांहीं बागेदार लोकांनीं चीफ कमिशनरांच्या कानावर घातला. त्यावेळीं चीफ कमिशनर साहेब आकोल्यासच होते व लोकांच्या तारा त्यांच्या पुढें होत्या तरी त्यांची मुग्धता फार विस्मयकारक वाटली. लोक निराश झाले व आमच्या जिल्हा—सरकाराची बाजू अधिक जोरदार झाली.

## मुख्य धोरण

प्लेगासंबंधानें इंडिया सरकाराचे हुकूम असे सक्तीचे नाहींत. गेल्या सात आठ वर्षांच्या अनुभवानें सरकाराला कळून चुकलें कीं लोकांस घराबाहेर काढण्याची सक्ती करण्यामध्यें मोठासा लभ्यांश नाहीं. सरकारानें क्वारंटाईन वगैरे बंदोबस्त चालूं टेविला परंतु मुख्य धोरण असें ठेवण्यांत आलें कीं ज्याचा त्याला जीव प्यारा आहे व त्याचीं संकटें त्यालाच ठाऊक असतात. तेव्हां प्लेगाच्या वेळीं लोकांस त्यांच्या इच्छे विरुद्ध घरा बाहेर काढण्याचा दंगा माजवूं नये. स्थान त्यागाचा उपाय मात्र लोकांस नेहमीं सांगत असावा. या प्रमाणें सरकारानें उपदेशाचा कार्यभाग आपल्या माथीं घेतला व सक्तीचा भाग आपल्या बंदोबस्तांतून वर्ज्य केला ही गोष्ट चांगली झाली.

## ताजा हुकूम

इंडिया सरकारची ही रीत आमच्या स्थानिक सरकाराला शिरसावंद्यच होती तथापि आमच्या जिल्ह्यांत मोठी सक्ती होत असे. ती सक्ती यापुढें या जिल्ह्यांतही चालणार नाहीं असा हुकूम सुटला आहे असें कळतें. ज्याला वाटेल त्यानें गांवांत राहावें किंवा रानांत राहावें. ज्या गृहांत प्लेग होईल तें गृह सरकार शुद्ध करून देईल आणि लोकांनीं त्या शुद्ध केलेल्या गृहांत सुखानें वस्ती करावी. अशा प्रकारचा हुकूम नागपुराहून नवीनच आला आहे. ही गोष्ट फार उत्तम झाली आणि या पुढें आतां प्लेगा निमित्त कोणासहि जेलांत जाण्याची पाळी येणार नाहीं असा भरंवसा आहे.

लोकांस मात्र आह्मी पुनः पुनः सांगतों कीं, प्लेगाला औषध जर असेल तर तें स्थानत्यागच होय. ही औषधी सर्वत्रांस सांगण्यानें कर्तव्य सरकाराचें आहे आणि तें ते करीत आहेतच. शासनकर्तेपणा मात्र सरकारानें सोडला आहे; तथापि त्यांचा अमृततुल्य उपदेश लोकांनीं अवश्य ग्रहण करावा. आणि तसें करण्यांत व्यक्तिमात्राचें कल्याण असून सरकारालाही आपल्या श्रमाचें साफल्य वाटेल.

## काकतीर्थ

काकतीर्थ ह्मणजे घाणीची गर्ता होय. लाक्षणिक अर्थानें काकतीर्थ ह्मणजे सर्व घाणीच्या जागा असा बोध होतो. शहरांतील काकतीर्थांची व्यवस्था मुनसिपालिटीकडे असते, किंबहुना मुनसिपालिटीची मुख्य कार्यमाला ह्मटली ह्मणजे गांवांतील काकतीर्थांची शुद्धता करण्याची कामगिरी होय. हें कार्य दिसण्याला मोठें क्षुद्र दिसतें परंतु आमच्या शहरचे मोठमोठे लोक मुनसिपालिटींत असून ही त्यांच्या हातून तें नीट होत नाहींसें झालें आहे. आमच्या शहरची सफाई अलिकडे अगदीं शोचनीय आहे. सिव्हिल स्टेशनच्या अवलोकनानें कदाचित डोळे फसतील, परंतु गांवांतील व तसेंच इतर महल्ल्यांतील रस्ते पाहिले, गटारें पाहिलीं, कचऱ्याचीं व घाणीचीं स्थळें पाहिलीं ह्मणजे आमच्या ह्मणण्याची सत्यता कळून येईल. शहर सफाईचें काम फार दिरंगाईनें होतें आणि तें तर या प्लेगाच्या वेळीं फारच उत्तम व्हावयाला पाहिजे. असा अनिष्ट प्रकार आमच्या मुनसिपल सभासदांच्या दृष्टीला येत असावा अशी आमची समजूत आहे. पण कदाचित जर ते आपल्या राजहंसवृत्तीमुळें शहरच्या काकतीर्थांचें दर्शन घेत नसतील तर त्यांनीं सार्वजनिक उपकाराच्या महत्वाकडे दृष्टी पोंचवावी अशी आमची त्यांस प्रार्थना आहे. आणि या संबधानें पुनश्च उच्चार करण्याची वेळ ते येऊं देणार नाहींत अशी आशा आहे

## नवी रहाशत

वऱ्हाडसंयुक्त मध्यप्रांतासाठीं निराळाच कोर्ट आक्ट ह्मणून कायदा गेल्या २२ वे तारखेस व्हाइसरायच्या कौंसिलांत पसार झाला आहे. या कायद्यानें मध्यप्रांतांतील कोर्टांची रचना फारशी बदलणार नाहीं, परंतु वऱ्हाडांतील कोर्टांची बडामोड मात्र मोठीच होणार आहे. तूर्त या प्रांताचें जिल्हे किती होतील हें निश्चयानें कांहींच कळत नाहीं. हे जिल्हे पक्के ठरले, जिल्ह्यांतील तहशिली नियमित झाल्या, आणि प्रत्येक तहशिली खालीं देण्याच्या भागाची वाटणी झाली ह्मणजे या कायद्या अन्वयें चीफ कमिशनर साहेब वऱ्हाडच्या कोर्टांची रचना नवीन पायावर करितील. आतां हें खरें कीं नवी सुधारणा येत्या चार आठ महिन्यांतच अंमलांत येईल. सध्यांचे चीफ कमिशनर नामदार हिवेट हे मार्चच्या ३ ऱ्या सप्तकांत रजेवर जाणार आहेत आणि रजेवर जाण्या पूर्वींच ते वऱ्हाडच्या चालूं वाटाघाटीला कांहीं तरी प्रत्यक्ष स्वरूप देतील असा अंदाजा आहे.

नवीन व्यवस्थेच्या कोर्टांच्या संज्ञा देखाल कांहीं निराळ्या आहेत. मुख्य वरिष्ठ कोर्ट ह्मटलें ह्मणजे जुडिशिअल कमिशनरचे होय. दिवाणी व फौजदारी कार्यांचा अंतिम प्रांत येथें पुरा होईल. जुडिशिअल कमिशनर एक व दुसरे ॲडिशनल जुडिशिअल कमिशनर ह्मणून दोघे न्यायमूर्ती या श्रेष्ठ कोर्टाचें काम चालवितील. सगळ्यांत कनिष्ट दर्ज्याचें कोर्ट ह्मणजे मुनसफाचें होय व त्या कोर्टाकडे ५०० रुपये पर्यंत किंमतीचे दावे चालविण्याचा अधिकार राहील. त्याच्या वरची पायरी सबार्डिनेट जज्जाची असून अधिकार ५०० पुढील पण ५००० रुपये पर्यंतच्या किंमतीचे दावे चालविण्याचा राहील. प्रत्येक जिल्ह्याला एक जिल्हाकोर्ट राहील आणि तेथें पांच हजारावरील सर्व दावे चालतील. एक किंवा अनेक जिल्ह्यांना मिळून एक डिव्हिजनल कोर्ट स्थापण्यांत येईल. याला जिल्हाकोर्टाचे अधिकार असून त्याशिवाय डायव्होर्स आक्टाखालील अधिकार देण्यांत येतील.

अपिला संबंधानें योजना अगदींच नवीन होईल. मुनसफाच्या ठरावावर आणि १००० पर्यंतच्या दाव्यांतील सबॉर्डिनेट जज्याच्या ठरावावर अपील जिल्हा कोर्टाकडे चालेल. जिल्हा कोर्टाच्या ठरावावरील अपील डिव्हिजनल कोर्टाकडे होईल व एक हजारावरील पांच हजारापर्यंतच्या सबार्डिनेट जज्जाच्या ठरावा वरील अपील डिव्हीजनल कोर्टच चालवील. ५ हजारावरील अपिलें जुडिशिअल कमिशनराकडेच चालतील.

हल्लीं ५०० रुपया पर्यंतच्या दाव्यांस दोन अपिलांचा हक्क आहे तो या पुढें १००० पर्यंतच्या दाव्यांला मिळेल. हीं दोन्हीं अपिलें हायकोर्टा बाहेरच चालतील आणि १ हजारा पुढें पांच हजारा पर्यंतच्या दाव्यांस अपील एकच आहे पण तें देखील डिव्हिजनल कोर्टांत चालेल. पांच हजारा पुढील दाव्यांस मात्र हायकोर्टाची पायरी पाहावी लागेल. या रितीनें जुडिशिअल कमिशनरच्या कोर्टाचा संबंध तुटल्या सारखाच झाला आहे. पांच हजारावरील दावे फार थोडे असतात आणि त्यांच्या साठींच श्रेष्ठ कोर्ट पाहावें लागेल. किंबहुना पांच हजारापर्यंत श्रेष्ठ कोर्ट ह्मणजे डिव्हिजनल कोर्ट होय असाच सारांश निघतो. प्रत्येक तहाशिलीला मुनसफाचें कोर्ट ठेवण्याचा परिपाठ मध्यप्रांतांत आहे आणि तोच इकडे लागूं होईल तर पुष्कळच मोठा फरक होईल आणि लोकांचीही सोय मोठी होईल. पूर्व वऱ्हाडासाठीं उमरावतीस एक व पश्चिम वऱ्हाडच्या जिल्ह्यांसाठीं आकोल्यास एक अशीं दोन डिव्हिजनल कोर्टें स्थापित होण्याचा संभव आहे. हायकोर्ट नागपुरास जाईल असें ह्मणतात आणि असेंही लोकवार्ता सांगते कीं जिल्ह्यांची वर्गवारी होतांना वऱ्हाडाचा भाग व लगतचा मध्यप्रांताचा भाग यांची एकत्र मिलावट होणार आहे. सध्यां भावी गोष्टी विषयीं काल्पनिक नगरी उभारण्यांतच आमचे प्रांतिक लोक तल्लीन आहेत. कोणाची कल्पना कशा वस्तु प्रसवते हें पाहण्याची सध्यां मोठी मौज आहे.

निराश्रित—करजगांव, इलिचपूर हे दवऱ्यांतील सरबराईच्या त्रासासंबंधानें लिहितात तर त्या गोष्टीकडे अधिकारी योग्य लक्ष्य पुरवितील अशी आशा आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥८॥ |
| सोनें २४।= | | चांदी ७३ |
| जवारी ९२ | | कपस ८२ |
| गहू | | ७१ ते ९० |
| बाजरी | | ५५ |
| मीठ | ३॥।= | रु. मण |
| चणे | २॥। | रु. मण |
| तूप | ८॥ | रु. मण |
| तेल | ४॥। | रु. मण |
| रुई | | ८९ |
| कापूस | | ५९-५९॥ |

## वर्तमानसार

जयपुराहून एक गृहस्थ लिहितात कीं तेथें 'सूरजसप्तमी'चा समारंभ गेल्या सोमवारीं फार उत्कृष्ट झाला. या महोत्सवाला ६० हजार लोक जमले असावेत. सूर्यनारायणाचा रथ, हत्ती, घोडे इत्यादि चतुरंग सैन्य, संस्थानिक लवाजमा व नेटिव ऐश्वर्य हीं पाहून मनाला मोठा आल्हाद झाला. असा प्रसंग पाहावयाला मिळणें ह्मणजे मोठें भाग्य होय.

## भिक्षां देहि नको

हें कलियुग ह्मणजे शक्तियुगच होय. ज्याच्या मनगटांत कान पिळण्याचें सामर्थ्य असेल तो या कलियुगांतला राजा. हें शक्तियुग आहे, सामर्थ्ययुग आहे, शौर्य, पराक्रम, साहस, वीर्य या सर्वांचें हें युग आहे. हें युग 'द्या' आणि 'घ्या' चें नव्हें, 'आह्मांला एवढे हक्क द्या, ह्मणजे किनई आह्मी तुमचे आभार मानूं' असल्या भिक्षांदेहीचें हें युग नव्हे. छातीला हात लावून 'घेणार' ह्मणणाराचे हे दिवस आहेत. 'घेणार' याचा प्रतिध्वनि "देतों" असा होतो.

## मरून जगा

शूर लोक शौर्य गाजवून मरतात, परंतु त्यांची मर्दुमकी जिवंत राहते. ही जुलमी राजांच्या तडाक्यांतूनही जिवंत राहते, व कृतघ्न लोकांच्या हृदयांत देखील वदत जाते. ह्या मर्दुमकीला अग्नि जळूं शकत नाहीं व पाणी बुडवूं शकत नाहीं. या कीर्तीचा दुंदुभीरव जगाच्या अंतापर्यंत असाच ऐकूं येणार. हा यशोनाद प्रलयकाळच्या क्षुब्ध झालेल्या महासागरांच्या गर्जनेपर्यंत असाच घुमणार. ज्या महात्म्यांनीं अशी कीर्ति संपादन केली, तेच जगणार. ते जरी मेले तरी ते जीवंत आहेत. जीवनमय मृत्यु व मृत्युमय जीवन या दुकलींपैकीं यांनीं दुसरा मार्ग स्वीकारला.

## मृत्यु काय आहे ?

मृत्यु ही निद्रा आहे. ही महानिद्रा आहे. आनंदाचा महासागर व दुःखाचा विसर असा हा मृत्यु आहे; कर्तृत्ववान लोकांचा आश्रय व कीर्तीचे निवासस्थान आहे; शौर्यदेवतेचें मंदिर व मर्दुमकीचें स्मारक आहे; महर्षींचा आश्रम व राजर्षींची शाळा आहे. स्वर्गाच्या स्टेशनचें जंक्शन आहे आणि हा मोक्षमंदिराची पायरी आहे.

मृत्यु हा कर्तृत्ववान् लोकांना मृत्यु नव्हे; तें त्यांना जीवन होय. ते अशाश्वत सोडून शाश्वताला मिळालेले होत. येथून ते पतितांचा उद्धार करीत असतात. त्यांचीं भाषणें अशक्त मनगटांत जोर आणितात व नष्ट डोक्यांत बुद्धि घालतात. येथून ते मृत्युलोकच्या लढाया चालवितात व दुर्बळांना यश मिळवून देतात. त्यांच्या स्फूर्तीनें जुन्या बंदुकींत काडतुसें उत्पन्न होतात व जुन्या तोफांना दारूगोळा मिळतो. त्यांच्याच उत्तेजनानें गेलेलें परत मिळतें, व मिळालेलें राखतां येतें. असे ते साधु लोक मृत्युमय जीवन पसंत करतात. 'मृत्यु हाच तुमचा पाठींबा होय. जिवंत असून मेल्यासारखे राहू नका.' हा त्यांचा उपदेश सर्वजण ऐका.

**विलक्षण चमत्कार**— जावा हें एक दोन मैल परिघाचें लहानसें बेट आहे. त्या बेटाच्या आसपंतात हिरवें गार असें गवत आहे; परंतु त्याच्या मध्यभागीं अतिशय मृदु पण उष्ण असा चिखल एकसारखा खदखदत असून, उंसाच्या रसाच्या काहिलींत कढत असलेला रस ज्या प्रमाणें खालीं वर होत असतो व त्यास बुडबुडे येत असतात, त्या प्रमाणें या बेटांत त्या कढत चिखलाची सतत क्रिया चाललेली असते ! काहिलींत कढणाऱ्या रसाचे बुडबुडे फारसे मोठे नसतात; परंतु या नैसर्गिक काहिलींत कढणाऱ्या चिखलरूपी रसाचे बुडबुडे मोठाल्या पाहाडां प्रमाणें वर खालीं वर खालीं होत असतात ! शिवाय त्याच्या मध्यापासून कंठाकडल्या अंगास रसाच्या मळीप्रमाणें चिखलाची मळीही वर येऊन तिच्यांत बुडबुडे एकसारखे येत असतात. या अग्निसरोवराच्या किंवा अग्निद्वीपाच्या पश्चिम किनाऱ्यावर एक मोठा थोरला देवळाच्या शिखरा प्रमाणें दिसणारा व भाजून कठीण झालेला असा चिखलाचा सुळका आहे. या सुळक्यांतून स्वच्छ व अगदीं थंड असा पाण्याचा प्रवाह वाहत असतो, असें जावा येथील अधिकाऱ्यांच्या सांगण्यांत येतें. जेथें चिखल सुद्धां इतका अघोराव कढत असतो, तेथें एका बाजूनें चिखलाच्या सुळक्यांतूनच गार पाण्याचा लोंढा निघावा, हें किती विलक्षण आहे बरें ?

**विलक्षण खरी गोष्ट**— बडोदें येथील पांढरे नांवाच्या सरदार घराण्यांतील विठ्ठलराव राजे गृहस्थ १९ दिसाखालीं घोड्यावर बसून शहरांत फिरत असतां जेठालाल बापू ब्राह्मण नांवाचे एक गृहस्थ एक हुंडी पटावून तिचे ९८८ रु. थैलींत टाकून घेऊन जात आहे हें पाहून 'ती थैली इकडे आण' असें त्यांनीं त्या ब्राह्मणास सांगितलें. ब्राह्मण आणीत नाहींसें पाहिल्याबरोबर त्यांनीं आपली तलवार उपसली; त्याबरोबर त्या ब्राह्मणानें ती थैली एका ओळखीच्या दुकानावर टाकली व आपण पळत सुटला. पांढरे यांनीं थैली दुकानदाराजवळ मागितली. 'आपण पाहिजे तर उचलून न्या' असा जबाब मिळाल्यावरून त्यांनीं घोड्याखालीं उतरून थैली घेतली व पुन्हा घोड्यावर स्वार होऊन घेडा भरधांव फेंकीत घरीं निघून गेले व दारास कडी लावून आंत बसले. रीतीप्रमाणें त्यास पकडण्यांत आलें. ते ह्मणतात कीं— आमची आसामी कमी केली, यामुळें आमचे खाण्यापिण्याचे तसेंच वस्त्रप्रावरणाचे हाल होत आहेत. शिवाय श्री. छोटे महाराज साहेब यांचें लग्न असल्यानें दरबारांत चांगला सुंदर ड्रेस व सोनेरी कमरपट्टा वगैरे चढवून हजर राहण्याचा आपण हुकूम केला आहे; परंतु तो आणवयाचा कोठून? ही माझी दैनावस्था श्री. महाराजसाहेब यांचे कानावर जावी एवढ्याच करितां मी हा उपाय योजला आहे.

ते दारूच्या धुंदींत होते. त्यांचें वय ३५।४० असावें. अफूचेंही व्यसन यांस आहेच. पोरबाळ व बायको नाहीं. फक्त एक स्वयंपाकिण व दोनचार पहारेकरी नौकर आहेत, कांहीं दिवसांपूर्वीं हे एका स्त्रीबरोबर रहात होते ! इतक्या गोष्टी पैशाच्या खर्चास अनुकूळ असल्यावर पैसा पुरेल कसा !

**ही सुधारणा पसंत आहे काय ?**— मिसेस बेझंट यांनीं 'स्वधर्मे निधनं श्रेयः' या गीतावचनास न जुमानतां हिंदुधर्माची दीक्षा घेऊन येथें अवेळीं ज्यांची ओतप्रोत स्तुति करण्याचा क्रम धरिल्यापासून आमच्या धर्माभिमान्यांस आपल्या धर्माच्या संस्थापनेसाठीं ही एक नवीन विभूति या युगांत संभवली असें वाटूं लागलें आहे. त्या आनंदाच्या भरांत ही बाई परकीय, हिला हिंदु होतां येत नाहीं, हें हाडीं खिळलेलें तत्व देखील तें पार विसरून गेले आहेत. अशा रीतीनें परकीय धर्मांत प्रवेश व्हावा हें स्पष्ट आहे यांत संशय नाहीं, परंतु आपल्या धर्मांत जन्मून परधर्मांत गेलेल्यांचा देखील जो समाज संग्रह करीत नाहीं त्यांनींच या बाईच्या चरणीं लोटांगण घालावें व तिचे चरण वंदावे, हें आह्मांस विपरीत भासल्याशिवाय रहात नाहीं. सदर्हू बाईनीं आपल्या बनारस येथील सेंट्रल हिंदु कालेजांत विवाहित मुलांस घ्यावयाचें नाहीं असा ठराव केला आहे. याशिवाय या शाळेतील विद्यार्थ्यांत केवळ चारच जाती मानण्यांत याव्या असा कटाक्ष आहे. ब्राह्मणादि त्रैवर्णिकांस तेथें एकसारखेंच संध्या शिकवितात व त्यांना एका पंक्तीस भोजनास बसवितात अशी हकीकत कोणा एका 'पंडितानें' पायोनियर पत्रास कळविली आहे. अशा रीतीनें राजा राममोहनराय अथवा रानडे यांच्यानें झाली नाहीं अशी सुधारणा या पाश्चात्य बाईनें या देशांत येऊन केली या बद्दल तिचे उपकार मानले पाहिजेत. या बाई लवकरच स्त्रियांसाठीं एक कॉलेज काढणार आहेत. त्यांतही अशाच प्रकारची सुधारणा होईल अशी आशा आहे. हें सर्व ठीक आहे, पण ही सुधारणेची पद्धति राष्ट्रीयत्वाच्या धोरणावर आहे काय ?

मुबारक.

**कोण ही थंडी**—नेरप बाट व खालचें खोरें यामध्यें थंडी इतकी कडक आहे कीं, पारा शून्य अंशाचे खालीं १०।१२ अंश असतो अंगावरचे कपडे, टोप्या व बूट सुद्धां जाड लोकरीचे वापरावे लागतात. नाक व डोळे खेरीज करून शरीराचा कोणताही भाग केव्हांही उघडा टाकण्याची सोय नाहीं. असल्या कडक थंडीमध्यें आणखी तिखटच थंड वारा वाहत असतो. शिपायांना रात्रीं जमिनींत खड्डे खणून व आंत गवत पसरून त्यांत निजावें लागतें, तेव्हां कोठें थोडी थंडी राहते. छावणींतील दूध व शाई सुद्धां गोठून जात आहे.

**इंग्रज सरकारवर ताण**—गेल्या राष्ट्रीय सभेला म्हैसुराहून बरेच अधिकारी गेले होते; व बहुतेकांनीं तिकिटेंही काढलीं होतीं, पण आयत्या वेळेला, सभेला जाऊं नये, असा वरिष्ठाचा हुकूम आल्यामुळें त्यांस सभेस जातां आलें नाहीं असें ह्मणतात. ही इंग्रजसरकारावर आपल्या म्हैसूर दरबारनें ताण केली ह्मणावयाची !

**स्तुत्य धर्मकृत्य**— सरजमशेटजी जिजीभाई बॅरोनेट यांची मयत पत्नी बाई आवाबाई यांच्या वार्षिक तिथीबद्दल गेल्या तारीख ८ रोजीं त्यांची मुलगी पिरोजबाई यांनीं माथेरान येथें एक नावाजण्यासारखें धर्मकृत्य केल्याची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. या धर्मादायाची वर्दी आजूबाजूच्या गांवांतून अगाऊ मिळाल्यामुळें सुमारें १२०० पुरुष, १३०० बायका व १५०० मुलें याप्रमाणें एकंदर ४००० गरीब लोक त्या दिवशीं तेथें जमले होते. त्यावेळीं प्रत्येक पुरुषास एक कानपुरी घोंगडी, स्त्रीस लाल जॅकेट व लहान मुलास दोन दोन आणे याप्रमाणें धर्मादाय करण्यांत आला.

**सलामाचे शौकी**—बंगाल इलाख्यांतील कद्रान जिल्ह्याचे एक बंगाली डेप्युटी म्याजिस्ट्रेट्यास रस्त्यांतून जातांना आपल्यास लोकांनीं सलाम केलाच पाहिजे अशी फार घमेंड असे. त्यांच्याबरोबर नेहमीं एक कान्स्टेबल असे, तो जो कोणी म्याजिस्ट्रेट साहेबांस सलाम न करील त्यास त्यांच्या हुकुमावरून पकडीत असे. असा क्रम बरेच दिवस चालला असतां एक दिवस एका पहिलवानानें या म्याजिस्ट्रेट साहेबांची चांगली खोड मोडल्याबद्दलची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. या पहिलवानानें रस्त्यांत म्याजिस्ट्रेट साहेबांस सलाम न केल्यावरून, त्यांनीं आपल्या बरोबरच्या कॉन्स्टेबलास त्यास पकडण्याबद्दल हुकूम केला. कॉन्स्टेबलानें सांगितलें कीं, हा मनुष्य पहिलवान आहे व त्यास पकडण्याचा प्रयत्न केल्यास तो दंगा करील. त्यावर म्याजिस्ट्रेट साहेब स्वतः त्या पहिलवानापुढें गेले व त्यास विचारूं लागले कीं, तू मला सलाम कां केला नाहींस ! पहिलवानानें जबाब दिला, मी कशाकरितां सलाम करूं ! म्याजिस्ट्रेट— मी कोण आहे तें तुला माहित आहे ? मी डेप्युटी म्याजिस्ट्रेट आहे हें तुला माहित नाहीं काय ! पहिलवान— आपण डेप्युटी म्याजिस्ट्रेट असाल, पण मी आपल्यास सलाम कां ह्मणून करूं ! म्याजिस्ट्रेट——मी तुला घोड्याच्या चाबकाखालीं मार देईन. पहिलवान—मी आपल्यास व्याजासकट ही शिक्षा परत करीन. या प्रमाणें बाचाबाची होऊन शेवटीं हातघाईवर प्रकरण आलें. तेव्हां कॉन्स्टेबल यांनीं दोघांच्या मध्यें पडून तो तंटा मिटविला. अशा अरेरावी वर्तनाचे लोक नेटिवांत सुद्धां आढळूं लागले आहेत ही फार खेदाची गोष्ट होय. हा युरोपियन संसर्ग बाधला ह्मणावयाचा !

**मासले वाईक पोष्टवाला**— हुबळी येथील एका सार्टरवर त्याणें एक पत्राचें पुडकें तळ्यांत टाकिलें असा आरोप होता. त्यानें असा कबूली जबाब दिला कीं, आपल्याला काम अतिशय पडत असे. आपण आजारी होतों. रजेचा अर्ज केला होता पण रजा मिळाली नाहीं. तेव्हां कंटाळून आपण सदरचें पुडकें पाण्यांत टाकलें. माजिस्ट्रेट साहेबांनीं आरोपीस सोडून दिलें. पण पोस्टल अधिकाऱ्यांनीं पुढें तक्रार केल्यावरून त्या खटल्याची चौकशी होऊन त्यास सहा आठवड्याची साधी कैदेची शिक्षा सांगितली. त्यावेळीं आरोपीस काम फार होतें ह्मणजे सकाळचे ७ पासून संध्याकाळचे ८ वाजे पर्यंत काम फार असल्या मुळें व आरोपी आजारी असल्यामुळें ही चूक त्याचे हातून झाली, असा उल्लेख केला आहे. पुढें हायकोर्टाला अपील झालें व त्यांतही शिक्षा कायम झाली. पण इतके तास काम करून घेणें हा पोस्ट खात्याचा जुलूम नव्हे काय?

**राक्षसी शरीर** — पेर्लम शहरीं एक सहा वर्षांचा मुलगा इतका लठ्ठ व बळकट आहे कीं त्यास त्याचे वयाच्या मुलांच्या शाळेंत पाठविण्याचीही सोय नाहीं असा मेडिकल अधिकाऱ्यांचा अभिप्राय पडला आहे. हल्लींच या मुलाचें ४॥ मण वजन आहे. त्याची उंची सुमारें ४ फूट आहे व छातीची रुंदी ४४ इंच आहे! त्याच्या वयाच्या चांगल्या निरोगी अशा तीन चार मुलांची जागा त्यास एकट्यास लागते. तो मुलगा शरीरानें इतका सुदृढ असून त्याची बुद्धिमत्ता उत्तम प्रकारची आहे ! तो एका हातानें ५६ पौंडांचें ओझें उचलूं शकतो. त्या प्रांतांत जिकडे तिकडे या मुलाबद्दलच गोष्टी सुरूं असतात. शरीर इतकें अवाढव्य असून तो मुलगा फार चलाख पळतो; हा राक्षसी अंशच ह्मणावयाचा !

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दाताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान „ .... ·॥·




दांतावर जाळें जमणें, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट वाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग यापासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम॥

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड ॲण्ड कंम्पनी मथुरा.



## मुंबई बॅंकचीं सेव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट



## स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेंना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.



## जाहिरात

### कोडावर खात्रीचें औषध

हटकून गुण डबीस २ रुपये.

व्ही. एम. जोशी
पोलिस टाऊन नजीक उमरावती
प्रांत वऱ्हाड.



वाचा ! वाचा !

(मौजच मौज. हंसूंच हसूंच)

तुमचा वेळ आनंदात जावा अशी तुमची इच्छा आहे काय ?

असल्यास खालील पुस्तकें एकवार वाचाच.

मोठमोठ्यांचे अभिप्राय मिळालेले आहेत.

### नवीन तयार झालेली पुस्तकें.

बंधुप्रेम अथवा सुंदरराव हंबीरराव, किं० १॥ रु.

भगिनीप्रेम अथवा कामांध राजपुत्र. किं० १ रु०

दोन्ही एकदम घेणारास २ रुपयांत मिळतील. व्ही. पी. ट. ख. माफ.

वासुदेव जनार्दन लेले,
बुकसेलर—मिरज.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.


advance.
Single copy .......................... 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetitions Per line „ 2 as

# ...माचार.

SAMACHAR

FEBRUARY 1904 NO 6

...ाहे फेब्रुवारी सन १९०४ इ० अंक ६


अनमेळ विवाहाचा ४ था ठराव संभपुढे मांडला कीं:—

(१) ४० वर्षाच्या वयाच्या विधुरानें त्यास वारस नसेल आणि त्याची शरीरकाठी सदृढ असेल तरच दुसरें लग्न करावें; नाहींतर बिलकूल करूं नये. (२) मुली बदला रुपये देणें व घेणें बंद व्हावें व जे लोक रुपये देतील वा घेतील त्यांचा जाती बिरादरानीं तिरस्कार करावा व त्यांस कोणत्याहि कामांत सामील करूं नये. (३) आपल्या गरीब जातीवाल्याला, त्याच्या मुलीचे लग्नाकरितां पंचायतींतून मदत मिळावी. (४) एक स्त्री जिवंत असतां पुरुषानें दुसरी स्त्री करूं नये.

वरील नियमावर वक्त्यांचें गोड भाषण झालें व त्यानें श्रोतृजन तल्लीन करून सोडला. ते ह्मणाले कीं, विधवा स्त्रियांची जी मोठी संख्या आपणांस दृष्टीस पडते तिचें कारण विजोडलग्नें व बालविवाह होय. मुलीबद्दल रुपये देणें व घेणें हें फार निंद्य आहे. विकत घेतलेल्या मुलामुलीपासून जी संतती होते ती धर्म संततीची बरोबरी करणारी नसते. मुलामुलींचा क्रयविक्रय करणारे लोक ह्मणजे अती निर्दय होत; ते सर्पाप्रमाणें आपल्या मुलांना जीवें खातात असें ह्मणण्यास हरकत नाहीं. विजोड लग्नानीं नीतिभ्रष्टता वाढते हें सर्वांनीं लक्षांत घ्यावें.

## स्वदेशी वस्तु

वरील ठराव पास झाल्यावर राजश्री लाला गोविंदराम फोटोग्राफर रईस काशगंज यांनीं देशी कपडा वापरून आपल्या देशी उद्योगधंद्याची उन्नती करावी या संबंधाचा पांचवा ठराव पुढें मांडला. (१) जाइंट स्टाक कंपनीच्या धरतीवर एक कंपनी काढावी, पुष्कळसें भांडवल उभारावें. कार्यालयें (कारखाने) काढावेत, व मुलांना कामाचें शिक्षणही द्यावें. (२) होतां होईल तों आह्मी स्वदेशीच कपडा घेऊं व देशीच जिनसा वापरूं अशा शपथा लोकांच्याकडून घेववाव्यात. (३) व्यापार धंदा वाढण्यासाठीं लोकानीं नवीन नवीन युक्त्या सोसायटीला कळवीत जाव्या.

ह्या ठरावाच्या पुष्ट्यर्थ राजश्री बाबू राधा मोहनजींनीं मोठ्या प्रेमळपणानें जें भाषण केलें त्यांत त्यानीं एक विशिष्ट गोष्ट सांगितली कीं, उद्योगधंदा व व्यापार करणें ही गोष्ट निराळी व निवळ दलाली करणें निराळें. ह्या दोन्ही गोष्टींत फार मोठें अंतर आहे पण तें पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. जेव्हां एखादी वस्तु आपण आपल्या भाई पासून विकत घेतों व तीच आपण काहीं नफ्यानें दुसऱ्या भाईस विकतो, तेव्हां आपण निवळ दलालीच करितो; एकाच्या खिशांतून पैसा काढून दुसऱ्याच्या खिशांत टाकणें ह्मणजे खरा व्यापार नव्हे.

आपल्या देशांत लागणाऱ्या वस्तु आपणच उत्पन्न केल्या पाहिजेत व त्यांना अभिमान धरून आपण त्याजवरच आपल्या गरजा भागविल्या पाहिजेत. आपण जो धंदा करायाचा असेल तो सावधपणानें विचारपूर्वक करा.

पुष्कळ ठिकाणीं जेथें पूर्वी एक जीन व प्रेस होता तथें आतां त्याची नकल करून लोकानीं ८।८ १०।१० करून सोडले आहेत कीं, ज्याच्या योगानें सर्वच भुके मरायला लागले व मरत आहेत आपण दुसऱ्याची नक्कल करण्याची रीत सोडून दिली पाहिजे. नवीन नवीन धंद्यात पडण्याची हिंमत धरली पाहिजे व याचीच आज फार जरूरी आहे. सध्याच आपल्या जवळ मोठमोठीं यंत्रें चालविण्यास हिम्मत नाहीं व पैसा नाहीं, मोठमोठ्या कंपन्यांचे दिवाळें निघालेलें आपण पाहतो व आपल्यांत पैसेवाल्यांची संख्या कमी दिसत आहे व आपणांस तर आपल्या गरीब बांधवास उद्योगास लावून देशाची स्थिती सुधरायाची आहे.

आपल्यामध्यें हलवायाचे १० मुलगे एकच गांवांत त्याच धंद्यांत पडतात हा विचार करीत नाहींत कीं, ह्या गांवांत पूर्वीपेक्षां दहापट हलवायाचीं दुकानें वाढतील तर इतक्यांना गिऱ्हाईकें कोठून येतील ! अशा रीतीनें लोक एकाच तुकड्याकर कुत्र्यासारखे भांडण्यास तयार असतात. हें ठीक नाहीं.

शेंकडों तऱ्हेचीं खांडमिशनें आहेत, ज्यांची किंमत २० रुपया पासून ३०० रुपये पर्यंत आहे. जसें छत्री करण्याचा कारखाना ११०० रुपयाचें खांड मशीन मागविल्यानें व ५००० पांच हजारची रकम लावल्यानें फारच उत्तम तऱ्हेनें चालूं शकतो. व हीं खांड मशिनें सरकारच्या हरकती शिवाय आपल्याच देशचे सुतार व लोहार तयारही करूं शकतात. व ह्या धंद्यापासून देशाच्या पुष्कळ गरीब लोकांचा फायदा होण्याचा संभव आहे.

नंतर राजश्री बाबू बद्रीप्रसाद रईस सहाजानपूर ठेकेदार बनारस यांनीं अनुमोदन देतांना सांगितलें कीं आपल्याला आतां असा मार्ग पतकरला पाहिजे कीं; ज्याची अमल बजावणी करतां येईल. व त्यापासून कांहीं निष्पन्न होईल नुसते ठराव पास करून कांहीं उपयोग नाहीं.

ह्यानंतर दहा दहा रुपयांचे शेअर वेंचले गेले. शेअरची रकम फारच लहान आहे कारण गरीब लोक्या सर्वांना घेता यावा. तत्क्षणींच २७००० सत्तावीस हजार रुपयांचे शेअर विकले गेले. आणि वरील ठराव सर्वानुमतें पसार झाला.

**ORIENTAL GOVERNMENT SECURTY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount dn-under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policie matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the lite of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the etp, do not delay. There ares uumerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Frospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या शास्त्रोच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

**मदनामृतसंजीवनी**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

**गुटिका**

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातूपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसं, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुरणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें. पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डी सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दर:—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३ वर्षे आंजर्लें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीशी हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

REGISTERED

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........रु१ ०८
दुसरे खेपेस.... ....... ....रु१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 8 FEBRUARY 1904 NO 6

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १९०४ इ० अंक ६

### नोटीस

नोटीस घेणारे नानजी व. पुंजाजी व निंबाजी मयत वारस पुत्र सदू फुटकर राहणार जयपूर तालुके खामगाव यांस नोटीस देणार गणू व. श्रावण बेलदार राहणार जयपूर याजकडुन नोटीस देण्यांत येते कीं तुमचा भाऊ लक्ष्मण राहणार. मानीपूर ता. बाळापूर हा मरण पावला. त्याचे ताब्यातील वडिलोपार्जित मिळकत ताब्यांत असल्यावर निमे मी घ्यावी व निमे तुम्ही घ्यावी. अखेर पर्यंत कोर्टात जो खर्च लागेल तो नी लावावा असा तुमचा माझा आपसांत करार झाला असून कोर्टात चाललेलें भांडण पुरें झालें नाहीं. या कामीं माझे पुष्कळ रुपये खर्च झाले. तुम्ही आतां साफ म्हणतां कीं आम्हास कांहीं. जरूर नाहीं व आम्ही मुळींच येत नाहीं. तुमच्या मनांतील हेतू कांहीं तरी दगाबाजीचा दिसतो. याकरितां तुम्हास या नोटीशीनें कळवि-ण्यांत येते कीं तुमच्या हयगयीमुळें माझे नुकसान होत आहे. तर ही नोटीस पोचल्यापासून आठ दिवसांचे आंत माझ्या घरीं येऊन माझे सर्व रुपये देऊन पावती घ्यावी येणें प्रमाणें मुदतींत न कराल तर सरकारमार्फत मी सर्व रक्कम तुमचेकडून भरून घेईन व अखेर निकाला पर्यंतचा सर्व खर्चवेच तुमच्या अंगावर पडेल. कळावें. तारीख ४।२।०४ इसवी.

सहीचा निशाणी
गणू वल्द श्रावण बेलदार राहणार
जयपूर ता. व पोस्ट खामगाव
याचे हातची रेघ.

---

### नोटीस

घेणारे मेहरलाल मारवाडी दुकान सुनगांव वहिवाटदार चैतराम मेहरलाल मारवाडी राहणार सुनगांव तालुका जळगांव यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळवि-ण्यांत येते कीं तुम्हाकडे माझ्या बापानें कर्जाच्या फडींत उक्तच्या खंडानें सुनगांवचा सर्व्हे नंबर २६ भिकणीचें शेत हें २४ वर्षें वहि-वाटीस दिलें. ही गोष्ट १८७० सालीं घडली त्या नंतर तुमचीं वर्षे पुरीं झालीं परंतु तुम्ही माझें शेत लबाडीनें बळकावून बसलां आहां. तरी ही नोटीस पोचल्या तारखे पासून १५ दिवसांचे आंत माझी मत्ता परत करावी. आणि तुम्ही में पीक हक्क नसतां खाल्लें आहे त्याचा हिशोब मला द्यावा. असें कर-ण्यास चुकल्यास तुम्हावर दिवाणींत दावा करून सर्व दाद खर्चा सुद्धां व इतर नुकसा-नी सुद्धां घेतली जाईल कळावें.

तारीख १ फेब्रुवारी सन १९०४ इ.

सही
शेखयासम वा॥ शेखजुमा
मिल्ल राहणार सुनगांव
निशाणी रेघ.

### नोटीस

घेणारी महादू वल्द हरी रुपणवर धनगर पाटील राहणार फडतरी तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर पेस्ट नातपुते यांस:—

मी खालीं सही करणार या जाहीर लेखानें कळविते कीं, तुम्ही माझे लग्नाचे भ्रतार आहात. लग्नाला आज १०–१२ वर्षे होत आलीं. इतक्या वर्षांत मी कांहीं वर्षे तुम्हा बरोबर संसार केला व मला तुमचे पासून मुलेंहि झालीं होतीं, परंतु तुमचें व माझें चांगलेंसें कधींच पटलें नाहीं. आणि अलीकडे तर ही गोष्ट फारच विकोपास गेली. मी तुमच्या घरीं राहिले असतां तुम्ही मला वाटेल तशी मारहाण करितां. अन्नवस्त्राचीहि माझी मोठी आबाळ होते. तुम्ही एखादे वेळीं माझा जीवहि घ्याल अशी मला आतां भीति वाटत आहे. तुम्ही बाहेरख्याली्च्या नादांत आहां आणि मी तुम्हाला आतां यापुढें नको म्हणून मी आपल्या आईच्या घरीं जीव मुठींत घेऊन आलें आहे. म्हणून कळविते कीं, ही नोटीस पोचल्या पासून १५ दिव-सात मला फारकती द्यावी, अगर माझ्या पोटापाण्याची व वस्त्रपांघरुणाची निराळी सोय लावून द्यावी. असें न केल्यास हीच नोटीस मी फारकत समजेन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा कांहीं एक हक्क राहणार नाहीं. किंवा तुम्हावर पोटगीबद्दल दावा करीन. कळावें तारीख ३१।१।०४.

सहीची निशाणी
भागू मर्द महादू हल्लीं वस्ती आकोला
(वऱ्हाड) इचे हातची बांगडी.

---

जळगांव तारीख १।२।१९०४

### भूकंपाचा आवाज

तारीख ३० माहे जानेवारी रोजीं सकाळीं सुमारें नऊ दहा वाजण्याचे सुमारास एक मोठा धूपता आवाज झाला. तो खानदेशाकडून पूर्णा नदीचे पलीकडील भागांत झाला. ह्या रात्रीं एक तारा तुटला. तो मात्र कांहीं ठिकाणीं दिस-ला व कांहीं ठिकाणीं दिसला नाहीं. ज्यानीं पा-हिला ते सांगतात कीं, तो मोठा होता. आवाज मात्र आम्ही सर्व लोकांनीं ऐकिला याजबद्दल लोक वार्ता नाहीं तर प्रत्यक्ष अनुभव आहे. इतरत्रहि असाच प्रकार कोठें झाला असल्यास न कळे. हा आवाज भूकंप आहे किंवा काय? याजबद्दल कांहीं कल्पना करता येत नाहीं. पूर्वीं सन १८९१ सालीं भूकंपाचा धक्का इलि-चपूर अकोटाकडे बसला होता. त्यावेळीं घरें वगैरे हादरलीं होतीं. तसा प्रकार ह्यावेळीं झाला नाहीं हा काय चमत्कार असावा कोण जाणे!

---

### वैश्य महासभा

(विनोद लखें)

पहिल्या दिवसा प्रमाणेंच दुसरे दिवशीं म्हणजे तारीख २८ रोजीं दुपारीं पुन्हां सर्व सभाजन एकत्र जमले. ह्या दिवशीं लोकांची गर्दी फारच होती. नाहीं तरी ४ हजार लोक जमले असावेत. कामास सुरवात झाली आणि राजश्री लाला शिवचरण पत्रकर ह्यानीं अनमेळ विवाहाचा ४ था ठराव सभेपुढें मांडला कीं:—

( १ ) ४० वर्षांच्या वयाच्या विधुरानें त्यास वारस नसेल आणि त्याची शरीरकाठी सदृढ असेल तरच दुसरें लग्न करावें; नाहींतर बिलकूल करूं नये. (२) मुली बद्दल रुपये देणें व घेणें बंद व्हावें व जे लोक रुपये देतील वा घेतील त्यांचा जाती बिरादरानीं तिरस्कार करावा व त्यांस कोणत्याहि कामांत सामील करूं नये. (३) आपल्या गरीब जातीवाल्याला, त्यांच्या मुलीचे लग्नाकरितां पंचायतींतून मदत मिळावी. (४) एक स्त्री जिवंत असतां पुरुषानें दुसरी स्त्री करूं नये.

वरील नियमावर वक्त्यांचें गोड भाषण झालें व त्यानें श्रोतृजन तल्लीन करून सोडला. ते म्हणाले कीं, विधवा स्त्रियांची जी मोठी संख्या आपणांस दृष्टीस पडते तिचें कारण विजोडलग्नें व बालविवाह होय. मुलीबद्दल रुपये देणें व घेणें हें फार निंद्य आहे. विकत घेतलेल्या मुलामुलीपासून जी संतती होते ती धर्म संततीची बरोबरी करणारी नसते. मुलामुलींचा क्रयविक्रय करणारे लोक म्हणजे अती निर्दय होत; ते सर्प प्रमाणें आपल्या मुलांना जीवें खातात असें म्हणण्यास हरकत नाहीं. विजोड लग्नानीं नीतिभ्रष्टता वाढते हें सर्वांनीं लक्ष्यांत घ्यावें.

### स्वदेशी वस्तु

वरील ठराव पास झाल्यावर राजश्री लाला गोविंदराम फटो ग्राफर रईस कासगंज ह्यानीं देशी कपडा वापरून आपल्या देशी-उद्योगधंद्याची उन्नती करावी या संबंधाचा पांचवा ठराव पुढें मांडला. ( १ ) जाइंट स्टाक कंपनीच्या धरतीवर एक कंपनी काढावी, पुष्कळसें भांडवल उभारावें. कार्यालयें ( कारखाने ) काढावेत. व मुलांना कामाचें शिक्षणहि द्यावें. ( २ ) होतां होईल तों आम्ही स्वदेशीच कपडा घेऊं व देशीच जि-नसा वापरूं अशा शपथा लोकांच्याकडून घेववाव्यात. ( ३ ) व्यापार धंदा वाढण्या साठीं लोकांनीं नवीन नवीन युक्त्या सोसा-यटीला कळवीत जाव्या.

ह्या ठरावाच्या पुष्ट्यर्थ राजश्री बाबू राधा मोहनजींनीं मोठ्या प्रेमळपणानें जें भाषण केलें त्यांत त्यांनीं एक विशिष्ट गोष्ट सांगि-तली कीं, उद्योगधंदा व व्यापार करणें ही गोष्ट निराळी व निवळ दलाली करणें निराळें. ह्या दोन्ही गोष्टींत फार मोठें अंतर आहे पण तें पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. जेव्हां एखादी वस्तु आपण आपल्या भाई पासून विकत घेतो व तीच आपण कांहीं नफ्यानें दुसऱ्या भाईस विकतो, तेव्हां आपण निवळ दलालीच करितो: एकाच्या खिशांतून पैसा काढून दुसऱ्याच्या खिशांत टाकणें म्हणजे खरा व्यापार नव्हे.

आपल्या देशांत लागणाऱ्या वस्तु आप-णच उत्पन्न केल्या पाहिजेत व त्यांना अभि-मान धरून आपण त्याजवरच आपल्या गरजा भागविल्या पाहिजेत. आपण जो धंदा करायाचा असेल तो सावधपणानें वि-चारपूर्वक करा.

पुष्कळ ठिकाणीं जेथें पूर्वी एक जीन व प्रेस होता तेथें आतां त्याची नकल करून लोकांनीं ८।८ १०।१० करून तोडले आहेत कीं, ज्याच्या योगानें सर्वच भुके म-रायला लागले व मरत आहेत आपण दुस-ऱ्याची नक्कल करण्याची रीत सोडून दिली पाहिजे. नवीन नवीन धंद्यांत पडण्याची हिं-मत धरली पाहिजे व याचीच आज फार जरूरी आहे. सध्याच आपल्या जवळ मोठ-मोठीं यंत्रें चालविण्यास हिम्मत नाहीं व पैसा नाहीं, मोठमोठ्या कंपन्यांचे दिवाळें निघालेलें आपण पाहतों व आपल्यांत पैसे-वाल्यांची संख्या कमी दिसत आहे व आप-णांस तर आपल्या गरीब बांधवास उद्योगास लावून देशाची स्थिती सुधारायाची आहे.

आपल्यामध्यें हलवायाचे १० मुलगे एकच गांवांत त्याच धंद्यांत पडतात हा विचार करीत नाहींत कीं, ह्या गांवांत पूर्वीं पेक्षां दहापट हलवायाचीं दुकानें वाढतील तर इतक्यांना गिऱ्हाईकें कोठून येतील! अशा रीतीनें लोक एकाच तुकड्यावर कुत्र्यासारखे भांडण्यास तयार असतात. हें ठीक नाहीं.

शेंकडों तऱ्हेचीं खांडमिशनें आहेत. ज्यांची किंमत २० रुपया पासून ३०० रुपये पर्यंत आहे. जसें छत्री करण्याचा कारखाना ११०० रुपयांचें खांड मशीन मागविल्यानें व ५००० पांच हजाराची रक्कम लावल्यानें फारच उत्तम तऱ्हेनें चालूं शकतो. व हीं खांड मशिनें सरकारच्या हरकती शिवाय आपल्याच देशचे सुतार व लोहार तयारही करूं शकतात. व ह्या धंद्यापासून देशाच्या पुष्कळ गरीब लोकांचा फायदा होण्याचा संभव आहे.

नंतर राजश्री बाबू कन्हीप्रसाद रईस सहाजानपूर टेकेदार बनारस यांनीं अनुमोदन देतांना सांगितलें कीं आपल्याला आतां असा मार्ग पतकरला पाहिजे कीं; ज्याची अमल बजावणी करतां येईल. व त्यापासून कांहीं निष्पन्न होईल नुसते ठराव पास करून कांहीं उपयोग नाहीं.

ह्यानंतर दहा दहा रुपयांचे शेअर वेंचले गेले. शेअरची रकम फारच लहान आहे कारण गरीब लोक्या सर्वांना घेता यावा. तत्क्षणींच २७००० सत्तावीस हजार रुप-यांचे शेअर विकले गेले. आणि वरील ठराव सर्वानुमतें पसार झाला.

## वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ७ शके १८२९

हल्लीं कापसाच्या बाजारांत मोठी चळवळ उडाली आहे. भाव रुईच्या बोजामागें पांच पांच रुपये उतरला असून या पुढें भावाला तेजी येण्याचा रंग सध्यां दिसत नाहीं. हा भाव एकदम उतरल्यामुळें पुष्कळ कपाशीचे सौदागर नुकसानींत आले आहेत. भाव पुनः वाढतील असें कित्येकांस वाटतें आणि त्या आशेवर ते स्वस्थ आहेत. मुंबईच्या तारांवर येथील भाव घटकोघटकीं बदलत असतात. व मुंबईला कापसाचे भाव विलायतेच्या मागणीवर कमी जास्ती होत असतात. विलायतेंतल्या कपाशीच्या गरजेवर हे भाव फिरते असतात. ह्मणजे विलायतेच्या कारखानदारांच्या हातीं सर्व सूत्रें असतात. परंतु त्यांचीं देखील धांव पुनः इंडियांतील बाजारावर अवलंबून असते. विलायती कापडाचा खप जसा लहान मोठा होतो तसा तो खप विलायतेच्या गिरण्यांच्या भरधांव गतीला चालन देत असतो. इंडियन कापसा बरोबर इजिप्त व अमेरिका येथील कापसाची स्पर्धा नेहमीं चालू असते; आणि ही गोष्ट तिकडील पिकाच्या कमी जास्ती प्रमाणावर पुष्कळशी अवलंबून असते. कपाशीच्या व्यापाराचें चक्र कसें चालतें हें पाहणें मोठ्या मौजेचें आहे. किंबहुना, अर्थशास्त्राचे सर्व धडे कापसाच्या पेठेंत एकदम तत्काळ मूर्तीमंत डोळ्यापुढें उभे राहतात. कापसाच्या व्यापारांत किती तरी व्यापारी श्रीमान बनतात आणि किती तरी रंक व खंक बनतात. कापसाचा व्यापार ह्मणजे देखत भुलीचा सौदा वाटतो; आणि तो असेंहि शिकवितो कीं, विलायतचे कारखानदार आमच्या व्यापाराचे नियन्ते व चालक बनले आहेत आणि ती स्थिती पालटण्याला देशी यंत्रालयें व गिरण्या हीं निघतील तेव्हांच आमच्या देशाची सांपत्तिक स्थिती स्थिरस्थावर होईल.

---

यंदा आमच्या प्रांतांत कपाशीचें पीक अंदाजानें आठ दहा आणे आलें परंतु भाव दुपटीनें वाढल्यामुळें सरासरीनें शेतकऱ्यांची बाजू बरीच संभाळली गेली. त्याशिवाय यंदा कपाशीचें पीक गेल्या सक्रांतीच्या समयाला पुनः चांगलें सुधारलें. उभी कपाशी गेल्यासारखी वाटत होती पण तिला अनुकूळ हवामान मिळून पुनः बोंडें आलीं व या नवीन कापसाचे वेंचे एकंदरीनें मोठे लाभकारक झाले. ही गोष्ट यंदाच्या कपाशीच्या हंगामांत विलक्षण घडली या सालीं कापूस व रुई गेल्या सालाच्या मानानें येथील काटन मार्केटांत निम्मा आला आहे. याचें एक कारण असें कीं मूळ पीकच कमी आलें. पुष्कळ खेड्या पाड्यांतूनही जिनींग कारखान्यांच्या चिमण्या बुभुःकार करूं लागल्या हें दुसरें कारण होय. आकोल्याच्या पेठेंतील जिनींग कारखानदारांचा कट होता व त्यांचा भाव सर्वत्र एकसारखा असून जबर होता. त्यामुळें कापसाचा पुरवठा आकोल्यास कमी झाला; पण पुढें जेव्हां हा कट मोडला व कापूस वठण्याचा भाव निम पटीनें उतरत चालला तेव्हां येथील बाजारांत कापसाच्या गाड्या पुष्कळ येऊं लागल्या आणि त्यामुळें दरसालची बोजांची व कापसांच्या गाड्यांची सरासरी निम्या संख्येपर्यंत येऊन पोचली आहे. सध्यां बाजारभाव फार मंदीचे आहेत पण ही चलबिचल हंगामाच्या अखेरीला झाली असल्यामुळें त्यापासून शेतकऱ्यापेक्षां व्यापाऱ्यांचीच मोठी लाभहानी होणार आहे.

---

कपाशीप्रमाणें सरकीचा भाव मंदींतच आहे. विलायतेंतील कारखानदार सरकीचें तेल काढतात आणि त्यांच्या गरजा जशा वाढत चालल्या त्या मानानें सरकीचे भाव कडकत चालले. अलिकडे चार पांच वर्षांतच सरकीच्या भावाला जी मोठी तेजी आली आहे तिचें मुख्य कारण विलायतेंत सरकीचें तेल काढण्याचे कारखाने निघाले हें होय. सध्यां विलायतची मागणी फारशी नाहीं व त्यामुळें बाजारांत सरकीची खरेदी फारशी होत नाहीं. सरकीच पर्वतप्राय ढीग पडून राहिले आहेत व सध्यां सरकीचाही भाव दररोज दोन चार आण्यांनीं घटत चालला आहे. कदाचित् कपाशीचा हंगाम संपल्यावर सरकीला तेजी येईल असें कित्येक व्यापारी ह्मणतात. आमच्या प्रांतांत सरकीचा उपयोग जनावरांच्या खुराकाकडे होतो. गुरांस सरकीचा रतीब मोठा पुष्टीदायक समजतात. आह्मी कांहीं महिन्यां पूर्वी सरकीचें तेल काढण्याचे कारखाने सुरूं करण्याविषयीं सूचना केली होती परंतु अजून त्या गोष्टीकडे लोकांचें लक्ष्य नीटसें पोंचलें नाहीं असें दिसतें. बाकी विलायतेला सरकी जाते ही गोष्ट आह्मांला पसंत नाहीं. या पेक्षां ती देशी गुरांच्या मुखीं पडेल तर देशी गोधनाची श्रीमंती वाखाणण्या सारखी कायम राहील. हल्लीं शेतांत कापूस पिकतो पण शेतांतल्या गुरांनाच सरकी पुरेशी मिळत नाहीं. हात रेचे चालत होते तेव्हां सरकी शेतकऱ्याच्या घरींच राहत असे परंतु यांत्रिक रेचे सर्वत्र निघाल्यामुळें पुनः पैसा देऊन सरकी विकत घेण्याची गोष्ट विशेष जड जाते. सध्यां सरकीचा भाव कमी कमी होत आहे हें आह्मी गुराढोरांचें महा भाग्य समजतों.

---

इंडियन लोक आणि राज्यकर्ते यांच्या कार्याची वाटणीच झाल्या सारखी आहे. राज्यकर्त्यांनीं जीवन यात्रेला लागणारी शांतता व स्वस्थता राखण्याचा मुख्य कार्यभाग आपल्या हातीं ठेविला आहे. राष्ट्रांतील लष्करी खात्यांशीं लोकांचा बिलकूल संबंध नाहीं. सर्व सत्ता अशी ठेविली आहे कीं, लोकांस परचक्राची काळजी नको, सैन्याचा दगदग नको, आरमारें नकोत. तलवार नको, बंदूक नको, तोफ नको, कांहींच पाहण्याची जरूर राहिली नाहीं. आत्मरक्षणाची मुख्य बाजू राज्यकर्त्यांनीं संभाळल्या मुळें आमच्या लोकांची स्थिति चमत्कारिक बनली आहे. पिंजऱ्यांतल्या राघू प्रमाणें आह्मांकडे मनोहर बोल बोलण्याचा भाग शिल्लक आहे. इंग्रजी साम्राज्यामध्यें आमच्या लोकांकडे एखाद्या लग्नमंडपांत जमलेल्या पाहुण्याप्रमाणें व्यवस्थेनें मेजवान्या उडविण्याचें आणि आराम करण्याचें काम आहे. आह्मी सुखभोजन करावें, सुखसंवाद करावेत आणि सुखानेंच आयुष्य क्रमावें असा आमचा कार्य भाग उरला आहे. या इंग्रजी सुख संग्रामामुळें आह्मी कलाहीन होऊन दास्यत्वाला पेंचलों आहों.

आमच्या लोकांस बाह्य जगाशीं कांहीं कर्तव्य नाहीं असा वर्तमान काल आलेला आहे. आमच्या सुखकालांत आह्मी अधीक निष्काळजी झालों आहों. आमच्या अंतर्जगामध्यें आमच्या देखील राज्यकर्त्यांनीं आपल्या कारागिरीनें व यांत्रिक कलेनें आह्मावर विलायती सुखसमुद्राची भरती आणिली. आमचें वस्त्रप्रावरण आणि आमच्या प्रपंचाला लागणाऱ्या सर्व चीजवस्तुही आगबोटींनीं व रेलवेनीं अगदीं दारासमोर आणून ठेविल्या आहेत. त्यामुळें आह्मास कलाकौशल्याचे उद्योग चालूं ठेवण्याची गरजच नाहींशी झाली. या देशाची वसुंधरा आह्मा लोकांस सोडीत नाहीं ह्मणून जरूरी पुरतां कृषिवलाचा उद्योग आपल्या हातीं राहिला आहे. आणि बाकीचा आमचा सर्व व्यापारधंदा व विद्या ह्मणजे विलायतच्या मालाचा पुरवठा बरोबर करण्याचा सुखकर मार्ग होय. या पलिकडे आमचा असा कांहींच कार्यभाग अवशिष्ट नाहीं. राष्ट्रीय कार्याच्या वाटणीमध्यें आह्मी सर्व अधिकार आमचा राज्यकर्त्यांकडे दिला आहे असें ह्मणण्यापेक्षां ब्रिटिश सिंहानें आपला तराजू स्वहस्तींच ठेविला आहे. तेव्हां त्या सिंहापुढें आह्मी क्षुद्र पशूंनीं आह्मांला दिलेलाच वाटा उचलला पाहिजे.

---

आमच्या राज्यकर्त्यांनीं वैराल सिंहकृतीला भूतदयेचा मुलामा देण्याचें अलिकडे मनावर घेतलें आहे. देशी कलाकौशल्याचा पुनर्जन्म करण्याचा संकल्प सरकारानें अलिकडे केला आहे. बुडत्याला हात द्यावा ही मोठी दया होय. हा महत् उपकार सरकार आह्मावर करणार आहे हा आमचा सुदीन होय. आतां विचार असा ठरत आहे कीं देशी विद्यार्थी इंग्लंडांत व इतर राष्ट्रांत कलाकौशल्य शिकण्यासाटीं पाठविण्याची योंजना करावी; आणि या कामा साटीं पसंत केलेल्या दहा विद्यार्थ्यांस सरकार दरसाल १५० पौंडांची स्कालरशिपही देणार आहे. सरकारी उपकारामृत आमच्या रुग्ण देशाला मिळणार आहे ही गोष्ट समाधानीची आहे. हें अमृत आमच्या देशाच्या संपत्तीचें संजीवन करो ह्मणजे झालें. कित्येक अर्थशास्त्रज्ञ ह्मणतात कीं हा देश मृत राष्ट्रांच्या यादीमध्यें अग्र स्थानीं ठेवावा लागेल. असा एवढा आपत्काल आह्मावर येणार नाहीं अशी आमची गोडबोली आशा आह्मांस सांगते; आणि आह्मी ते तिचे शद्ब खरोखरच समजतो. इंग्रजी विद्यांचा ज्ञानसूर्य प्रकाश देत असतां हा देश सांपत्तिक दृष्ट्या लयास जाईल हें संभवत नाहीं. आमची भावी अंतिम गोष्ट ह्मणजे आमच्या देशाची श्री होय. ती श्री पुनः उदयास येईल आणि आपली दीप्ति सर्वत्र प्रसृत करील तरच इंडिया हें राष्ट्रसजीव राहील. इंग्रजी साम्राज्याचें बलवत्तर सुदर्शन आमच्या देशा भोंवती फिरत आहे तेव्हां आपणास कशाचीहि भिती नाहीं. फक्त आमच्या राज्यकर्त्यांनीं सबशेल दडपलेली आमची औद्योगिक कार्यभूमी आह्मांला परत मिळाली तरी आह्मी कांहीं अंशीं राजमान्य राजश्री या पदवीला योग्य राहण्याचा संभव आहे. विलायती ओंजळीनें पाणी पिण्याची खोड मट याली आमचा औद्योगिक कला सरित जी पाश्चात्य साम्राज्याच्या कंपानें इंडियाच्या उदरांत लुप्त झाली आहे ती पुनः संचरूं लागली पाहिजे. औद्योगिक श्रीच आह्मांला संपादावयाची आहे आणि ती मिळण्याला आमच्या अंगीं योग्यता आणणारी विद्या सरकार या पुढें शिकविणार आहे. ही विद्या किती उशिरानें आपण शिकणार आहों याची कल्पना आली ह्मणजे सांप्रतची वाङ्मयात्मक विद्या सर सकट सगळ्यांस शिकविण्याचा मार्ग चुकला आहे असें लक्ष्यांत येईल.

---

## कुंपणें

आपापल्या जमीनी भोंवतीं दाट कुंपणें लावण्याची चाल ह्या देशांत फारशी नाहीं. निव्वळ बागाईत जमिनींस बाभळीच्या अगर बोरीच्या कांट्याचें कुंपण लावतात. साधारण पिकें ज्या जमिनींत घेतलीं जातात त्याच्याबद्दल कुंपणाचा उपयोग कोणी करीत नाहींत असें ह्मटलें तरी कांहीं हरकत येणार नाहीं. कुंपणाचा उपयोग हाच कीं कुंपणें लावलेलीं असलीं ह्मणजे मनुष्य व जनावरें यांचा उपद्रव होत नाहीं. त्याचप्रमाणें मोठमोठ्या वाऱ्याचा जोर कुंपणाच्या योगें मोडून त्यापासून प्राणी व पिकें यांचें संरक्षण होतें. शिवाय सतत टिकणाऱ्या झाडांचीं जर कुंपणें लाविलीं तर त्यापासून दरसाल थोडा बहुत जळणाचा पुरवठा होऊन गोंवऱ्याच्या रुपानें जनावरांचें शेण जाळण्याची जरूर पडत नाहीं व तें आपले शेतांत खताच्या रुपानें घालून शेताची सुपीकता जास्त वाढवितां येते. खालीं लिहिलेल्या झाडांचीं कुंपणें चांगलीं होतातः—

आगगाडींतून जातांना पुष्कळांनीं लोखंडी सडकेच्या दोन्ही बाजूस असलेलीं घायपात अगर केकताडा यांचीं कुंपणें पाहिलीं असतील. आपल्या शेताच्या समोंवतीं सरासरी तीन फूट उंचीचा एक बांध घालून त्यावर घायपाताच्या कांद्याच्या २।३ ओळी लावाव्यात. शेताच्या बाहेरील व आंतील बाजूस दोन नाल्या खणून त्यांच्या मध्यें खणलेल्या मातीचा बांध घालावा. बांध व आंतील नाली यांत आणखी एखादें कुंपण लावण्याकरितां जागा ठेवलेली असावी, व त्यांत कोरकाई पुली, मेंदी, गुलाब अशा झाडाच्या रांगा लावाव्यांत. आंतील झाडें ३।४ वर्षांनीं मोठीं वाढलीं ह्मणजे त्यांची दरसाल व्यवस्थेशीर छाट करून जळण तयार होतें. बाहेरील घाय पानास कांटे असल्यामुळें जनावरांचा किंवा माणसांचा प्रतिकार होऊन शिवाय पानापासून दरवर्षी दोरांचेंही उत्पन्न होतें.

मद्रासेंत कोरकाई पुली नांवाचें एक झाड आहे. त्याचें कुंपण फार चांगलें तयार होत

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम ।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हो ।
ढूंढत फिरते हरेक सिम्त कदरदां है हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... -॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वाकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दात मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख हाणं इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रण्ड अँण्ड कम्पनी मथुरा.

---

## मुंबई बॅंकचीं सेव्हिंग्स बॅंक

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिलक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिलक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असत मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट

---

## स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेंना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितो.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस
काळबा देवी रोड
मुंबई.

---

## जाहिरात

### केडावर खात्रीचें औषध

हटकून गुण डबीस २ रुपय.

व्ही. एम जोशी
पॉलिस टाऊन नजीक उमरावती
प्रांत वऱ्हाड.

---

वाचा ! वाचा ! !

( मौजच मौज. हसूंच हसूंच )

तुमचा वेळ आनंदात जावा अशी तुमची इच्छा आहे काय ? असल्यास खालील पुस्तकें एकवार वाचाच.

मोठमोठ्यांचे अभिप्राय मिळाले आहेत.

### नवीन तयार झालेली पुस्तकें.

बंधुप्रेम अथवा सुंदरराव हंबीरराव,
किं० १॥ रु.

भगिनीप्रेम अथवा कामांध राजपुत्र.
किं० १ रु०

दोन्ही एकदम घेणारास २ रु[illegible] मिळतील. व्ही. पी. ट. ख. माफ[illegible]

वासुदेव जनार्दन [illegible]
बुकसेलर—[illegible]

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव [illegible]ळाजी फडके यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

---

## जाहिरात

मुनिसिपाल निवडणुकींचे नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोलें मुनसिपाल कामिटींतील ज्या मेंबरांच्या जागा सदहु नियमाप्रमाणें नियम ३१ अन्वयें खालीं होतील त्या भरण्या करितां ता. २५।२६।२७ माहे फेब्रुवारी सन १९०४ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे, खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डापैकीं मेंबर निघाले त्याचीं नांवें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख, जागा, पोलींग आफिसरचें नांव, उमेदवार यांनीं कोणत्या तारखेपर्यंत पोलिंग आफिसरकडे मुनिसिपाल नियम १३ अन्वयें आपले अर्ज द्यावे वगैरे माहिती दिली आहे. ता. ६-२-१९०४ इ०

Akola } V. M. Mahajani
6—2—1904 } Vice—Chairman
Municipal C. Akola.

| वार्ड नं. | निवणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा. | पोलिंग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेचे आंत नांवचे कागद द्यावयाचे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि० जयकृष्ण बगाजी. | २५—२—०४ | पाटील चावडी. | मे० गो० वा० बापट. ए० आसि० कमिशनर | १८—२—०४ |
| | ,, नारायण काशिनाथ दाते. | ,, | | | |
| २ | ,, याकुबखां अहमदखां. | २६—२—०४ | ग्रेनमार्केट आफिस. | | १९—२—०४ |
| | ,, रामचंद्र मार्तंड गुप्ते. | ,, | | | |
| | ,, शंकर नारायण डांगे. | ,, | | | |
| ३ | ,, वासुदेव ल० चिपळूणकर | २७—२—०४ | टाऊनहाल. | | २०—२—०४ |

Akola.
6—2—1904.

V. M. Mahajani
Vice—Chairman
Municipal C. Akola.

---

## NOTICE

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies caused by the retirement of the members in the Akola Municipal Committee under operation of rule 31 of the said rules will take place, from 7 A. M. to 5 P. M. on the 25th, 26th. and 27th February 1904. The following table gives for each ward the name of the out—going members, the date. and place of election, the name of the Polling Officer and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to this Polling Officer.

Akola. } V. M. Mahajani.
6—2—1904 } Vice—Chairman
Municipal C. Akola.

| Ward. | Names of out-going members. | Date of election. | Place of election. | Name of the Polling Officer. | Dates before which nomination papers should be delivered. | Remarks. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Jaikrishna Bagaji | 25th. February 1904 | Patel's Chowri | G. W. Bapat Esq. Extra Assistant Commissioner. | 18th. February 1904 | |
| | ,, Narayan Kashinath Date | | | | | |
| 11 | ,, Yakubkhan Ahmedkhan | 26th. February 1904 | Grain Market Office. | | 19th. February 1904 | |
| | ,, Ramchandra M. Gupte | | | | | |
| | ,, S. N. Dange | | | | | |
| 111 | ,, W. L. Chiplunkar | 27th. February 1904 | Town Hall. | | 20th. February 1904 | |

Date Akola.
6th. February 1904

V. M. Mahajani
Vice—Chairman.
Municipal C. Akola.

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या शास्त्रोच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपर्युक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रमें, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचें आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डी सोबत रोखीनें किंवा व्हो पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः —

३६ गो० १ रु० ७६ गो० २ रु०
११६ गो० ३ रु० १६६ गो० ४ रु०
२७१ गो० ६ रु० ५१० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षे आंजर्लें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी



## ORIENTALGOVERNMENT SECURTY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Beror & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

---

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du- under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policie matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the etp, do not delay. There ares unmerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Intluential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*




## जाहिरात

मुनिसिपाल निवडणुकींचे नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोलें मुनसिपाल कामिटींतील ज्या मेंबरांच्या जागा सदरहू नियमाप्रमाणें नियम ३१ अन्वयें खालीं होतील त्या भरण्या करितां ता. २५।२६।२७ माहे फेब्रुवारी सन १९०४ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे, खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डोपैकीं मेंबर निघाले त्याचीं नांवें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख, जागा, पोलींग आफिसरचें नांव, उमेदवार यांनीं कोणत्या तारखेपर्यंत पोलींग आफिसरकडे मुनिसिपाल नियम १३ अन्वयें आपले अर्ज द्यावे वगैरे माहिती दिली आहे. ता. ६-२-१९०४ इ०

Akola
6—2—1904

V. M. Mahajani
Vice—Chairman
Municipal C. Akola.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा. | पोलिंग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेचे आंत नांवचे कागद द्यावयाचे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि० जयकृष्ण बगाजी. | २५-२-०४ | पाटील चावडी. | मे० गो० वा० बापट. ए० आसि० कमिशनर | १८-२-०४ |
| | ,, नारायण काशिनाथ दाते. | ,, | | | |
| २ | ,, याकुबखां अहमदखां. | २६-२-०४ | ग्रेनमार्केट आफिस. | | १९-२-०४ |
| | ,, रामचंद्र मार्तंड गुप्ते. | ,, | | | |
| | ,, शंकर नारायण डांगे. | ,, | | | |
| ३ | ,, वासुदेव ल० चिपळूणकर | २७-२-०४ | टाऊनहाल. | | २०-२-०४ |

Akola.
6—2—1904.

V. M. Mahajani
Vice—Chairman
Municipal C. Akola

NOTICE

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies caused by the retirement of the members in the Akola Municipal Committee under operation of rule 31 of the said rules, will take place, from 7 A. M. to 5 P. M. on the 25th, 26th, and 27th February 1904. The following table gives for each ward the name of the out—going members, the date, and place of election, the name of the Polling Officer and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to this Polling Officer.

Akola.
6—2—1904

V. M. Mahajani.
Vice—Chairman
Municipal C. Akola.

| Ward. | Names of out-going members. | Date of election. | Place of election. | Name of the Polling Officer. | Dates before which nomination papers should be delivered. | Remarks. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Jaikrishna Bagaji | 25th. February 1904 | Patel's Chowri | G. W. Bapat Esq. Extra Assistant Commissioner. | 18th. February 1904 | |
| | ,, Narayan Kashinath Date | | | | | |
| 11 | ,, Yakubkhan Ahmedkhan | 26th. February 1904 | Grain Market Office. | | 19th. February 1904 | |
| | ,, Ramchandra M. Gupte | | | | | |
| | ,, S. N. Dange | | | | | |
| 111 | ,, W. L. Chiplunkar | 27th. February 1904 | Town Hall. | | 20th. February 1904 | |

Date Akola.
6th. February 1904

V. M. Mahajani
Vice—Chairman.
Municipal C. Akola.

असून त्यापासून सदोदित जळणाचा पुरवठा होतो. बांधाच्या व आंतील नालीच्या मध्यें हें कुंपण लाविलें असतां कांहीं हरकत नाहीं. आपली जमीन फारच मोठी विस्तृत असली तर तिचे लहान लहान सोइस्कर तुकडे पाडण्याकरितां कधीं कधीं याचें कुंपण शेताच्या मधूनही लावितात. ज्या वेळेस असें कुंपण मध्यें घालावयाचें असेल त्या वेळीं कुंपणा करितां दीड फूट खोलीची व एक फूट रुंदीची एक नाली खणून तीच माती पुन्हां नालींत भरतात. व तींत खत घालून त्यांत पाऊस काळांत ह्या झाडांच्या बियाच्या दोन तीन रांगा लावितात. उन्हाळ्यांत पाणी घालून दोन तीन वर्षें जर त्यांची चांगली काळजी घेतली तर त्या नंतर त्यांजकडे पाहण्याचें सुद्धां कारण पडत नाहीं. पावसाळ्या नंतर तें कुंपण दर वर्षी एकदां छाटलें ह्मणजे जाहलें. असें कुंपण जर एक मैल लांबीचें तयार झालें तर त्यापासून प्रतिवर्षी ३०।४० गाड्या जळण सांपडतें. अशा प्रकारें जर सैंव शेतभर कुंपणें असलीं तर कोणाही शेतकऱ्यास किती जळण लागलें तरी या कुंपणा पासून त्याचा पुरवठा होण्याचा संभव आहे.

ज्याला आपण शिकेकाई ह्मणतों त्याचें कुंपण करण्याचा हैसूर व दुसरे कानडी भागांत प्रवात आहे. चांगल्या जमिनीवर कोरकाई पुलीप्रमाणें हीं झाडें लावितात. या झाडांचा काय उपयोग आहे हें कोणास माहीत नाहीं असें नाहीं. सर्व हिंदु लोक बहुत करून आंग व कपडे धुण्याकरितां शिकेकाईचा उपयोग करितात. शिकेकाई गोळा केल्या नंतर झाडें छाटलीं ह्मणजे त्या पासून जळणही मिळतें.

इंगाडल्सिस नांवाचें एक गोड्या चिंचेचें झाड आहे, त्याला लाल व रुचिकर अशीं फळें येतात. त्यांचे कुंपणापासूनही पुष्कळ फायदा होतो. पण हें झाड फार मोठें वाढतें व त्याच्या सावलीमुळें खालील पीक खुरटतें.

या शिवाय मेंदी, टाकळ, एंहेकळ व भिळेल तेथें गुलाब यांचींही कुंपणें चांगलीं. पण पहिल्या दोन प्रकारचीं झाडें कांटेरी नसल्यामुळें त्यांना बाहेरच्या बाजूनें बोरकांट्याचा आधार दिला असतां यांचेंही कुंपण चांगलें होतें व थोडें बहुत जळण ही दरसाल तयार होतें.

कांहीं डोंगराळ भागांत चिल्हारी अगर चिल्हाटीं, चणबोर, एलात्तर यांचीं झाडें मुबलक सांपडतात व त्यांचीं कुंपणें फारच भक्कम बनतात. त्यांना आणकोचीदार दांट कांटे असून त्यांचें कुंपण फार भक्कम तयार होतें. चिल्हारी व एलात्तर ह्या बाभळीच्या जाती आहेत.

या शिवाय निवडुंगाचेंहि कुंपण करीत असतात तेंहि फार चांगलें असतें. तसेंच गजग्याचीं झाडें व वाघनखीचीं झाडें कुंपणाच्या कामीं लावण्याची चाल फार जुनी आहे पण हीं झाडें सर्वत्र उपलब्ध नसतात.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— थंडी चांगली कडक पडते. पारा ४९ अंशा पर्यंत उतरतो, सार्वजानिक आरोग्याला प्लेगा शिवाय दुसरा कोणी शत्रु नाहीं; पण तोच मोठा संहार करीत आहे.

हरास— आज अकरा वाजल्या पासून येथील डिपुटी कमिशनर कचेरींत अबकारी मक्त्यांचा लिलांव होईल.

सेशन— आज पासून सेशन कचेरी आकोल्यास भरणार आहे.

पोंच— ‘ रत्नपरीक्षा ’ आणि ‘ श्री हरी गीता ’ हीं पुस्तकें ग्रंथकार रा. रा. हरी गोविंद त्रिडकर मोतीवाले यांजकडून आलीं त्यांचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

रा. रा. गणेश बापूजी एक्स्ट्रा असि. कमिशनर यांनीं आपली पंधरा महिन्यांची रजा आणखी सहा महिन्यांनीं वाढविली आहे.

नामदार हिवेट चीफ कमिशनर हे पुढील महिन्यांत रजेवर जातील तेव्हां त्यांच्या रजेंत नामदार एफ. एस. पी लेली हे चीफ कमिशनर होतील.

प्लेगाचें मान उत्तरोत्तर वाढतच आहे. गेल्या शुक्रवार पर्यंतच्या आठवड्यांत एकंदर इंडियांत २३०२३ प्लेगाचे मृत्यु झाले. त्यापैकीं मध्यप्रांताच्या वांट्याला ३९८९ आहेत. इलिचपूर व आकोला येथें प्लेग जोरावर आहे. इलिचपुराकडे २० पर्यंत मृत्यूचें प्रमाण आहे आणि आकोल्यास सध्यां दररोजच ८।१० पर्यंतचें मान आहे.

यंदा वऱ्हाडची विद्यापरिषद् प्लेगामुळें भरली नाहीं. ती येत्या २२ वे तारखेला उमरावतीस भरविण्या संबंधानें नवीन डायरेक्टर साहेबांची परवानगी विचारण्यांत आली आहे.

वऱ्हाड मल्लविद्या विषयक समाजाची यंदाची सभा उमरावती येथें येत्या तारीख २७ रोजीं भरणार आहे तेव्हां सभासदांनीं अवश्य जमावें अशी सेक्रेटरी साहेबांची सूचना आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥= |
| सोनें २४।= | | चांदी ७३ |
| ज्वारी ९२ | | जवस ८२ |
| गहू | | ७५ ते ९० |
| बाजरी | | ९९ |
| मीठ | ३॥= | रु. मण |
| चणे | २॥। | रु. मण |
| तूर | ८॥ | रु. मण |
| तेल | ४॥। | रु. मण |
| रुई जीन | | ८० |
| कापूस | | ९९–९६ |

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचे, कमिटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचें, व दोन्ही स्लाटर हौसीसचे कर वसूल करण्याचे सन १९०४-०५ सालचे हक्काचा लिलाव ता० २२ फेब्रुवारी सन १९०४ रोजीं सकाळीं आठ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १९०४ इ०

V. M Mahajani
Vice—Chairman
Municipal Committee
Akola.

## जाहिरात

मुनिसिपाल निवडणुकींचे नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोलें मुनसिपाल कामिटींतील ज्या मेंबरांच्या जागा सदर्हू नियमाप्रमाणें नियम ३१ अन्वयें खालीं होतील त्या भरण्या करितां ता. २५।२६।२७ माहे फेब्रुवारी सन १९०४ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे, खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डपैकीं मेंबर निघाले त्याचीं नांवें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख, जागा, पोलींग आफिसरचें नांव, उमेदवार यांनीं कोणत्या तारखेपर्यंत पोलींग आफिसरकडे मुनिसिपाल नियम १३ अन्वयें आपले अर्ज द्यावे वगैरे माहिती दिली आहे. ता. ६-२-१९०४ इ०

Akola 6—2—1904 } V. M. Mahajani, Vice—Chairman, Municipal C. Akola.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा. | पोलिंग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेचे आंत नांवचे कागद द्यावयाचे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि० जयकृष्ण बगाजी. | २५–२–०४ | पाटील चावडी. | मे० गो० वा० बापट. ए० आसि० कमिशनर | १८–२–०४ |
| | ,, नारायण काशिनाथ दाते. | ,, | | | |
| २ | ,, याकुबखां अहमदखां. | २६–२–०४ | ग्रेनमार्केट आफिस. | | १९–२–०४ |
| | ,, रामचंद्र मार्तंड गुप्ते. | ,, | | | |
| | ,, शंकर नारायण डांगे. | ,, | | | |
| ३ | ,, वासुदेव ल० चिपळूणकर | २७–२–०४ | टाऊनहाल. | | २०–२–०४ |

Akola. 6—2—1904. V. M. Mahajani, Vice—Chairman, Municipal C. Akola.

## NOTICE

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies caused by the retirement of the members in the Akola Municipal Committee under operation of rule 31 of the said rules, will take place, from 7 A. M. to 5 P. M. on the 25th, 26th. and 27th February 1904. The following table gives for each ward the name of the out—going members, the date. and place of election, the name of the Polling Officer and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to this Polling Officer.

Akola. 6—2—1904 } V. M. Mahajani. Vice—Chairman Municipal C. Akola.

| Ward. | Names of out-going members. | Date of election. | Place of election. | Name of the Polling Officer. | Dates before which nomination papers should be delivered. | Remarks. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Jaikrishna Bagaji | 25th. February 1904 | Patel's Chowri | G. W. Bapat Esq. Extra Assistant Commissioner. | 18th. February 1904 | |
| | ,, Narayan Kashinath Date | | | | | |
| 11 | ,, Yakubkhan Ahmedkhan | 26th. February 1904 | Grain Market Office. | | 19th. February 1904 | |
| | ,, Ramchandra M. Gupte | | | | | |
| | ,, S. N. Dange | | | | | |
| 111 | ,, W. L. Chiplunkar | 27th. February 1904 | Town Hall. | | 20th. February 1904 | |

Date Akola. 6th. February 1904 } V. M. Mahajani, Vice—Chairman. Municipal C. Akola.

**बहादर मनुष्य—** बहाळ तालुके चाळीसगांव येथील एका वाण्याचें घर चोर फोडीत असतां महादेव रावजी कुळकर्णी नांवाचे एका मास्तरानें आपल्या जिवावर उदार होऊन एका चोराला मिठी मारून धरलें. त्या चोराचे कमरेस सुरा व हातांत बंदूक भरलेली होती त्याला तो त्याला नाहीं. तसेंच दुसऱ्या चोरानीं त्याला मारिलें तरीही पकडलेल्या चोरास त्यानें सोडलें नाहीं असें समजतें. शाबास ! याला सरकाराकडून बक्षीस मिळणें योग्य आहे. पण—

**चमत्कारिक अनुभव—** मनुष्या प्रमाणें धातूंनाही काम करण्याचा कंटाळा येतो. तारायंत्राच्या तारा शनिवारीं अगदीं थकल्या भागलेल्या असतात, कारण सोमवारपासून त्यांच्या कामाला खळच नसतो. पण रविवारची सुट्टी त्यांच्या अंगीं लागते व त्यामुळें त्यांच्या हातून सोमवारीं फार चांगलें काम होतें. तीन आठवडे जर तारांना विश्रांती मिळाली तर त्यांची प्रवाह वाहक शक्ति (conductivity) शेंकडा १० प्रमाणानें वाढते असा अनुभव आला आहे. ह्यावरून डाक्टर बोस याच्या नवीन शोधा प्रमाणें सर्व निर्जीव वस्तूंच्या ठायीं जीवित आहे यास हा एक पुरावाच होय.

**नवीन यंत्र —** हल्लीं 'टाईप रायटर' नांवाचें टायपानेंच लिहिण्याचें यंत्र निघाल्याचें पुष्कळांस माहित आहेच. ह्या यंत्रात बाजाच्या पेटीसारख्या पट्या असतात. आतां त्याच टाईपरायटरला तारायंत्राच्या तारा लावून लेखावयाच्या आणि त्यांत मजकूर घेण्याचें काम चालूं झालें ह्मणजे खुणांच्या ऐवजीं अक्षरें उठावयाचीं असा शोध एकानें लाविला आहे आणि त्याप्रमाणें त्यानें तें नवें यंत्र तयारही केलें आहे या यंत्रांत हल्लीं दर मिनिटास १६० पर्यंत शब्द वठतात! हीं यंत्रें चालूं झालीं ह्मणजे, टायपानें लिहिलेल्याच तारा लोकांच्या हातांत पडतील !

**भिकाऱ्याची धनदौलत—** आस्ट्रियांतील लिमान ओपेरिक नांवाचा एक भिकारी नुकताच मरण पावला. त्याचें वय ७१ वर्षांचें होतें. तो हातपायांनीं लुला होता. तो चाकाच्या खुर्चीवर बसून दररोज रस्तोरस्ती हिंडून भीक मागत असे. त्यानें आपली एक जमाखर्चाची वहीही ठेवलेली होती. ह्या भिकेच्या धंद्यावर त्यानें जो पैसा जमविला तो मरण समयीं ३० हजार पौंड ह्मणजे सुमारें ४॥ लाखरुपये भरला. शाबास! भिकाऱ्याचा धंदा किती किफायतवार आहे पहा ! भिक्षापती तो लक्षापती ह्मणतात त्याचें हें ठळक उदाहरण होय.

**अमोल लायब्ररी जळाली—** ट्यूरिन युनिव्हर्सिटीमधील नामांकित लायब्ररीस १९ दिवसा खालीं भयंकर आग लागून, तिच्यातील मोठमोठीं मौल्यवान पुस्तकें सर्व जळून गेलीं. लायब्ररींत नेलेल्या विजेच्या तारांतून वीज पातळ होऊन बाहेर पडल्यामुळें ही आग लागली असें ह्मणतात.

**जन्मांध गुणी—** बडोदें येथें कोणी एक [illegible] या नांवाचा गृहस्थ आला आहे. तो जन्मांध असूनही डोडर, म्यॅट्रिक, ज्योतिषी, शतावधानी, शिघ्रकवी वगैरे गुणांनीं युक्त आहे.

**चमत्कार—** वसई किल्ल्यांत एक ताडाचा वृक्ष १०।१२ खांद्या फुटलेला आहे. ताडाच्या झाडास फांदी कधींच नसते. हा ताड हल्लीं जुनाट झाला असून अगदीं पडावयास झाला आहे. त्यापूर्वींच कोणी तरी त्याचा फोटो वगैरे घेऊन ठेवावा अशीहि सूचना आहे.

**पत्रकाराची युक्ति—** मि. स्टेड यानीं आपला डेलीपेपर सुरू करावयाच्या आधीं त्याची प्रसिद्धि होण्याकरितां ज्या युक्त्या योजिल्या होत्या त्याही विलक्षण व अपूर्व होत्या. जाहिरातीकरितां त्यानीं एक मोठें विमान उडविलें होतें. व या विमानामधून पांच पांच पौंडाची एक एक नोट खालीं वेळोवेळीं टाकण्यांत येत होती. ही नोट ज्याच्या हातीं पडेल त्यानें घ्यावी असा नियम केला होता. ह्या पांच पौंडाच्या नोटांच्या आमिषानें लाखों लोकांच्या झुंडीच्या झुंडी स्टेड साहेबांच्या जाहिरातीचें विमान बघावयास आल्या. शिवाय जाहिराती देण्याकरितां लंडनच्या गरीब लोकांस त्यांनीं पुष्कळ चमत्कारिक खेळ व तमाशे फुकट दाखविण्याकरितां आपल्या खर्चानें करविले. या डेली पेपरच्या पहिल्याच दिवशीं दोन लक्ष प्रती खपल्या.

**एकही स्त्री नाहीं—** रशियाच्या व चीनच्या सरहद्दीवर मेईवोचेंग नावाचें एक शहर आहे. जगातील ह्याच एकट्या शहरांत स्त्री ह्मणून नाहीं. सर्वच मनुष्यें आहेत. चिनांतील एकाहि स्त्रीला तेथें राहूं देत नाहींत. ह्या प्रांतांतील सर्व चिनई लोक व्यापारी आहेत.

**कुत्र्यांची धूर्तता—** इजिप्त देशांतील नाईल नदींत पुष्कळ नक्र व सुसरी आहेत. ते त्या नदींत पाणी पिण्यास गेलेल्या कुत्र्यांना पकडतात ह्मणून तेथील कुत्रें नदीच्या वरच्या भागाकडे जाऊन मोठमोठ्यानें भुंकतात व तें भुंकणें ऐकून त्या भागाकडे नक्र व सुसरी धांव घेतात. हें पाहतांच तीं कुत्रीं खालच्या जागीं जाऊन स्वस्थपणें पाणी पितात. ही कुत्र्याची धूर्तता विलक्षण आहे.

**अती जलदी—** कातडीं यंत्रांत घातल्या पासून ३०—३५ मिनिटांत बुटाचा जोड तयार होऊन येतो. इतक्या वेळांत ती कातडी ६० मनुष्यांच्या व १५ यंत्राच्या तडाक्यांतून बाहेर पडते.

**टाईट कॉलरपट्टे—** हे घातल्यापासून मनुष्याची दृष्टी मंदावते असें एका शास्त्रज्ञाचें ह्मणणें आहे. इकडे कॉलरच्या शोकी लोकांनीं लक्ष्य पुरवावें.

जगांतील ⅓ लोक दररोज भाकरी खातात आणि ½ लोक नुसत्या भातावर राहतात असें प्रमाण निघालें आहे.

**हत्तींनीं जीवदान दिलें—** सिलगुरी येथील एक गवळ्याचा मुलगा जंगलांत ह्मशी चारीत बसला होता व जवळच एक लहान मुलगी गोवऱ्या वेंचीत होती. इतक्यांत वाघाचे दोन छावे जवळच्या गुहेंतून बागडत बागडत त्या मुलीकडे आले ती मुलगी त्यांचे कडे पहात आहे तोंच एक मोठी गर्जना झाली व दत्त ह्मणून एक वाघीण त्या मुलीकडे धांवत येत आहे तोंच ती मुलगी त्या मुलाकडे पळाली व झाडा आड लपून बसली. ती वाघीण त्या मुलाजवळ येऊन थडकली व तिनें त्यास जमिनीवर पाडलें व त्यास मारणार तोंच चरत असलेल्या ह्मशींनीं एकदम त्या वाघिणीवर चाल केली व तिला आपल्या शिंगानीं रक्तबंबाळ केलें. ती वाघीण हागानें पिसाळून गेली व तिनें ह्मशीवर उलट खाली पण सर्व ह्मशींनीं आपला बचाव केला. त्या सर्व ह्मशींनीं त्या मुला भोंवतीं वेढा घातला व त्याचा प्राण वाचविण्यासाठीं त्या वाघिणीशीं चांगली झुंज घेऊन तिला पळविलें. या प्रसंगीं तो मुलगा वाचला तरी त्या धास्तीनेंच पुढें चार आठ दिवसांतच त्याचा अंत झाला. ह्मशींचें हें बुद्धि चातुर्य खरोखर आश्चर्यकारकच आहे.

**मजेचा न्याय—** हंगेरी देशांतील एका गांवीं एक इंग्रज मनुष्य गेला व तेथील मुख्य न्यायाधिशाची मुलाखत घेऊन त्यास त्या दरबारचा न्याय पाहण्याची उत्कंठा दर्शविली. न्यायाधिशानें त्यास आपल्या जवळच मोठ्या आदबीनें बसवून घेतलें व खटला पुकारला.

न्यायाधिश—(फिर्यादीस उद्देशून) आपलें ह्मणणें काय आहे ?

फिर्यादी— महाराज, आरोपीनें आमचें बदक चोरलें आहे ?

न्यायाधीश—(साक्षीदारास उद्देशून) तुमचें काय ह्मणणें आहे ?

साक्षीदार— महाराज, आरोपीस बदक चोरतांना मीं पाहिलें.

न्यायाधीश—(आरोपीस उद्देशून) कायरे तूं काय ह्मणतोस.

आरोपी— सरकार मी चोरी केली नाहीं.

इतकें झाल्यावर कोर्टानीं निकाल फर्माविला तो:— आरोपीस १९ दिवसांची शिक्षा, कारण त्यानें चोरी केली. फिर्यादीस १९ दिवसांची शिक्षा, कारण त्यानें आपलीं बदकें बरोबर संभाळलीं नाहींत. आणि साक्षिदारास १९ दिवसांची शिक्षा, कारण त्यानें आपणाकडून हा अन्यायाचा व्यापार केला. येणें प्रमाणें तिघांसही शिक्षा सुनावणी झाली व त्यास कारागृहांत नेऊन बसविलें. इकडे त्या इंग्रज गृहस्थास कोर्टानीं विचारलें कीं, कसें काय, न्याय ठीक झाला ना ! असा न्याय आपल्या कडील कोर्टांत मिळूं लागल्यास लवकरच कोर्टें बंद पडतील.

**धूर्तस्त्री—** मुंबईस एका मुसाफरखान्यांत कांहीं यात्रेकरू उतरले होते. त्यांत एक मुसलमानस्त्री पुरुषाचा वेष घेऊन उतरली व आपलें नाव नवाब सय्यद अहमद असून आपण भोपाळच्या बेगम साहेबाचे नवाबजादे आहों असें सांगितलें. नंतर आपण मक्केला जाणार, कोणाला यावयाचें असल्यास चलावें असें सांगून टिकिटें काढण्या करितां १०।१२ इसमा जवळून ६०० रुपये उपटले. मग शंभर सवाशें रुपयांचे स्वतः करितां उंची कपडे घेतले. पुढें लवकरच ती फरारी होणार इतक्यांत एका यात्रेकरूस संशय येऊन तिला पकडण्यांत आलें व चौकशी अंतीं १ वर्षाची शिक्षा झाली.

**मनुष्याची नवीन जात—** न्यू गिनी मध्यें एक नवीनच माणसांची जात सांपडली आहे ह्मणतात. हीं माणसें ओळसर जागीं राहतात. त्यांचीं घरें झाडावर असतात. त्यास फारसें चालता येत नाहीं. राठ जमिनीवर चालल्यास त्यांच्या पायांतून रक्त निघूं लागतें!

**अनिष्ट मुहूर्त—** गेल्या माघ शुद्ध ५ ला सोलापूर येथील नामजोशी या उपनांवाच्या गृहस्थाच्या धाकट्या मुलाचें लग्न ठरलें होतें, ह्मणून त्याचे पूर्वीचे सोहाळे करण्यांत आले, तोंच त्याला प्लेग झाला आणि ज्यावेळीं लग्नाचा मुहूर्त होता, त्यावेळीं तो वारला! असा दुःखद प्रकार तेथील आणखी एका गृहस्थाच्या घरीं झाला, तो तर त्या लग्नाच्या वेळीं १०।१२ धर्मकार्यें करणार होता!

**अपघात —** मुलतान येथें गेल्या आठवड्यांत एका मोठ्या गृहस्थाच्या मुलाचा लग्नाचा समारंभ होत असतां एक अत्यंत दुःखकारक प्रकार घडून आला. नवरा मुलगा सजून वधूकडे लग्नाकरितां जावयास घोड्यावर बसला, इतक्यांत घोडा भडकून त्यानें नवरदेवास खालीं पाडलें, त्यामुळें त्याच्या डोक्यास जबर इजा होऊन तो तात्काळ मरण पावला. या हृदयद्रावक प्रकारामुळें त्या घरातील सर्व मंडळीस किती दुःख झालें असेल तें वर्णन करणें अशक्य आहे.

**राक्षसी जोडपें—** पारिस येथें नुकतेंच बॅप्टिस्ट ह्युगो नांवाच्या एका राक्षसी पुरुषाचें लग्न झालें. या पुरुषाची उंची सात फूट असून त्याच्या छातीचा घेर ६५ इंच आहे. यास जी बायको मिळाली आहे तीही त्याच्या प्रमाणेंच राक्षसी आकाराची आहे. तिचें नांव मि. ॲग्नीस वायस असें आहे. परमेश्वर या जोडप्यास सलामत ठेवो.

**इष्ट गोष्ट—** मोठ्या जमीनदारांचा वर्ग राहणें इष्ट आहे. तो राहिल्यानें सरकार व लोक या उभयतांसही मदत व मजबुती मिळेल जमिनदारी राहणें इष्ट असेल तर, इस्टेटीच्या वाटण्या होतां उपयोगी नाहींत. त्या झाल्यामुळें जमिनदार वर्ग खालावत आहे. जमीनदार लोकांनीं ह्या गोष्टीकडे मुद्दाम लक्ष पुरवावें.

**काजव्याचे दागिने—** मेक्सिकोमधील स्त्रिया काजवे धरून त्यांना तारेच्या अगदीं लहानशा पिंजऱ्यांत ठेवतात व ते दागिन्या प्रमाणें डोकीच्या केसांत गुतवितात.

**विचित्र चाल—** अमेरिकेतील त्रिटका बेटांतील जर कोणी मनुष्य मेला तर त्याच्या बायकोस नवरा मेल्याचें दुःख प्रदर्शित करण्याकरितां आपल्या तोंडास काळा रंग लावावा लागतो.

REGISTERED No,

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ॥ ॥
पुरे स्पेस.... .........॥

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 15 FEBRUARY 1904 NO 7

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १९०४ इ० अंक ७

### नोटिशीचें उत्तर

रा. रा. शिवलाल काशीराम साहू दुकान मौजे वाडी ता. मलकापूर पोस्ट-नांदुरा यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो ऐसाजे—आपण ता. २१-१-०४ च्या शुद्धवऱ्हाडी पत्रांत दिलेली नोटीस पावली. त्यांतील पुष्कळच गोष्टी तुह्मी खोट्यानोट्या लिहिल्या आहेत. असे. तुमचा आमचा तंबाकूचा शराकतीत व्यापार झाला त्याबद्दलचा जमाखर्च वगैरे कांहींएक टाकहि तुमच्या हातचा आमच्या वहींत नाहीं. दुसरी गोष्ट २ रुपये भाडें ठरलें होतें याबद्दल दुसऱ्या शराकतदाराचा पुरावा आहे ह्यापेक्षां जास्त लिहिणें नको. तिसरी गोष्ट मौजे पाटसिच्या शेताबद्दलचा आहे. तें शेत आपचे बंधु राजश्री शंकरलालजी यांनीं कर्जाचे फेडीत तुमचेपासून खरेदी घेतलें आहे व त्याबद्दलचा तसा लेख वहीमधून लिहिलेला आहे. तेंच शेत आम्हीं त्यापासून घतलें आहे व वहात आहों. अर्थात त्याबद्दल तुह्मास चकार शब्दहि काढण्याचें कारण उरलें नाहीं. शिवाय तुमच्याकडे आमची खाते बाकी निघत आहे. आपण हिशोब पाहून घेऊन सर्व निकाल करावा. तंबाकू आह्मी लवकरच विकून टाकूं व नुकसानी येईल ती तुह्मापासून कोर्ट मार्फत भरून घेऊं. आणि अखेर निकालपर्यंतचा सर्व खर्च तुह्मावर पडेल ह्मणून अगाऊ सुचविलें आहे. कळावे तारीख १२ फेब्रुवारी सन १९०४ इ.

सही ( मारवाडीत )
प्रेमसुखदास कस्तूरचंद
राठी साहुदुकान पाटली.
पोस्ट नांदुरा दस्तुर खुद्द.

### नोटीस

नोटीस देशपी अजी मर्द रंभु राहणार बावनबीर ता.जळगांव हल्लीं मुक्काम उगव ता. आकोट ईसः—

खालीं करणार यानकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझी लग्नाची बायको असून सुमारे एक वर्षापासून आपल्या आई भाऊ यांच्या नादी लागून दीपवाळीच्या निमित्यानें माझ्या येथून तुझ्या भावाबरोबर गेलीस त्या नंतर मी तुला दोन तीन वेळां नेण्यास आलों परंतु तूं आली नाहींस, व तुझी आई व भाऊ व तू या त्रिवर्गांचें ह्मणणें आहे कीं येथें राहण्यास यावें तर तसें होत नाहीं कारण मजला तुझी आई व भाऊ याचा मुळींच विश्वास नाहीं व आई व भाऊ याचें सांगण्यावरून आपल्या संसाराची नासाडी करीत आहेस. तूं गेलीस तेव्हां तुझ्या आंगावर डागिनें नग वाळे पायांतील तोळे ४०, कोपरवाळ्या तोळे ३०, सरी तोळे २० ची साखळी तोळे १९, पाटल्या व पोचंट मिळून तोळे १४, येणें प्रमाणें चांदीचे डागीने सरासरी ११९ तोळ्यांचे आहेत, या शिवाय सोन्याची एक नथ वजन एक तोळा, चार बाळ्या कानांतील सोन्याच्या वजन तोळा एक, येणें प्रमाणें डागिनें आंगावर घेऊन तूं आपल्या भावा बरोबर गेलीस, सबब तुजला या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं तूं नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत डागिन्या सुद्धां निघून यावें. जर तूं सदर्हू मुदतींत आली नाहींस तर तुजवर व तुझ्या आई भावांवर कोर्टांत रीती प्रमाणें फिर्याद करण्यांत येईल यांत जे खासगी रीतीनें व इतर रीतीनें आमचें नुकसान होईल ते रीती प्रमाणें नोटीसखर्च व कोर्ट खर्च या सुद्धां भरून घेण्यांत येईल. कळावे तारीख ९।२।०४

सही
रंभु वल्लद सोनाजी कुणबी आव्हाटोरक राहणार बावनबीर तालुके जळगांव पोष्ट बावनबीर निशाणी खुद्द.

### नोटीस

रा० रा० शंकर भाऊ देशमुख, सुकदेव दत्तात्रय देशमुख, व शामराव दत्तात्रय देशमुख राहणार तुदगांव ता० आकोट पोष्ट तेल्हारा. यांसः–

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे अडसूळ ता. खामगांव येथील शेत सर्वे नंबर ८७ सालीम व सर्वे नंबर ३७ यांतील सहा आण्याचा हिस्सा या शेता संबंधानें तुमच्या व आमच्या दरम्यान तंटा असल्यावरून सदर्हू शेत विद्यमान फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट साहेब ता. खामगांव यांच्या फैसलावरील क्रीस नंबर ९ मिसल नंबर $\frac{१}{१८९७}$ यांत जप्त केली होती त्याचा निकाल आपसांत करून सदर्हू शेतें व त्याचे दरम्यानचे उत्पन्न मजला देण्यांत यावें व रुपये ६०० अक्षरी सहाशे तुह्मास द्यावे अशा आशयाचे अर्ज तुह्मी व मी तारीख २१।९।०३ रोजीं सदर्हू कोर्टांत दाखल केले त्यप्रमाणें सदर्हू शेतें व दरम्यानचे उत्पन्न मजला सरकारांतून मिळालें आहे, तुह्मांस द्यावयाचे ते रुपये ६०० सहाशे घेऊन जाण्याबद्दल तुह्मास या पूर्वीं अनेक वेळां ह्मटलें असतां तुह्मी सदर्हू रक्कम आज पावेतों मजजवळून नेली नाहीं सबब या नोटिसीवरून तुह्मांस कळविण्यांत येतें कीं तुह्मी सदरहु रक्कम वाटेल त्यावेळीं मज जवळून घेऊन जावी असे न केल्यास सदरहु रकमेवर व्याज वगैरे देण्यास मी जबाबदार नाहीं. तुह्मी आजपर्यंत रुपये नेले नाहींत ह्मणून ही नोटीस देणें भाग पडले तर या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख १०।२।१९०४ इसवी

सही
बालमुकुंद कातुरचंद मारवाडी राहणार आडगुळ तालुके खामगांव पोष्ट शेगांव.

### वैश्य महासभा

बालविवाहा संबंधीं ६ ठराव वृंदावननिवासी परम विद्वान मधुरभाषी वैष्णव कुलदीप श्री स्वामी मधुसूदनलालजी गोसाईंजींनीं सभे पुढें मांडला. त्याचा मसुदाः–

ही सभा, मुला मुलींचें लहानपणीं विवाह करण्याची चाल बंद करण्यास व त्यांचें स्वास्थ रक्षणार्थ व त्यांचें शारीरिक बळ वाढविण्यास खालील नियमांचा प्रस्ताव करिते.

१ बिरादरीच्या सर्व लोकल सभेंत व पंचायतींत असा ठराव पास केला जावा कीं लग्नाच्या वेळेस मुलीचें वय कमींतकमी १२ व मुलाचें वय १६ असावें व त्यावर सर्व सभासदांच्या सह्या घेतल्या जाव्यात.

२ सर्व आईबापांनीं दररोज आपल्या मुलांकडून शारीरिक व्यायाम करवून घ्यावेत.

३ मुलगा जोंपर्यंत विद्यार्थी दशेंत आहे व विद्याध्ययन करीत आहे तोंपर्यंत त्याचें ब्रह्मचर्य कायम राखलें जावें.

वरील ठरावा संबंधीं ते ह्मणाले कीं विवाह शब्दाचा अर्थ भार उचलणें होय, लहान मुल काय भार उचलूं शकतो? लहान मुलाकडून जर आपण दस्तऐवज करवून रजिस्टरी करवून घेऊं तर सरकार तो व्यवहार रद्द करितें; परंतु आपण परम सरकार जे देवमंडल त्यांस धोका देऊन बालविवाहाची रजिस्टरी करवून घेतो. बालविवाहा पासून आईबापानां किंचित छोटें सुख पाहावयास मिळत असेल. पण तें सुख ह्मणजे वृद्धांच्या विवाहापासून शेजाऱ्यापाजाऱ्यांनां सौख्य पाहण्यास मिळत तद्वत होय. पूर्वीं विद्यार्थी ब्रह्मचर्य कडकडीत पाळीत असत. विद्या होईपर्यंत मुलांनीं ब्रह्मचारी व्रतानेंच राहणें योग्य आहे. आणि आपण ही गोष्ट विशेष लक्ष्यांत न घेतली तर सर्व देशाची अवनती होणार आहे.

आपण आपल्या मुलांनां विद्वान, बलवान, उद्योगी केलें पाहिजे व जेव्हां ते लग्नाच्या योग्यतेचे होतील तेव्हांच त्यांचा विवाह केला पाहिजे. नाहीं तर विवाहाचा अर्थच होऊं शकत नाहीं. बाल आणि विवाह ह्या दोन शब्दांचा संयोग जुळतच नाहीं. व आजपर्यंत कोणत्याही काव्य कोशामध्यें हा शब्द आढळत नाहीं. बालविवाह हा शब्द मुळीं कल्पित दिसतो. जेव्हां पती आपल्या पत्नीचा भार वहन करण्यास समर्थ होईल व लग्न समारंभातील धर्मवचनें मुला मुलीस बरोबर समजतील व तीं वचनें पाळण्यालायक ते होतील तेव्हांच त्यांचीं लग्नें झालीं पाहिजेत.

या नंतर फरुकाबादनिवासी लालमणीदास शर्मा शास्त्रीजींनीं ब्रह्मचर्य या विषयावर व्याख्यान दिलें त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, ब्रह्मचर्या शिवाय मनुष्याचें सर्व जीवन (आयुष्य) खराब होऊन जातें ब्रह्मचर्य हें केवळ सर्व आश्रमांचें मूळ आहे.

वरील व्याख्याना नंतर राजश्री राय केदारनाथ साहेब जज् झंग (पंजाब) ह्यांनीं अनुमोदन देताना सांगितलें कीं, लग्नाच्या वेळेस मुलाचें वय कमीत कमी १६ वर्षांचें व मुलीचें १२ वर्षांचें अवश्य असलें पाहिजे मुलांच्या लग्न करण्याच्या व त्यांत फाजील पैसा खर्च करण्याच्याच केवळ फिकिरींत न राहतां त्यांच्या कडून जोर दंड कसरत वगैरे शारीरिक व्यायाम हे करवून घेत जावेत. कीं ज्या योगानें आपलें संतान दीर्घायु व धष्टपुष्ट होईल. परंतु आपल्या आयुष्याचा $\frac{१}{४}$ भाग ब्रह्मचर्यांत घालविल्या शिवाय व व्यायाम वगैरे केल्या शिवाय कोणीही दीर्घायु व धष्टपुष्ट होऊं शकत नाहीं. मुलांच्या चालचलनावर (वर्तणुकी) वर नजर ठेवून त्यांना विद्वान, सत्यवादी, व धर्मज्ञ करणें हेंच आपल्या कुळाचें देशाचें व जातीचें कल्याण करणार आहे. मुलांचीं लहानपणींच लग्नें करून त्यांना अल्पायु व बलहीन करून टाकतात ते संतान घातकी कुलघातकी व आत्मघातकी होत. व ते ईश्वरी नियमांविरुद्ध वर्तन करितात.

पुढें वरील ठराव सर्वानुमतें पसार होऊन दुसऱ्या दिवशींचें काम आटोपलें.

तिसरे दिवशीं युनिव्हरसिटी शिक्षणासंबंधीं ७ वा ठराव रायबहादूर बाबू वैजनाथ बी. ए. एफ. ए. यु. महामंत्री वैश्य महासभा यांनीं सभेपुढें मांडला.

१ युनिव्हर्सिटी सरकारच्या आधीन होणें कितपत उचित आहे.

२ दुसऱ्या श्रेणींच्या कालेजांना कायम ठेवणें.

३ कालेजांचे प्रबंध युनिव्हरसिटीच्या हातीं कितपत असावे व कितपत नसावे.

४ विद्यार्थ्यांची फी कमी जास्ती केली जावी कीं काय व जर केली जावी तर कोणत्या दर्जेत.

५ नवीन कालेजांचे युनिव्हरसिटीशीं संबंध जोडण्यासंबंधीं काय नियम पाहिजेत. वगैरे गोष्टींचा योग्य विचार करून सरकारकडे अर्ज पाठविण्या करितां एक कमेटी नेमिली जावी.

सध्यांच्या शिक्षण पद्धतीमुळें आपली मुलें निर्बुध्द व निशक्त होत आहेत. शिक्षण फारच महाग झालें आहे व विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण मिळत नाहीं. हा विषय

कारन महत्वाचा आहे व यामुळे आपल्या मुला मुलींचें व देशाचें बरें वाईट पुष्कळच अवलंबून आहे.

नंतर राजश्री बाबू टीकाराम एम. ए. वकील यांनीं अनुमोदन देताना सांगितलें कीं सरकार शिक्षण महाग करित चाललें आहे. बहुधा असें सांगण्यांत येतें कीं, येथें शिक्षण फार वाढलें आहे, परंतु पाश्चमात्य देशाशीं तुलना करून पाहता आपणांस आढळेल कीं, आपला देश शिक्षणांत फार मागसलेला आहे. इंग्लंडांच्या देशांत शेंकडा पंचवीस शिकलेले विद्वान् लोक आहेत. व तेच आपल्या भारतांत शेंकडा दोन विद्वान् आढळतात. आतां ह्यावरून सिद्ध आहे कीं आपण किती मागसलेले आहोंत व आपणास शिक्षणाची किती आवश्यकता आहे. सर्वांस शिक्षणाचा लाभ मिळावा या करितां तें सुलभ व स्वतंत्र मिळालें पाहिजे.

नंतर खालील गृहस्थांची कमेटी नेमण्यांत आली.

१ रायबहादुर बाबु वैजनाथ बी. ए. एल. एल् बी. आगरा महामंत्री.

२ राजश्री बाबू बैजनाथदास बी. ए. मुनसफ आग्रा

३ राजश्री बाबू टीकाराम एम. ए. वकील

४ नामदार रायनिहालचंद्र साहेब बहादुर

५ राजश्री बाबू रामचंद्र एम. ए डेपुटी-कलेकटर.

ह्या ५ गृहस्थांची कमेटी नेमल्यावर हा ठराव सर्वानुमतें पसार झाला.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १४ शके १८२५

---

## रणसंग्राम

अखेर लढाई सुरूं झाली! शांततेच्या तहाची आशा संपली आणि आतां रशिया व जपान या दोन राष्ट्रांमधील युद्धकांडाच्या पूर्वाध्यायाला प्रारंभ झाला आहे. आशिया खंड ही भावी युद्धांची रणभूमी होय. सध्यांचा मनू असा दिसतो कीं पाश्चात्य राष्ट्रांनीं पूर्व गोलांत लढाया माराव्या आणि तेथें आपली राज्यसत्ता स्थापन करावी. इंडियाचें इंग्रजी राज्य ह्मणजे प्रस्तुत मनूचा मोठा विजयस्तंभच होय. रशिया बलिष्ठ आहे व त्याचें आशियांत राज्य मोठें आहे. पण सध्यां मांचुरिआ पुढील कोरिआच्या भागाची रशियाला फार तृष्णा लागलेली आहे. कोरिआ संबंधानें तंटा आहे. कोरिआच्या किनाऱ्यावर रशिया आपलें साम्राज्य स्थापूं पहात आहे. कोरिआच्या उपसागरांतील रशियन बंदर पोर्ट आर्थर येथें जपानाच्या लढाऊ आरमारानें पहिली चकमक गेल्या सोमवारीं झाडली, तेथें व्यापारी आगबोटी होत्या त्यांचा विध्वंस जपानानें पहिल्या झपाट्यांतच केला. रेटव्हिजन व झारवुइच हीं दोन आरमारें जपानानें रात्रींचा छापा घालून सर केलीं. या प्रमाणें जपानानें रशियावर सरशी मिळविली आहे. मनुष्याला लढायाच्या बातम्या ऐकण्याची मोठी हौस असते आणि ही हौस सध्यांची लढाई चांगली पुरवील अशी उमेद आहे.

कोरिआच्या दक्षिण भागच्या पीत समुद्रांत हें युद्ध चालूं आहे. पण याचा विस्तार फार लांबवर होईल असा रंग दिसतो. जपानाचें नांव पुढें आहे पण जपानाच्या नांवाखालीं युरोपांतील व अमेरिकेंतील राष्ट्रें रशिया बरोबर लढण्याला पुढें उभीं राहतील. फ्रान्स व जर्मनी एका बाजूला मिळतील आणि इंग्लंड व अमेरिका जपानाला मिळतील असें ह्मणतात. सध्यां हीं राष्ट्रें नुसतीं त्रयस्थपणानें पहात आहेत. पण तीं केव्हां हातवाईवर येतील याचा नेम नाहीं. हें रणकंदन पुष्कळ वर्षे धुमसतच होतें रशिया आपलें पाऊल पूर्वेला पुढें टाकीत आहे, इंग्लंड टिबेटाकडे मोर्चा फिरवीत आहे. चिनाची वांटणी करण्याच्या विचारांत पाश्चात्य राष्ट्रें आहेत अशा वेळीं लढाईचा अग्नी कोठें व केव्हां भडकेल हें सांगवत नाहीं. भावी अग्निप्रळयाचीं पूर्वचिन्हें ह्मणजे सांप्रतची लढाई होय. शेवटीं, जो बळी तो कान पिळी, ज्याची समशेर वर तोच विजयी !

---

## हरास

अबकारीचे हरासाची धांदल जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांत दरसाल उडत असते. यवतमाळ, उमरावती व आकोला येथील हरास पुरे झाले. आज वाशिमास हरास पुकारण्यांत येतील व पुढील सोमवारीं बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर आपल्या जिल्ह्याच्या अबकारीचे हरास करितील. हरासांचें उत्पन्न फार दांडगें आहे. यवतमाळाला पुष्कळ दांडगा वाढवा आला आहे. उमरावतीस व आकोल्यास सरकारी अबकारी उत्पन्न हजारो रुपयांनीं वाढलें आहे. कालमानाच्या धोरणानें वाशिम व बुलढाणा येथीलहि हरासांत सरकारी इच्छा संतृप्त होतील असें वाटतें. यंदा अबकारीचें उत्पन्न फारच वाढत आहे याला यंदाच्या पीकापाण्याची आबादानी हें पहिलें कारण असावें असें वाटतें, पण या सुबत्तेच्या कारणाचा आह्मांस फारसा भरंवसा पटत नाहीं. वस्तुस्थिती निराळीच असावी असें आह्मांस वाटतें, तिचा मासला थोडासा येथील हरासाच्या वेळीं गेल्या सोमवारीं दृष्टीस पडला. आकोल्याच्या कलाली दुकानांचा मक्ता हरास झाला तेव्हां त्याची ४० हजार रुपये किंमत आली. गेल्या तीन वर्षांचे ढोबळ आंकडे २१२८ व ४० हजार असे आहेत. या आंकड्यांतील फरक ह्मणजे गरुड पक्ष्याचें उड्डाणच होय. तिन्ही सालांचे मक्तेदार चांगलासा फायदा नाहीं ह्मणून ओरडत असतच देशी दारू, अफू, गांजा व शिंदी यांच्या हरासाचे आंकडे अनुक्रमें येणें प्रमाणें आहेत:—

| | रुपये |
|---|---|
| देशीदारू | १,७०,५३० |
| अफू | ५७६१० |
| गांजा | ९२८५ |
| शिंदी | १३६० |
| एकूण | २,३८७८५ |

आकोला जिल्ह्याचे आंकडे यंदा वाढलेले आहेत जी आकोल्याची स्थिती ती सर्व प्रांताची निदर्शक होय. सालोसाल हरासाचे आंकडे वाढत आहेत याबद्दल आनंद मानावा किंवा विषाद मानावा हें आह्मांस समजत नाहीं.

गेल्या तीन वर्षांत हरासांच्या रकमा किती झपाट्यानें वाढत चालल्या आहेत यांची कल्पना खालील आंकड्यावरून चांगली होईल.

| हरासाचें साल. | उत्पन्नाची रक्कम. |
|---|---|
| १९०१ | ६८५८६९ |
| १९०२ | ९३८३५९ |
| १९०३ | १०,६४७५७ |

या तीन वर्षांतच अबकारी हरासांचें उत्पन्न दुपटीपर्यंत येऊन पोचलें आहे.

सरकारी अबकारीचें उत्पन्न वाढत आहे याला कारण मक्तेदारांची स्पर्धा होय. कलाला मक्तेदारास दुसरा उद्योग नाहीं, आणि लिलावाच्या वेळीं इतकी ईर्षा चढते कीं, कोणालाही तेथें हार घेववत नाहीं या चढाओढीनें सरकारी खजिना तुडुंब भरला जात आहे. मक्तेदार लोक कसा तरी धंदा चालवितात आणि व्यसनी लोक मद्यादिकांचें सेवन चालूंच ठेवितात. कदाचित् लोक अधीक व्यसनाला आधीन होत असतील, परंतु त्यापेक्षां वाईट गोष्ट ह्मटली ह्मणजे व्यसनाच्या पायीं लोक अधीक भिकारी होत चालले आहेत. गरीब लोकांस त्यांची मद्यादि पेयें महाग पडल्यानें ते अधीक नीतीमान होतील हा विचार चुकीचा आहे. हीं व्यसनें कांहीं मर्यादेच्या पलिकडे कमी होण्याचा संभव नाहीं आणि ही कनिष्ट मर्यादा होऊन चुकली आहे. याच्यापुढें व्यसनांचे पदार्थ महाग करणें ह्मणजे गरीब प्रजेची बुडणूक सरकाराच्या हातून होत आहे असा सारांश निघतो.

---

## नवा श्रीग.

मागील एक दोन अंकांत आह्मी विस्तारानें उल्लेख केलाच आहे कीं, पूर्वीच्या काळीं आपल्या हिंदु स्त्रियांचें शिक्षण बरोबरच ह्मणजे पाठ शाळेंत न जाता व पुस्तकें न वाचतांच होत असें. मुलींना घरच्या वरीष्ठ वडिलधारि माणसांनीं गृहसंसार व वाङ्मय शिकवीत आणि कथापुराणांतील गोष्टींनीं त्यांची मनें सुशिक्षित व सुसंस्कृत होत. त्यावेळच्या मुलींना सध्यांच्या काळांतल्या मुली प्रमाणें नानाविध कलाकुसरी शिकण्याची महत्वाकांक्षा नसे, तरी गृहाच्या अंतर्दृष्टीचीं कार्यें त्याच उत्कृष्ट करीत असत. जगांत स्त्रीचें असें विशिष्ट कर्तव्य काय आहे हें सर्व समाजाला कळूं लागल्या पासून स्त्रीची खरी महती समजली व आतां गृहदेवीचें स्थानीं तिची प्रस्थापना झाली आहे. मातृपदवीस पोहोंचल्यावर स्त्रीच्या अंगावर अत्यंत बिकट अशीं कामें येऊन पडतात. आणि हीं कामें तिच्या हातून चांगलीं पार पडलीं ह्मणजे तिची इतिकर्तव्यता संपूर्ण होत असे. आपल्या मुलांना लहानाचे मोठे करून त्यांस शहाणे करावयाचें या महत् बिकट कार्यांत तिचें सर्व आयुष्य वेचें. मुलांचें संगोपन करणें, त्यांस चांगली शिक्षा लावणें, व त्यांस सद्वर्तनी करणें हें काम त्या स्त्रियांनींच करावें. पुरुषांच्या हातून हीं कामें होत नाहींत असा सर्वत्र अनुभव आहे. मुलांना सद्गुणांचें वळण व सद्वर्तनाचा कित्ता हा एकटी त्यांची आईच घालून देण्यास समर्थ असे. आपल्यास लौकिक रीत्या चार दोन मुलें होऊन त्यांचीं लग्नकार्यें व्हावींत व तीं नांवलौकिकास चढावींत हीच स्त्रियांची खरी महत्वाकांक्षा असे. आपण कष्ट खाऊन मुलांच्या सौख्याची सांठवण करणें हीच खऱ्या स्त्रीत्वाची थोरवी मानीत असत.

परंतु पूर्वीचा तो काळ आतां उरला नाहीं. सध्यां नवीन मनु प्राप्त झालेला आहे. ह्या नव्या मन्वंतरांत आपली ती जुनी समाजस्थिती जशीच्या तशीच कायम राहणें शक्य नाहीं. अर्थातच समाजस्थिती बरोबर स्त्रीशिक्षणाचें तें पूर्व रंगरूपहि पालटून जाणें हें अगदीं स्वाभाविकच आहे. आपल्या हिंदु समाजाचें अगदीं निराळेंच स्थित्यंतर झालें आहे. पूर्वीच्या त्या जुन्या कल्पना व ते जुने विचार बाजूला पडले आहेत आणि नवीन विचारकल्पनांचें राज्य थाटत आहे. आणि ह्या राज्यांत श्री हीच मुख्य आराध्य दैवत बनली आहे. मनुष्य जितका आत्मसंयमी व परमार्थी असेल ह्मणजे त्याच्या मनाला स्वसुखाचा ओढा जितका कमी असेल व दुसऱ्यास सुखविण्यांत त्याच्या मनाला जितका जास्त आनंद वाटत असेल तितका तो मनुष्य पूर्णत्वास पोहोंचला अशी जी आपली पूर्वापारची जुनी समजूत ती आतां कोणाचीहि मानवत नाहीं. तसेंच पूर्वीचे ते गोड सद्गुण आणि कुटुंबांतील सर्व माणसावर जडलेली प्रीति, आणि प्राणिमात्राठायीं वसतें असलेलें तें निष्कपट प्रेम हीं सर्व लोपलीं आहेत.

आतां मनुष्यास स्वतांचाच जीव अत्यंत प्यार वाटत आहे, संपत्तीचे ठायीं त्याचें अंतःकरण अत्यंत लुब्ध झालें आहे; आणि ही संपत्ती जवळ कशी करावी हीच विशिष्ट काळजी त्यास लागली आहे पण ५०–६० वर्षांच्या पूर्वी अशी स्थिती आपली नव्हती. पूर्वी कुटुंब हेंच समाजाचें घटकावयव असे, आणि ह्या सर्व कुटुंबाच्या सौख्यासाठीं प्रत्येकजण झटत असे; पण आतां कुटुंब जाऊन व्यक्तीच तें घटकावयव बनलें आहे, आणि मनुष्य आपल्या फक्त एकट्या स्वतांच्याच सौख्यासाठीं झटण्यास तत्पर असतो. अशा रीतीनें आपल्या समाजाची बसलेली घडी विसकटली आहे आणि याचें कारण ह्मटलें ह्मणजे हिंदु धर्माची ग्लानि आणि पश्चिमेकडील शिक्षणाचा परिणाम हीं होत.

कांहीहि असो, आपल्या समाजास निराळें स्वरूप प्राप्त झालें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि ह्या स्थित्यंत-

## नोटीस

बेशमी मानाजी वल्लद खानाजी पाटील राहणार मौजे झांडोग प्रगणें शिरपूर तालुके व जिल्हा वाशीम यांस:—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची गंधर्वाची बायको असून तुम्ही मजला काय ते १ एक महिना पर्यंत वागविलें. पुढें तुम्ही मला हटविलें कीं मी आतां तुला वागवित नाहीं. वरून मी आपले मापाचे गावीं जाऊन अलग राहिले यद्यपि मी १।२ वेळां तुझे पाशीं आलें परंतु तुला मला वागविण्याचे नाहीं असे दिसून आले इतकेंच करून पुन्हा मी ५।७ वेळां तुला निरोपहीं कळविले तरी तुम्ही मला नेले नाहीं तरी या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत मी लोकांचे ३ वर्षांत कर्ज काढून राहिले आहे त्या कर्जाची अदाई करून तुम्ही मला घेऊन जावे तसे तुम्ही करणार नाहीं तर मी दुसरा घरठाव करीन हे तुम्ही खूप समजावे नंतर तुमचा हक्क मजवर राहणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली तारीख ११-२-०४

सही

अलयान मर्द मानाजी राहणार

खोणी गवळी निशानी हातची

बांगडी.

---

## शिवकल्याणांची

## रासपंचाध्यायीवरील

### विस्तृत ओवीबद्ध टीका

आजपर्यंत प्रसिद्ध न झालेला हा सुरस ग्रंथ जुन्या हस्तलिखित प्रतीवरून छापून काढण्याचा आमचा विचार आहे. ग्रंथ येत्या वर्ष प्रतिपदेस छापुन तयार होईल. ग्रंथाची किंमत सारी १ रुपया आहे

ग्रंथ सुमारे साडेचार हजार असल्यामुळें १ रुपया म्हणजे अगदींच थोडी कींमत आहे टाईप साधारण मोठा वापरूं वर्गणी पाठविणें ती डा० दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर आकोला याचेकडे पाठवावी. वर्गणीदारांचीं नावें प्रसिद्ध केलीं जातील. पुस्तकाचें सर्व उत्पन्न दुसरे जुने ग्रंथ प्रसिद्ध करण्याकडे लावणार आहों. परमेश्वराची इच्छा असल्यास रकम हळूहळू वाढत जाऊन पुष्कळ जुने ग्रंथ बाहेर निघतील. असो. सध्यास अधिक लिहून उपयोग नाहीं.

आकोला २६।१।१९०४ } गणेश बळवंत मोडक बी. ए. संपादक.

---

### ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व मागे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, असो सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उम्हाळे, इंद्रिय शिथिलता फडकी, गर्मी संबंधी सुरलेले विकार, मूत्रपं, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहीत एकदम चार रुपयांवर किंतीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ८० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डी सांगत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः —

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ गों० | १ रु० | ७५ गों० | २ रु० |
| ११५ गों० | ३ रु० | १६५ गों० | ४ रु० |
| २७३ गों० | ६ रु० | ५५० गों० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें भातुर्नी भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

**सूचना**—अलिकडे २।३ वर्षे आंजर्ले वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून यांनीं आमचेच जाहिरातींची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली

जि० रत्नागिरी

---

## ORIENTALGOVERNMENT SECURTY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C P . Berar & Khandesh*

Head—quarters— Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

---

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—it in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policie matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress Life Assurance is a means by which this danger is got over Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दंताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... -॥-

दांतावर जाळें जमणे, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारच्या दुखण्यां नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अॅण्ड कंम्पनी मथुरा.

---

## मुंबई बॅंकचीं सेव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

---

## स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

---

## जाहिरात

### केडावर खात्रीचें औषध

हटकून गुण डबोस -२ रुपये.

व्हीं. एम. जोशी
पोलिस टाऊन नजीक उमरावती
प्रांत वऱ्हाड.

---

वाचा ! वाचा !

( मौजच मौज. हंसूंच हंसूंच )

तुमचा वेळ आनंदात जावा अशी तुमची इच्छा आहे काय ?
असल्यास खालील पुस्तकें एकवार वाचाच.

मोठमोठ्यांचें अभिप्राय मिळालेले आहेत.

**नवीन तयार झालेली पुस्तकें.**

बंधुप्रेम अथवा सुंदरराव हंबीरराव,
किं० १॥ रु.

भगिनीप्रेम अथवा कामांध राजपुत्र.
कि० १ रु०

दोन्ही एकदम घेणारास २ रुपयांत मिळतील. व्ही. पी. ट. ख, माफ.

वासुदेव जनार्दन लेले,
बुकसेलर–मिरज.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे ' वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

राला अनुकूल असा नवीन जोम युरोपियन सुधारणेच्या हवापाण्यानें स्त्रिशिक्षणाला आलाच पाहिजे. पूर्वीचेच ते स्त्रीशिक्षणाचे धडे शिकून आतां निभाव लागणार नाहीं. आतांच्या नवीन विचारकल्पना प्रमाणें स्त्रिया चांगल्या निवण्यास ते धडे फारसे उपयोगीं पडणार नाहींत. आतां स्त्रियांनीं नवीन धड्यांचा अभ्यास केला पाहिजे. आत्मसंयमन व स्वसुखाचे ठायीं निरभिलाषवृत्ती हे जे आपल्या स्त्रियांचें विशिष्ट गुण त्यांची आतां जरुरी नाहीं, इतकेंच नव्हे तर ते प्रसंगविशेषीं दुर्गुणांतच गणले जातील. अलीकडील नवीन सुधारलेल्या पद्धती प्रमाणें स्त्रियांनीं शाळांतील पुस्तकी शिक्षण मिळविलें पाहिजे. त्या अशा सुशिक्षित होणार नाहींत तर पतिपत्नींचा जोडा चांगला शोभणार नाहीं व दोघांचें नीटसें जुळणारही नाहीं. गायन, वादन, चित्रलेखनादि कळाकुसरींच्या गुणसमुच्चयांचेंहि शिक्षण त्यांस मिळणें अगदीं आवश्यक आहे. आणि जों जों आपला समाज बदलत जाईल आणि जों जों पाश्चिमात्य आचारविचारांची आपली आवडी वाढत जाईल तों तों आपल्या मुलीनीं व स्त्रियांनीं पाश्चिमात्य लोकांच्या स्त्रियांचें अनुकरण करून हुबेहूब त्यांच्या प्रमाणेंच व्हावें ह्मणजे त्यांच्याच चालीरीती, पेहराव, शिक्षण इ० सर्व त्यांच्या सारखेंच असावें असें आपणांस वाटणार आहे.

पन्नास वर्षांपूर्वी जे कांहीं थोर महात्मे व सुधारक आपल्या स्त्रिया अगदींच अज्ञ व अशिक्षित आहेत असें ह्मणत होते, त्यांची आपल्या पूर्वीच्या स्त्री शिक्षणाबद्दलची कल्पना फार कोती होती असें ह्मटलें पाहिजे. कारण स्त्रिया विद्वान नसल्या तरी त्या काळच्या समाजस्थिती प्रमाणें त्या चांगल्याच सुशिक्षित होत्या हें आपण पाहिलेंच आहे. परंतु पुढें आपला हिंदु समाज युरोपियन धरतीवर सुधारणार आहे असें पूर्वीच जाणून जर शाळेंतील शिक्षण स्त्रियांना द्यावें असें त्यांनीं सांगितलें असेल तर त्यांचें दूरदर्शित्व आश्चर्य करण्याजोगें आहे यांत शंका नाहीं, तसेंच जे कोणी पूर्वीच्या पद्धतीचा अभिमान धरणारे लोक शंभर वर्षां पूर्वीचीच हिंदुसमाज स्थिती सद्यः कालींहि उर्जित करण्याची मनीषा धरतील तर त्यांची तीहि गोष्ट वावगीच होणार आहे. पश्चिमेकडून आलेले नवीन विचार हिंदु समाजास निराळे कांहीं तरी चांगलें वाईट वळण देणारच. आणि अशा वळणास बंद करण्याचें सामर्थ्य मनुष्याच्या शक्तीच्या बाहेर आहे. तरी पण आपणांस रुचल्यास एक गोष्ट करितां येण्या सारखी आहे. या नवीन वळणांत थोडा बहुत फरक आपणांस करितां येणार आहे. आणि ही गोष्ट आपल्या राष्ट्राच्या विशिष्ट खाणाखुणा कायम ठेवुन आपण केल्यास बरें होईल. कोणच्याहि दृष्टीनें पाहतां हेंच दिसतें कीं आपण स्त्री शिक्षणाच्या पद्धतींत बराचसा फेरफार केला पाहिजे.

मुलाप्रमाणें मुलींनाहि उच्च शिक्षण मिळालें पाहिजे. परतु विश्वविद्यालयांतलें (युनिव्हर्सिटी) शिक्षण व परीक्षा ह्या मात्र आमच्या स्त्रियांस सध्यां नको आहेत. शाळामधील शिक्षणानें पदवीवर मनुष्याच्या अनुरूप अशी स्त्री मिळण्यास हरकत पडणार नाहीं. नवीन शिक्षण मिळवून पूर्वीच्या हिंदु स्त्रिया प्रमाणेंच ती सत्वशील राहील तर ती गोष्ट विशेषच आनंदाची होणार आहे.

---

अलीकडे स्त्रीशिक्षणाचा मुख्य प्रांत ह्मटला ह्मणजे पुस्तकी विद्या होय. आणि या शिक्षणाच्या व्याख्येनें पूर्वीच्या स्त्रियांना शिक्षणाचा गंध नव्हता व त्या अज्ञ व प्रमूढ असत असा तात्कालिक अभिप्राय पडावा हें रास्तच आहे. अलीकडील स्त्रीशिक्षण स्त्रियांना पुरुषांच्या वर्गामध्यें बसविते इतकेंच नाहीं तर स्त्रिया आपल्या गृहीणी पदाच्या कार्यमालेंतहि अनधिकारी व अपात्र होत आहेत. आणि विचाराच्या या बाजूनें आह्मी ह्मणतों कीं, या पुस्तकी विद्येचा संस्कार नसलेल्या पूर्वीच्या स्त्रिया विद्वान् नसल्या तरी निःसंशय आपल्या गृह कार्याला खरोखर पात्र असत. आणि सांप्रतच्या प्रमाणें त्या विदुषी नसल्या तरी त्या सुशिक्षित होत्या ही गोष्ट निर्विवाद होय. पुरुषाची कार्यमाला ह्मणजे बाह्य सृष्टींत आहे आणि अलीकडच्या विद्यांनीं स्त्रिया आहि पुरुषाच्या बाह्य सृष्टींतच त्याच्या प्रतिस्पर्धी होऊं लागल्या आहेत. बाह्य सृष्टींत त्यांचा संचार झाल्यामुळें गृहाच्या अंतर सृष्टीच्या कार्यमालेपासून त्या विशेषच दूर दूर जात चालल्या आहेत. हा स्त्री शिक्षणांतील दोष उत्तरोत्तर वाढत जात असल्यामुळें भावी स्त्रिया खरोखर सुशिक्षित होत जातील अशा विषयीं मन संशयित होतें. आपल्या समाजाला तर स्त्रीवर्ग सुशिक्षित पाहिजे आहे आणि तो कमी विद्वान् असला तरी चालेल. स्त्रियांचे अंगभूत सद्गुण उन्नत होतील, त्यांची कार्यदृष्टी गृह चक्रांत विशेष तीव्र व सर्व व्यापी होईल आणि त्या खरोखरच गृहलक्ष्मीच्या योग्यतेला पोहोंचतील असाच शिक्षण क्रम व्हावयाला पाहिजे.

---

## पापाचा घडा

हा केव्हां भरेल याचा नेम नवतो. येथील सेशन कचेरीचें काम शुक्रवार पर्यंत चाललें होतें. एकच सदोष मनुष्यवधाचा खटला होता. धनज तालुका पुसद येथील पुंजाजी नांवाचा एक आरोपी होता. गुन्ह्याची हकीकत थोडी विचित्र आहे. पुंजाजीची बायको कमळी ही ता० १४।१०।०३ रोजीं आपल्या शेतांत काम करण्यास गेली. तेथें धनजचा कलाल श्यामलाल हा तिच्या मागोमाग गेला. दिवसा दहा अकरा वाजतांच कमळी व श्यामलाल हीं शेतांतील गवताच्या नाल्यांत रममाण झालीं. पुंजाजीला पूर्वीचा संशय होता कीं काय कोण जाणे! तोही त्यांच्या त्या संकेत स्थळीं गेला. त्याच्या दृष्टीला तो व्यभिचार पडतांच त्यानें कुऱ्हाडीनें श्यामलालाचा शिरच्छेद केला. दुसरा कुऱ्हाडीचा घांव कमळीवर पडत आहे इतक्यांत तिनें त्याची मोठी काकुळती करून सांगितलें कीं, श्यामलालनें हा बलात्कार केला आहे. ही बतावणी त्याला खरी वाटली, तिच्या त्या मायेच्या शब्दांवर भरंवसा पटला, क्षणभर विचाराला फुरसत मिळाली आणि त्या बरोबर कुऱ्हाड हातची गळाली! या रीतीनें कमळीचा प्राण वांचला. पुंजाजी हा श्यामलालचा विश्वासूक नोकरवजा दोस्त होता श्यामलालचा पत्ता लागेना व त्याचा बाप माजादान यालाहि त्याबद्दलचे कांहाच गूढ उकलेना. पुढें पुंजाजी व कमळी ही दोन दिवसांनीं परागंदा झालीं. पोलिसांत रिपोर्ट झाला पण पंधरा दिवस पर्यंत कोठेंच मागमूस लागला नाहीं. २९ आक्टोबराला श्यामलालच्या प्रेताच्या खाणाखुणा लागल्या. त्याचा पटका तेथें पडलेला बापानें ओळखला. पुढें पुंजाजी व कमळी यांचा लवकरच पत्ता लागला. कमळीनें गोष्ट घडली तशी सांगितली. पुंजाजीनेंही तहशिलदारापुढें पुराव्यानिशी कबूली जबाब दिला आणि तोच जबाब वाशिमच्या कोर्टी समोर त्यानें द्विरुक्त केला. सेशनांत पुंजाजीनें कानावर हात ठेविला व वेडसरपणाचें सोंग घेतलें. पण त्याची ती कमळी सर्व वृतान्त सांगण्याला जीवंतच होती. तिनें त्या प्राणदात्या पुंजाजी विरुद्ध साक्ष दिली. पण इतर पुराव्याची नीटशी बळकटी नसल्यामुळें पुंजाजीला गेल्या शुक्रवारीं दोषमुक्त करून सोडण्यांत आलें. भला बिचारा नशीबवाला! त्याची ती कमळी पतीसेवा करण्याला विद्यमान आहेच. व्यभिचारोत्थ हें कथानक ओंगळ खरें पण तें पापी नरास विभागी पाडून सोडवो!

---

## खेळाचा कार्यक्रम

गेल्या नवंबर महिन्यांत उमरावतीस प्लेग असल्यामुळें गेल्या वर्षीच्या शिक्षक समाजाची बैठक लांबणीवर पडली होती ती आतां पुढील आठवड्यांत होणार आहे. शिक्षक समाज ही कांहीं अंशीं उपयुक्त संस्था आहे व वर्षांतून एकदां पुष्कळ ठिकाणचे शिक्षक एकत्र जमून शिक्षक संबंधीं विषयांची चर्चा होत असते व निरनिराळ्या ठिकाणच्या शिक्षकांस एकमेकांचे अनुभव ताडून पहातां येतात. असो. या संस्थेची वऱ्हाडच्या लोकांस तरी माहिती करून देण्याची जरूर नाहीं रा. रा. क्यांडी साहेब येथें आल्या पासून त्यांनीं या संस्थेस जोडूनच दुसरी एक संस्था काढली आहे. ती ह्मणजे मुलांसाठीं दोन दिवस होणारे खेळ होत. यंदाचे खेळ २६ व २७ तारखेस होणार आहेत व यंदाच्या कार्यक्रमांत एक दोन अधिक देशी खेळांस जागा मिळाली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. यंदा पहिल्या दिवशीं ह्मणजे ता. २६ रोजीं सकाळीं कुस्त्या होतील व नंतर पारलल बार, हॉरिझांटल बार व मलखांबावरील हात होऊन पुढें दांडपट्याचे कांहीं हात होतील दोन प्रहरीं ११ वाजल्यापासून उमरावती व आकोला येथील हायस्कुलांतील मुलांमध्यें क्रिकेटचा सामना होईल. दुसऱ्या दिवशीं ता. २७ रोजीं सकाळीं सभा होईल व सायंकाळीं २ पासून ६ पर्यंत पळण्याच्या वगैरे शर्यती, दांडपट्टा, कुस्त्या इत्यादि खेळ होऊन शेवटीं रस्सीखेची होईल. आणि सायंकाळचे सहा वाजतां बक्षिसें वांटण्यांत येतील.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— उत्तरोत्तर थंडीचें मान बदलून उष्मा होऊं लागला आहे. सध्यां आकोल्यास प्लेगाचा आजार वाढला असून दररोज १०।१५ मृत्यू होतात.

मि० सिम्पसन साहेब असि० कमि० हे १ जून १९०३ रोजीं निवर्तल्यामुळें खालील प्रमाणें बढत्या देण्यांत आल्याः—

| | असि० कमिशनर |
|---|---|
| मेजर माडवी | १ ला वर्ग. |
| मि० क्रे | २ रा वर्ग. |

या शिवाय खालील अधिकाऱ्यांस १ ले जून १९०३ पासूनच बढती मिळाली आहेः—

| | असि० कमिशनर |
|---|---|
| क्याप्टन मारिस | १ ला वर्ग |
| मि० करी | २ रा वर्ग |

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. विट्ठल नारायण काळीकर, तहशिलदार, यवतमाळ यांस एकाएकी काळजाच्या आजारानें तारीख ४ रोजीं देवाज्ञा झाली. राजश्री दाजी साहेब हे आपल्या सद्गुणांनीं या थोर हुद्याला पोचले होते. मध्यंतरीं त्यांची बढती एक्स्ट्रा. असि. कमिशनरीच्या वर्गांत झालेली होती. हे स्नेहाला फार प्रेमळ व स्वभावानें फार गोड व विनोदी असल्यामुळें यांची लोकप्रीयता विशेष असे. काळजाचा रोग मनुष्याला क्षणार्धांत देवाधीन करितो. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें आप्तमित्रांची मोठी हानी झाली. पण हरीच्छा बलीयसी!

रा. रा. शेख महमद अबदूल अझिज, नायब तहशिलदार वर्ग १ ला यांचा एक वर्ग कमी करून त्यांस २ ऱ्या वर्गाचे नायब तहशीलदार १ले जानेवारी पासून करण्यांत आलें. रा. रा. आरदेसर दिनसाजी चिनाय आणि ते स्वतां यांच्यामध्यें झालेल्या मारामारीचा हा शेवट असावा.

नवीन धोंड— वऱ्हाडाला इन्कमटॅक्स प्रथमतःच लागूं करण्यांत आला आहे. हा नव्या राज्य संबंधाचा पहिला सुखकर परिणाम होय.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=॥ |
| सोनें २४।= | चांदी ७१। |
| जवारी ५८ | कवस ७६ |
| गहूं | ९० |
| बाजरी | ६० |
| पीठ | ३॥=। रु. मण |
| चणे | ३८= रु. मण |
| तूप | ८॥ रु. मण |
| तेल | ४॥। रु. मण |
| रुई जीन | ८० |
| कापूस | ५५–५६ |

---

अप्रतिम उत्सव— बडोद्याचे युवराज श्रीमंत फत्तेसिंह यांचा विवाह निंबाळकरांच्या घराण्यांतील उपवर कन्येशीं झाला. हा समारंभ फार सार्वोत्कृष्ट झाला इतकेंच नाहीं तर जुन्या राहशतीची यानें बरीच आठवण दिली. परमेश्वर नव दंपत्तीना चिरायु व सुखी ठेवो.

**अपूर्व चमत्कार**— बंगाल्यांत एका नवीनदारास एक तीन वर्षांचा मुलगा आहे. तो मोठ्या मनुष्या प्रमाणें नाना प्रकारच्या गत गोष्टी बोलतो. त्यानें "आपण पूर्व जन्मीं अमूक गांवीं अमूक एका घराण्याचे मालक होतो, अमूक इस्टेट माझी होती, वगैरे" सांगितल्यावरून त्या गांवचे त्याचे आप्तसंबंधी स्त्री पुरुष वगैरे आले व त्यांनीं त्या मुलाला पुष्कळ खाणाखुणा विचारल्या, त्या सर्व जमूं लागल्या. या मुलानें असें कांहीं मागील सांगितलें ह्मणून त्याला एकादा दिवस बेशुद्धी होती. सांगतां सांगतां त्यानें असेंही सांगितलें कीं, "माझ्या दुसऱ्या बायकोच्या मुलानें मला ठार मारल्यामुळें मी मेलों." यावरून या गांवीं मोठी चळवळ चालू आहे.

**राज्याचा कंटाळा**— जोहारचे सुलतान साहेब नुकतेच कालंबोहून युरोपच्या यात्रेला निघून गेले. त्यांचा मानस आपलें सर्व राज्य इंग्रज सरकारचे हवालीं करून त्यांजपासून एक मोठें वर्षासन घेऊन स्वस्थ बसावें असा आहे. सरकार मनकामना पूर्ण करील.

**वाकानेर येथील नवीन कायदा**— काठेवाड एजन्सीपैकीं वाकानेर संस्थानच्या अधिकाऱ्यांनीं असा कायदा केला आहे कीं, दररोज रात्रीं नऊ वाजतां तोफ सोडण्यांत येईल. यानंतर शहरांतील रस्त्यावर लोकांस फिरण्याची मनाई करण्यांत आली आहे. जर कोणास जरूरीच्या कामानिमित्त बाहेर फिरावयाचें असेल तर त्यानें आपल्या बरोबर कंदील ठेवला पाहिजे. शहरांत रात्रीच्या वेळीं लुच्चे लफंगे व रिकामटेकड्या लोकांचा त्रास होऊं नये ह्मणून हा नियम करण्यांत आला आहे.

**एका नाटकांत विदुषकाचें अकस्मात् मरण**— मिनाआपोलीस येथील नाटकगृहांत नुकताच एक खेदकारक प्रकार घडून आला. रॉबर्ट मॅटसन नांवाचा एक मनुष्य विदुषकाचें सोंग घेऊन रंगभूमीवर आला. त्यास नायिकेच्या पात्रानें खंजीर खुपसून मारावयाचें असा प्रयोगांतील भाग होता. पण नायिकेच्या पात्राच्या चुकीमुळें, विदुषकानें आपल्या छातीस बांधलेल्या ढालीच्या जागीं खंजिराचा घाव न बसतां तो जरा वरच्या बाजूस जोरानें बसला. त्याबरोबर विदुषकाच्या पात्राच्या फुफ्फुसांत खंजीर घुसून त्याचा रंगभूमीवर दाखविण्या पुरता अंत होण्या ऐवजीं खरोखरच अंत झाला. नाटकांत खुनादी कामें करणाऱ्या लोकांनीं या गोष्टीवरून सावधगिरीनें वागावें.

**आकस्मिक नाश**— उत्तर हिंदुस्थानांत माटिंडा नांवाच्या किल्ल्यांत दारूगोळ्याच्या एका साठ्यास एकाएकीं आग लागून फार नुकसान झालें. त्यासंबंधाची सविस्तर माहिती अशी समजते कीं, त्या दारूच्या सांठ्यासभोंवार पुष्कळ लोक जमा झाले होते कारण दारूचा लिलाव चालला होता. १७ शिपाई दारू देत होते त्यांचा अगदीं पत्ता सुद्धां नाहीं. शहरांत कोठें कोणाचें मुंडकें तर कोणाचा हात असा सडा पडला! एकंदर ४० इसमांचा पत्ता नाहीं. १६ जखमी झाले पैकीं २ मेले व इतर त्याच पंथास आहेत. ही सर्व मंडळी नेटिव्हच होती. २०० पक्षी मेले! १ उंट मेला. एकंदर २६० मण दारू जळाली. ३० मैलांवर आवाज ऐकूं गेला.

**प्रजेला सूट**— नुकताच अधिकार पावलेले मुधोळकर आपल्या प्रजेला ३६ हजार रुपयांची साऱ्याची सूट देणार हें कळविण्यास परम आनंद वाटतो.

**क्षयरोग्यास वाचन हें औषध**— ज्यांना फुप्फुसाचे रोग आहेत. त्यांनीं मोठ्यानें वाचीत जावें, अशी डाक्टर लोकांची शिफारस आहे. मोठ्यानें वाचन केलें असतां स्वर, फुप्फुसें व छातीचे स्नायु या सर्वांसच चांगली ताकद येते मात्र वाचावयाचें तें मोठ्यानें, स्पष्ट रीतीनें असें वाचावें; रेंगाळत वाचूं नये. शद्वोच्चार अगदीं स्पष्ट असावा. वाचावयाला बसावयाचें तें शरीर ताठ करून परंतु कोठेंही थोडा ताण बसणार नाहीं, अशा बेतानें बसावें कारण छातीचें चलनवलन अगदीं निर्वेधपणें चाललें पाहिजे. श्वासोच्छ्वास चालवावयाचा तो अगदीं नैसर्गिक जसा चालावयाचा तसा चालवावा विनाकारण प्रयास करून श्वासोच्छ्वास करूं नये. मात्र श्वास घ्यावयाचे ते चांगले मोठे घ्यावे.

**अतिशय जीवट प्राणी**— सगळ्या प्राणिकोटींत सीआनेमोन ह्मणून जो सागरस्थ प्राणी आहे, त्याच्या सारखा जीवट प्राणी नाहीं. त्या एका प्राण्याचे तुकडे वाटेल तर बारा तुकडे करा. ते बारा तुकडे नवीन प्राणी बनून रहातील. दोन प्राणी अर्ध्यांवर कापून ज्या भागांना डोकीं आहेत ते भाग उलटीकडून एकाला एक लावले, तर आपोआप सांधले जाऊन दोन डोक्यांचा प्राणी बनतो! हा प्राणी कापून सोलून काढला, तरी त्या तुकड्यापासून नवीन प्राणी बनतात! प्राणिकोटींत जसा हा, तसाच वनस्पति कोटींत निवडुंग आहे तुकडे तुकडे केले तरी उगवतो.

**साहेबी रक्ताचा तापटपणा**— शिकंदराबाद येथील बॅरेट साहेब, नागपूर रेलचे ऑडिटर ह्यांच्या बंगल्याजवळ कांहीं मुलें खेळ खेळत होतीं त्यामुळें बॅरेट साहेबांच्या चिरंजीवास त्रास होऊं लागला ह्मणून चिरंजीवांनीं त्यांस दंगा करूं नका ह्मणून धमकी दिली पण तीं पोरें कांहीं ऐकत नाहींत असें पाहून त्यांनीं घरांतून बंदूक आणिली व ६६ जणांस घायाळ केलें. पोलिसांनीं त्यास पकडलें आहे. कांहींहि असो. हिंदुस्थानांतल्या रडक्या, भित्र्या व मागुताई पोराप्रमाणें ता स्वस्थ बसला नाहीं. अंगांत असें पाणी पाहिजे.

**इंग्रजांची काळजी**— 'इंग्लिशमन'पत्रानें 'हिंदुस्थानाचें पुढें काय होणार' यावर एक आर्टिकल लिहिलें आहे. 'युरोपियन अधिकाऱ्यांस हिंदुस्थानची दशा पुढें काय होणार यावद्दल मुळींच काळजी वाटत नाहीं. आपली नोकरी किंवा धंदा चालेपर्यंत इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत राहिलें ह्मणजे झालें, एवढीच त्यांची वृत्ति असते' असें कबूल केलें आहे.

**साखर खावी**— साखर ही स्नायूंची शक्ति वाढविणारें अन्न आहे. ज्यांना डोंगर चढणें, प्रवास करणें किंवा इतर अंगमेहनतीचीं कामें करावयाचीं असतील, त्यांनें साखर फार खावी असें एका डाक्टरांचें मत आहे. साखर न खाणाऱ्या पेक्षां साखर खाणाराचें काम विशेष होतें असें अनुभवांतीं ठरलें आहे.

**सुपारीच्या खांडानें मृत्यु**— येथील डेक्कन कॉलेजांतील शेटी नांवाचा एक मुलगा तोंडांत सुपारीचें खांड टाकून झोपीं गेला असतां तें त्याच्या घशाखालीं उतरून आत अडकून बसलें. त्यास सहा दिवस एकसारखा ताप येऊन तो मृत्यु पावला. डाक्टरी उपायांचें कांहीं चाललें नाहीं.

## औरंगजेब बादशहाच्या चमत्कारिक आख्यायिका

गोष्ट १ ली— बादशहानें आपले दिल्ली शहरांत असा कायदा केला होता कीं, शाळेंत असलेल्या मुलांस यवनाचे मुलानें शिवी दिल्यास हरकत नाहीं परंतु हिंदूंचे मुलांनीं असें करितां कामा नये. व जो मुलगा हा नियम मोडील त्यास देहांत शिक्षा केली जाईल.

एके वेळीं असें झालें कीं, एका यवनाचे मुलानें एका कायस्थाचे मुलास शिवी दिली ती त्यास सहन न होऊन त्यानीं प्रत्युत्तर दिलें. पुढें ही केस बादशहापुढें चालू झाली. शेवटीं त्या मुलाचें अलौकिक धैर्य पाहून दरबारांत असलेले कोनाड्यांत त्यास उभे राहण्याची शिक्षा दिली व गवंडी बोलावून त्याजकडून तो कोनाडा बंद करण्यास हुकूम दिला. त्याप्रमाणें तो कोनाडा त्या मुलाचे गळ्यापर्यंत भरत आला. शेवटीं बादशहा ह्मणाला आतां तरी तूं मुसलमान हो ह्मणजे तुला गुन्हा माफ करितों. मुलानें तें नाकारलें. शेवटीं ती जागा संबंध भरून काढण्यास गवंड्यास हुकूम झाला. पण त्या मुलाची शहामत खरी!

गोष्ट दुसरी— एके दिवशीं बादशहा आपले पदरीं असलेल्या जयसिंग सरदारास ह्मणाला कीं, मी पुष्कळ लोक मुसलमान केले आहेत आतां तुह्मी अजून हिंदूच राहिलां आहां. तुह्मी तरी मला हिंदू करा अगर मी तुह्मांस मुसलमान करितों.

जयसिंग सरदार ह्मणाला खुदावंत तुमचे धर्मांत असें काय विशेष महत्व आहे तें दाखवा ह्मणजे मी तुमचे ह्मणण्यास कबूल होईन बादशहानें एक धुवट चादर मागवून ती दरबारांत असलेले विहिरीवर टाकविली व चार कोपऱ्यावर लहान लहान खांब खडे ठेवून व स्वच्छ कपडे अंगांत घालून विहिरीच तोंडावर पडला व १०।१५ मिनिटें त्या ठिकाणीं कुराण वाचलें व ह्मणाला जयसिंग हें पहा आमचे धर्माचें महत्व.

जयसिंगास मोठें आश्चर्य वाटलें व त्यांनीं चादर आणवून त्या विहिरीवर टाकविली व वरून स्नान करून हातामध्यें भगवद्गीतेची पोथी घेऊन तेथें गेला व मनांत ईश्वराचा धांवा केला कीं हे प्रभो! धर्म रक्षणाकरितां धांव, नाहीं तर हा कमीपणा तुला येणार आहे. असें ह्मणतां क्षणीच विहिरींतून वर तोंडातोंड पाणी आलें. मग जयसिंगास वाटलें कीं आतां आपण बुडत नाहीं. लागलीच जयसिंगानें विहिरीचे मधोमध उभें राहून ७१० श्लोक भगवद्गीतेचे वाचून वर आला; हें बादशहानें पाहून बादशहा ह्मणाला शाबास बहादर; माझा असा समज होता कीं हिंदुधर्म खोटा आहे परंतु आतां ईश्वरानें सर्व धर्म बरोबर केले आहेत तेव्हां पासून बादशहानें मूर्ती फोडण्याचें काम बंद केलें. व हिंदूवर जास्त प्रेम देवूं लागला.

**अजब कारवाई**— मद्रास इलाख्यांतील मदुरा जिल्ह्यांत एका मास्तराचा खून केल्याबद्दल पोलीसानें नऊ आसामीला आणून कोर्टापुढें हजर केलें; व त्याच्या साक्षी पुराव्या बरोबर मयताच्या अस्थिही आणल्या इतकेंच नव्हे, तर एका आरोपीचा कबुली जबाब सुद्धां कोर्टापुढें आला. इतक्यांत या आरोपीचा सुदैवानें, ज्याचा खून झाला असें पोलीसाचें ह्मणणें होतें, तोच मनुष्य येऊन कोर्टापुढें हजर झाला! मग काय! कोर्टानें सर्व आरोपीस सोडून दिलें. या पोलिसची कारवाई अगम्य आहे का नाहीं?

**शिक्षा न भोगण्याची उत्तम तोड**— मि० व्हिटेकर राईट या नांवाच्या गोऱ्या गृहस्थानें, विलायतेंतील एका प्रसिद्ध कंपनीच्या देवघेवींत, हिशोबांत वगैरे लबाडी केल्याचें आढळून आल्यावरून, त्याजवर खटला होऊन त्याला सात वर्षांची कैदेची शिक्षा झाली. शिक्षा सांगितल्यावर तो एका खोलींत गेला व आपल्या सॉलिसिटराशीं बोलूं लागला, तोंच खालीं पडून देह ठेऊन मेला! शिक्षा सांगितल्यापासून अवघ्या २६ मिनिटांत हा सर्व प्रकार झाला. त्याच्या प्रेताची डाक्तरांनीं तपासणी केली तिजवरून असें आढळून आलें कीं, तो एक प्रकारचें 'ॲसिड' पिऊन मेला! शिक्षा होण्यापूर्वीं तो ह्मणत असे कीं, मला एक दिवस देखील तुरुंगांत राहावें लागणार नाहीं.

**चमत्कारिक सल्ला**— जयपुर येथें कर्जदारांच्या रुपयाबद्दल एकाचें घर लिलांव होणार होतें. त्यास एका ज्योतिषानें सल्ला दिली कीं, "घरांत शिवलिंगाची स्थापना कर, ह्मणजे तें देऊळ ह्मणून लिलांव होऊं शकत नाहीं." या सल्लाच्या मोबदल्यांत ज्योतिषाला तुरुंगांत जावें लागलें कां बरें?

**बंदुकीच्या कागदी गोळ्या**— अलीकडे कागदी राप्याच्या व मेणाच्या बंदुकीकरितां गोळ्या करूं लागले आहेत. शिशाच्या गोळ्यापेक्षां यांचा मारा उत्तम प्रकारें होतो. शिशाच्या गोळीचा ज्यावर मारा बसेल, तेथेंच फक्त भोंक पडतें परंतु या कागदाच्या व मेणाच्या गोळीनें त्या वस्तूचा समूळ नाश होऊन त्याच्या चिंध्या चिंध्या होतात. यावरून कांहीं दिवसांनीं शिशाच्या ऐवजीं या कागदाच्या व मेणाच्या गोळ्यांचाच लढाई, शिकार वगैरे कामाकडे फार उपयोग होईल असें वाटतें.

REGISTERED No. 4

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास..................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ६० १
दर ओळीस......... ०१ ०६
दुसरे खेपेस.... ....... ०१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy .......................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
per 10 ... ..2 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 22 FEBRUARY 1904 NO 8

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १९०४ इ० अंक ८

## नोटीस

मुरायताला व सुलायतखा वल्लद भिकन खा मुसलमान राहणार मांबेरी परगणे पातुर्डे तालुका आकोट जि० आकोला यांस:

खाली सही करणार याचे वतून नोटीस देण्यांत येते की आमचा नवरा मयत झाला ते दिवसांपासून तुम्ही आम्हांस खाण्यापिण्यास व लताकपड्यास कांहींच पैसे वगैरे देत नसून तुम्ही ही आमचे पोषण करीत नाहीं तरी मुसलमान धर्मप्रमाणें आमचे हिस्से आम्हास द्यावे व आम्ही तुमचे पासून हिस्से घेणार असें तुम्हास समजल्यापासून तुम्ही नामिनींतील मालाची टोंगवासगाची फारच अफरातफर मांडली आहे व विना कारण जास्त कर्ज वाढविण्याच्या फिकरींत आहां. आम्ही आपासांत हिस्से मागितले असतां देत नाहीं तरी ही नोटीस पावल्यापासून १९ दिवसांचे आंत आमचे हिस्से सर्व इस्टेटीचे धर्मशास्त्रप्रमाणें देऊन पावत्या घ्याव्या. वरील मुदतींत निकाल करून जर आमच्या पावत्या घेतल्या नाहींत तर कोर्टांत फिर्याद करून हिस्से घेऊं. कोर्ट खर्च आमचे हिश्शांत आम्ही वजूद करणार नाहीं तो तुमचे हिशांतून भरून घेतला जाईल व न्यायप्रमाणें आमचे मेहेराचा ही निकाल करावा. कळावें. तारीख १७ माहे फेब्रुवारी सन १९०४ इ०

सही

मकमची व हिदादची मर्द गोंडेखा
मुसलमान राहणार मांबेरी
ता० आकोट निशाणी
खुद्द चांगडी.
दस्तुर तर्फे मुखत्यार रहिमशा वल्लद
रहिमानशा निशाणी वखर.

टीप— माझे मुलीचा व माझा तुमचे जवळून हिस्सा घेण्याचा आहे ती मुलगी तुम्ही हिसकून घेतली आहे व तुम्ही हयगय करून मुलगी नाळलेही आहे. यावरून असें दिसतें कीं तुमच्या मनांत मुलगी मरावी असं आहे तुमचे कडून हयगई होऊन मेली तरी हिस्सा सोडणार नाहीं.

---

## नोटीस

रा. रा. इचाराव व. परशराम साहू दुकान मेंडवड बुजरूक ता. जळगांव.

यांस

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुम्ही माझे सावकार असून तुमचे मजकडेस घेणें निवारण्याबद्दल आपसात चार चौघासमक्ष तुम्ही मौजे चिचखेड तालुके जळगांव येथील सर्वे नंबर ४३ पैकीं एकर १० गुंठ २६ हे सालीम एक हजार रुपयांस खरेदी घेऊन मागील गहाण व खातेबाकीचा सर्व खंड तोडून निकाल केला, व मदहू शताची जोडी तुम्हास नोंदून दिली. तुम्ही कबूल केल्याप्रमाणें सर्व निकालाची पावती मागितली असतां दिली नाहीं व आतां बदल्या सारख्या गोष्टी करिता, व हें शत तुम्ही बापू व. रामजी कारभारी पाटील चिचखेड यांस लिहिलें आहे. जो पावतो तुम्ही मजलो भरपावती, कबूल केल्याप्रमाणें देणार नाहीं तोंपावेतों मी शताचा ताबा माझो सोडणार नाहीं. व या संबंधानें तुमची हाइल त्या नुकसानीचा जबाबदार मी राहणार नाहीं. सबब तुम्हास या नोटिशीनें कळविलें आहे कळावें. तारीख १९।२।१९०४ इसवी.

सही

भगवान वल्द बाबूजी शिंपी
राहणार चिचखेड तालुके
जळगांव वऱ्हाडी नि-
शाणी खुद्द हात-
चीन्हकेली आहे.

---

## नोटीस

रा. रा. नारायणदास सितारामदास खत्री राहणार खामगाव.

यांस

जयगोपाल वि. वि. वऱ्हाडसमाचार पत्रांत तारीख ४।१।१९०४ ची तुमच वकील रा. रा. हणमंतरावजी याचे सहीची नोटीस प्रसिद्ध झालेली मी वाचली तींत तुम्ही माझे नांव टाकून मजसंबंधानेंही मजकूर लिहिला आहे, व मजपासूनही हिशोब वगैरे मागण्याचा तुमचा हेतु दिसत आहे. तुमचें असें करणें अगदीं खोडसाळपणाचे व अयोग्य आहे. माझा तुमच्या नोटिशींत लिहिलेल्या व्यापाराबाबद संबंध कांहीं नसून उलट माझे दुकानच्या असामीचा अडतीचा फायदा तुमचे दुकानास मिळाला व माझे दुकानचे जागेंत तुम्ही व्यवहार केले सबब तुमचेकडून अडतीबद्दल, व जागेचे किरायाबद्दल मजला घेणें आहे. ही रकम अनेक वेळां आपणांस मागितली असतां आपण टाळाटाळी करितां व उलट खोटी नोटीस वर्तमानपत्रांत देऊन माझेवर जबाबदारी टाकूं पाहतां तरी तुमचें असें करणें बरोबर नाहीं. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे दुकानचे पैशाचा निकाल करून टाकावा. असें करण्यास चुकाल तर रीतीप्रमाणें तजवीज करून खर्च तुमचेकडून वसूल केला जाईल. कळावें, तारीख १९।२।१९०४ इ.

सही.

रंगीलदास वल्लभदास राहणार
खामगाव दस्तुर खुद्द

---

## नोटीस

रा०रा० नारायणदास सितारामदास खत्री वस्ती पेठ खामगाव

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं आमचे पक्षकार रा. रा. छबीलदास वल्लभदास गुजराथी राहणार खामगांव यास व त्याचे बंधु रंगीलदास वल्लभदास यास वऱ्हाडसमाचार पत्रातून तारीख ४ जानेवारी सन १९०४ ची तुमचे तर्फे तुमचे वकील रा. रा. हनमंतराव जानशेंडे यांचे सहीची प्रसिद्ध करून दिलेली नोटीस आमचे सदहू पक्षकाराचे पाहण्यात आली. तिचे उत्तर दाखल कळविलें जातें कीं आमचे पक्षकारास व त्यांचे बंधूस नोकर म्हणून दुकानात ठेऊन मेहनती दाखल रुपयांत तीन आणे प्रमाणें देण्याबद्दल वगैरे जो मजकूर लिहिला आहे तो गैर आहे. रंगीलदास वल्लभदास यांस आमचे पक्षकारा समेत जबाबदारींत गोवण्याचे प्रयोजन निष्कारण होय त्याचा तुमच्याशीं संबंध काय? वास्तवीक प्रकार आपणांस माहित असून मिथ्या प्रकार आपले वकीलास भासवून अशी गैर नोटीस दिली हें बरोबर नाहीं. जुन्या प्रकारास अनुसरून रितीप्रमाणें आपसांत निकाल करण्यास आमचे पक्षकार तयार होते व अद्याप आहेत. परंतु तुमच्या एकंदर वर्तनक्रमावरून आपण मुद्दाम कोर्टांत जाऊन आमचे पक्षकारांस खर्चांत पाडण्याचे विचारांत आहांत तरी कांहीं कारण नसतां आपण कोर्टांत आमचे पक्षकारास आणल्यास त्याबद्दल सर्व जबाबदारी तुमचेवर आहे. सुज्ञास जास्त लिहिणें नको. कळावें, तारीख ८-२-०४ इ०

K. G. Damle
High Court Pleader
Akola.

---

## नोटीस

तीर्थरूप गंगा० मातोश्री गवराई जवजे मोतीराम अगरवाल वस्ती जामोद तालुका जळगांव यांस:—

मी खाली सही करणार विनंतीनें कळवितो कीं आपण मला दीड वर्षापासून अलग काढलें आणि निराळ्या घरांत रहावयास लावलें. माझ्या पोटापाण्यासाठीं म्हणून आपण मला थोडीशी शेतीही वहितीला दिली आहे. पण यापुढें माझ्या मनानें घेतलें आहे कीं माझा मी विभक्त होणार आणि आपण माझा धाकटा बंधु बद्रीनाथ याला घेऊन वेगळें रहावें माझा मी संसार व व्यापार धंदा वेगळा करण्याचा निश्चय केला आहे. सर्व स्थावर जंगम जिनगींतला हिस्सा माझा मला वाटून पाहिजे. चार पंचा मार्फत सर्व शेतीची वाटणी सरसनिरस करी न पाहून झाली पाहिजे. तसेंच कमीनकमी १२ हजार रुपयांच्या हुंड्याचा व्यवहार चालू आहे त्यांतील माझा हिस्सा अलग पाहिजे. तसेंच सोन्याचे दागिने वजन अदमासें ५०० तोळे व चांदीचे दागिने वजन २००० तोळे याच हिस्सा करून द्यावा आपण आपल्या मातृपणाचा ⅓ हिस्सा द्यावा पण त्याची लिखापढी होऊन नोंद ला गेला पाहिजे आपल्या पश्चात पुनः वाटून घेण्याला आम्हा उभयतां बंधूंस ठीक पडेल. आपल्या हातून निकालाची व्यवस्था यथायोग्य होत नाहीं म्हणून मला ही नोटीस देणें भाग पडलें आहे. या हिश्याच्या मागणीप्रमाणें आठ पंधरा दिवसात निकाल न होईल तर कोर्ट मार्फत इस्टेटीची वाटणी करून घ्यावी लागेल आणि तसा प्रसंग आल्यास त्याचा खर्च तुमच्या हिश्यावर पडेल कळावें ही विनंती तारीख १८-२-१९०४ इसवी.

सही.

जगन्नाथ मोतीराम अगरवाले
राहणार जामोद दस्तुर
खुद्द.

---

## नोटीस

शेठजी राऊतमल वल्लद बीरचंद मारवाडी दुकान जामोद. यास.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुम्ही १६ नोव्हेंबर १९०३ इसवी रोजीं ४०० रुपयाचा साधा रोखा लिहून घेतला आणि त्या ४०० रुपयामध्यें तुम्हाकडून मला फक्त २० रुपये खाते बाकीवरून मिळाले आहेत. बाकीचे रुपये ३०० अजून तुम्ही दिले नाहींत. या संबंधानें मी तुम्हास २८ नोव्हेंबर १९०३ रोजीं रजिस्टर नोटीस दिली परंतु ती तुम्ही वापस केली. आतां निरुपाय होऊन तुम्हाला ही जाहीर नोटीस देतों कीं तुम्हाजवळील ४०० रुपयाचा दस्तऐवज लिहून घेतला ० आहे तो कागद ही नोटीस पोंचल्यापासून आठ दिवसांच्या आंत मला परत द्यावा. तसें न केल्यास तुम्ही सावकारीला न शोभणारी अशी ही विश्वासघाताची व फसवेगिरीची गोष्ट केल्याबद्दल तुम्हावर फौजदारींत व दिवाणींत फिर्याद करण्यांत येईल आणि मग सर्व खर्च व इतर नुकसानी तुम्हाकडून भरून घेतली जाईल. कळावें, तारीख १८ फेब्रुवारी १९०४ इसवी.

सही

जगन्नाथ मोतीराम अगरवाले
राहणार जामोद दस्तुर-
खुद्द.

## पाहिजे.

आकोट म्युनिसिपल कमेटी करितां मिडवाईफ पाहिजे. पगार दरमहा १५ रुपये. लायकीच्या दाखल्यासह ता० १५ मार्च सन १९०४ पर्यंत खालीं सही करणाराकडे अर्ज करावा. ता. १२।२।०४ इ०

P. W. Bhagat.
चेअरमन.
म्यु० क० आकोट.



# वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध ६ शके १८२५


## उत्पन्नावरील कर

उत्पन्नावरील कर या शद्वापेक्षां त्याच्या त्या मूळच्या इंग्रजी संज्ञेनें ह्मणजे 'इनकमट्याक्स' या दोन शद्वांच्या समासानेंच लोकांस त्या कराची चांगला बोध होईल. या कराची आकारणी फक्त शेतीच्या उत्पन्नावर करीत नाहींत. सरकारी सारा दिल्यानंतर आणि त्या बरोबरच द्यावयाच्या पट्ट्या ह्मणजे शाळापट्टी, जागल्यापट्टी, रस्तापट्टी इत्यादि बाबी दिल्यानंतर शेतीच्या उत्पन्नावर दुसरा सरकारी कर द्यावा लागूं नये अशाविषयीं सरकारची विशेष दक्षता असते ही मोठीच कृपा होय. शेतीशिवाय जे इतर रोजगार धंदे चालूं असतात त्यांच्या वार्षिक उत्पन्नावर या कराची आकारणी करीत असतात. हा बादशाही कर आहे. हा कर प्रथमतः १८८६ सालीं इंडियांत बसविण्यांत आला आणि तेव्हांपासून त्याचा वसूल ब्रिटिश राज्यांत दरसाल होतच असतो. या करा संबंधानें स्वतंत्र एक कायदाच आहे. गरीब लोकांवर या कराचा बोजा बसूं नये ह्मणून पूर्वी दरसाल ज्याचें उत्पन्न ५०० रुपये किंवा त्याहून कमी आहे त्याच्यावर हा कर आकारण्यांत येत नाहीं. चक्रवर्ती एडवर्ड बादशहांस सिंहासनावर बसविण्या संबंधानें गुदस्तां राज्याभिषेकाचा महोत्सव झाला तेव्हां ही ५०० रुपये उत्पन्नाची मर्यादा १००० रुपया पर्यंत वाढविण्यांत आली. गरीब लोकांवर सरकारची ही मोठीच कृपा होय. तरी हा कर फार जबर आहे. त्याची आकारणी वार्षिक दोन हजार रुपये उत्पन्ना पर्यंत दर रुपया मागें चार पै प्रमाणें करितात आणि त्याहून अधीक उत्पन्न असल्यास दर रुपयाला ५ पै प्रमाणें कर आकारण्यांत येतो. हा कर आकारण्याविषयीं व वसूल करण्याविषयीं सरकारी बंदोबस्तहि फार कडक असतो.

## नवा धोंड

हा कर आमच्या प्रांताला लागूं नव्हता. सरकारी चाकरांस मात्र तो दरमहाचे दरमहा द्यावा लागत असे. आतां हा कर आमच्या प्रांताला लागूं केल्या विषयीं सरकारी ठराव नुकतांच प्रसिद्ध झाला आहे. आमचा राजकीय संबंध मध्यप्रांताशीं जोडण्यांत आला त्याचा हा पहिला प्रसाद होय.

इतकीं वर्षें हा कर बसविला नव्हतां याचें कारण असें सांगतात कीं वऱ्हाडची प्रजा ह्मणजे ब्रिटिश सरकारची प्रजा नव्हे. त्यांचे मांडलिक निजाम सरकार यांची ही प्रत्यक्ष प्रजा आहे. हा बादशाही कर आहे तेव्हां या कराला वऱ्हाडच्या लोकांची पात्रता नाहीं. हा प्रजासंबंध कौलपत्र्यानें पालटत नाहीं असाच आमचा पक्का ग्रह आहे. मागेंही राजश्री खापर्डे यांची साक्ष टिळक प्रकरणांत व्हावयाची होती तेव्हां त्यांच्यावर वारंट बजावण्या संबंधानें प्रश्न निघाला होता तेव्हां हा प्रांत ब्रिटिश मुलुख नाहीं ह्मणून पुण्याकडील साक्षीचें वारंट बजावण्याचा इनकार करण्यांत आला होता. हा प्रांत ब्रिटिश मुलूख नाहीं आणि कौलपत्र्यानें निजामशाहीचा प्रजासंबंध तुटत नाहीं; तेव्हां हा कर या प्रांताला लागूं होऊं नये असा कित्येक कायदे-पंडितांचा अभिप्राय आहे. मध्यप्रांताचें सरकार ह्मणजे या प्रांताचें स्थानिक सरकार खरें; परंतु तो संबंध फक्त या प्रांताच्या कौलपत्र्याच्या वहिवाटी संबंधानें आहे. त्यानें मूळचा निजामशाहीचा संबंध सुटतो असा शास्त्राधार कोठेंच सांपडत नाहीं; आणि या दृष्टीनेंच आह्मी ह्मणतो कीं आमचा प्रांत इनकम-ट्याक्सला पात्र नाहीं. हा वाद खरोखर फार महत्वाचा आहे पण या संबंधानें कांहीं खल पुढें मागें होईल असा रंग दिसत नाहीं.

## आपण निजाम सरकारची प्रजा आहों.

वरिष्ठ इंडिया सरकाराचा ठराव प्रसिद्ध झाला आहे कीं, इनकमट्याक्स या प्रांताला लागूं करण्यांत आला आहे. त्याची आकारणी येत्या एप्रिल पासूनच होणार आहे. या पूर्वीच लोकांच्या उत्पन्नाच्या यादी तयार झालेल्या आहेत आणि लवकरच वरील ठरावा बरहुकूम या कराच्या ठरावबंदीची जाहिरात प्रकाशित करण्यांत येईल. आह्माला वाटतें कीं वऱ्हाडांतील सार्वजनिक संस्थांनीं या बाबदींत चळवळ सुरूं करावी आणि या कराच्या आकारणी विरुद्ध सरकाराकडे अर्ज धाडून दाद मागण्याची व्यवस्था लवकर होईल तितकी चांगली. लोकांच्या सभा भरल्या पाहिजेत, जाहिरसभांतून या विषयीं चांगलीच चर्चा झाली पाहिजे आणि एकदां या महत्वाच्या प्रश्नाचा योग्य तो निकाल लावून घेतला पाहिजे. सांप्रतचा काल दाद मागण्याचा आहे आणि या वेळीं आळस होईल तर त्याचा परिणाम आपणांसच कायमचा भोगावा लागेल. आह्मी तर असेंही ह्मणतो कीं हा प्रश्न आह्मांस जितका महत्वाचा आहे त्या पेक्षां निजाम सरकाराला तो अधीक महत्वाचा आहे. नामधारी बादशाही वऱ्हाडावर राहिली आहे आणि ती देखील अस्तंगत होऊं देणें ठीक होणार नाहीं! या कराच्या बुडाशीं दुसरा प्रश्नच असा निघतो कीं वऱ्हाडचे लोक प्रजा कोणाची? निजाम सरकारची किंवा ब्रिटिश सरकारची? जर पहिली गोष्ट खरी असेल तर हा उत्पन्नावरील कर वऱ्हाडच्या लोकांवर बसतां कामा नये. लोकमत जागृत व्हावें ह्मणून आह्मी पुनः पुनःही वादग्रस्त गोष्ट पुढें ढकलीत आहों. आमचें स्थानिक सरकारही लोकांचा हा वाद वरिष्ठ सरकारापुढें नीटपणें मांडतील अशी आह्मांस पक्की आशा आहे.

---

## विद्यार्थीदशा

मनुष्य एका दृष्टीनें सदा सर्वकाळ विद्यार्थीच आहे; पण आह्मी व्यवहारिक दृष्टीनें विद्यार्जनाचा काल निश्चित करण्याचा विचार केला आहे. अलिकडे पाश्चात्य विद्यांनीं हा काल फार पुढें ढकलला आहे ह्मणून त्या संबंधानें आमचा मोटा आक्षेप आहे. हल्लीं वयाच्या २५।३० वर्षें पर्यंतही विद्याभ्यास पुरा होत नाहीं असा प्रकार झालेला आहे. १९ वे वर्षी मनुष्य वयांत येतो, तो कायद्यानें सज्ञान ठरला जातो आणि तेव्हांपासून पुढें तो आपल्या स्वतांचा पूर्ण मुखत्यार होतो. आमच्या मतें याच सुमारास विद्यार्जनाची शाला सुटली पाहिजे. या पुढें विद्या येयेच्छ शिकावी परंतु साधारण विद्याक्रम असा पाहिजे कीं या वयाला संसाराला लागण्या इतकी विद्या शिकून झाली पाहिजे. आणि ही विद्या इतकी पाहिजे कीं चांगल्या सूज्ञ विद्यार्थ्यांस तिजमध्यें प्राविण्य येईल. दुनियेदारीला लागणारी विद्यासामुग्री येथेंच संपूर्ण झाली पाहिजे. पण अलिकडे असें धोरण दिसतें कीं, जो विद्यार्थी ५।६ वें वर्षी शाळेला जाऊं लागला तो अशा विद्याचक्रांतून फिरला पाहिजे कीं जणूं काय त्या प्रत्येकाला एम. एच. व्हावयाचें आहे. युनिव्हरसिटीच्या उच्चतम पायरीला पोंचविणारा अभ्यासक्रम चालूं आहे आणि त्या अभ्यासक्रमाच्या पायऱ्या वर्षावर्षाला अनुक्रमानें चढतां येतील अशा चढत्या चढत्या पायऱ्या ठरविलेल्या आहेत.

एखाद्या विशिष्ट विषयांत प्रगती होण्यापूर्वी सर्व साधारण ह्मणून जो अभ्यासक्रम आहे त्याला म्याट्रिक्युलेशन पर्यंतचा अभ्यास लागतो. एवढेंच विद्यार्जन ह्मणजे अगदीं सामान्य होय. खरोखरच्या मोठ्या विद्यार्जनाला यापुढें प्रारंभ व्हावयाचाच असतो. या सामान्य शिक्षणाला एक बारा वर्षांचें तप लागतें; ही कालगणना चाणाक्ष व तरल बुद्धीच्या विद्यार्थ्यां संबंधानें आहे. बाकींच्या विद्यार्थ्यांची तर व्यर्थ तारंबळच होते, व ते हा मार्ग क्रमतांनाच केव्हें तरी शाळा सोडून देतात. या सामान्य विद्येच्या पायऱ्या चढल्या ह्मणजे तेथें विद्येचा पहिला मजला संपतो. तेथून तीन चार निरनिराळे प्रासाद दुसऱ्या मजल्यावर उभारलेले आहेत. कोणी वाङ्मयाच्या प्रासादांत शिरतात, कोणी भिषग्मंदिरांत प्रवेश करितात, कोणी शिल्पाच्या कलाभुवनांत जातात, आणि कोणी कायद्याच्या पाखंडी न्यायशाळेंत जातात. पहिला मजला संपल्यावर ज्या चतुर्विध किंवा पंचविध वाटा विद्या मंदिराच्या उच्चउच्च भागांत नेतात त्यांचे आक्रमण ह्मणजे आणखी पांच सात वर्षांचा अभ्यासक्रम असतो.

आमचा प्रस्तुतच्या विद्यार्जनाचा काल फार वाढलेला आहे. इतक्यांत विद्या नकोत आणि इतका हा कालाचा व्ययहि नको. असा हा आमचा सांप्रतच्या विद्यादानासंबंधानें मोटा आक्षेप आहे या इंग्रजी अभ्यासानें आमच्या तरुण पिढीचा फुराडा व्यर्थ होत आहे. अभ्यासक्रम पुष्कळसा असा योजला पाहिजे कीं, समाजांतील पुष्कळशा मोठ्या वर्गाचा दुनियेदारीला लागण्याच्या काळा पर्यंत त्यांचें कांहीं तरी विशिष्ठ शिक्षण पुरें झालें पाहिजे. हा प्रश्न फारच विचार करण्याचा आहे आणि हा विचार मुलांच्या आईबापांनीं, समाजांतील पुढाऱ्यांनीं आणि सरकारनीं अवश्य केला पाहिजे. ह्या विचाराच्या धोरणावर पुढील पिढीचें हिताहित फार अवलंबून आहे. ह्या संबंधानें कोणी डोळेझांक करूं नये असें सर्वांस आमचें मुद्दाम सांगणें आहे. उमरावतीस आजपासून वऱ्हाड विद्यापरिषद् भरणार आहे तेव्हां ह्या समाजानें ह्या गोष्टीची भवती न भवति करण्याचें मनावर घ्यावें अशी त्यास आमची सूचना आहे.

---

## ✓राजमार्गांची बंदी

राजमार्ग ह्मटला ह्मणजे तो सर्व ठिकाणीं आणि सर्वांस सारखाच खुला असतो. त्या मार्गानें जाण्यास कोणालाहि आणि कधींहि मनाई नसते. बादशाही सर्व रस्त्यांवरून वाटेल तेव्हां जाण्यायेण्याचा हक्क व अधिकार प्रत्येक प्रजाजनास आहे. हें सामान्य तत्व सांगण्याची किंवा त्याचें प्रतिपादन करण्याची गरज ब्रिटिश राज्यांत पडेल असें कोणास देखील वाटणार नाहीं. परंतु आतांशा हेंहि तत्व सिद्ध करून दाखविण्याची जरूरी वऱ्हाडांतील आकोल्यासारख्या मुख्य शहरींच फार दिसूं लागली आहे. आकोल्यास मुनिसिपालिटी आहे आणि रस्त्यासंबंधानें नियमन चालण्याचा अधिकार त्या संस्थेकडे आहे. आकोल्यांतील सर्व राजमार्ग सर्व लोकांस सारखेच खुले आहेत आणि त्यांच्या संबंधानें मुनिसिपालिटीनें घातलेले कांहीं एक पक्षीय विशिष्ट नियमही आढळांत नाहींत. येथील रेल्वे स्टेशना समोरून जो दक्षिणेकडे रस्ता जातो त्या रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक, साहेब नाहीं अशा, मनुष्यास फार मोठा त्रास होतो. आणि हा रस्ता ह्मणजे तर ह्या शहरांतील मुख्य राजमार्ग होय. अशा राजमार्गानें जाणाऱ्या येणाऱ्यास प्रतिबंध व्हावा व तोहि खुद्द सरकारच्या हुकुमानें त्यांच्या शिपायानें करावा ह्मणजे मोठी खेदाची व आश्चर्याची गोष्ट आहे.✗ राजमार्ग ह्मणजे फक्त राजाधिकाऱ्यांनींच तुडविण्याचा अत्यंत पवित्र मार्ग असून इतर जनांच्या पादस्पर्शानें विटाळण्याचा मार्ग नव्हे अशी जर कोणाची वेडी समजूत असेल तर ती जितकी लवकर दूर होईल तितकी बरी !

## ✓हुकुमाची अमान्यता

वरील राजमार्गाचा उपयोग नेटीव लोक करूं लागले ह्मणजे त्या रस्त्याच्या आजू-

## ORIENTALGOVERNMENT SECURTY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—BOMBAY.

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over one Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policie matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There ares numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

---

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या शास्त्रीय औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावं लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें या अपायकारक द्रव्य अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नदोष व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रघं, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्था व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घात संबंधानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत रोखीनें किंवा व्ही पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ गो० | १ रु० | ७६ गो० | २ रु० |
| ११६ गो० | ३ रु० | १६६ गो० | ४ रु० |
| २७१ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरे माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व मालाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी नें पाठवूं.

सूचना—— अलीकडे २।३ वर्षे आजारलें बरे ठिकाणी केवळ आपमतलबी [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] अहेत. करितां आमचे नकल [illegible] अशी मविनय प्रार्थन आहे कीं, ज्याय [illegible] शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यानीं आमचीच औषधें खालील विनचूक सही पत्त्यावरच मागवावी

पत्ता-कृष्णशास्त्री पंडित वैद्य.
मु० मुर्डी त. दापोली
जि० रत्नागिरी

---



### [illegible]ाड देशमुखसभा

[illegible]ची यंदाची बैठक खामगांवा [illegible]डगांव येथें चैत्र शुद्ध १ ता० [illegible]शुक्रवारीं होणार आहे. तरी सर्व [illegible]ीं सभेस अवश्य येण्याचें करावें. [illegible]रे मंडळी करितां खामगांव [illegible]गाड्या ठेवण्यांत येतील. कळावें.

[illegible] संपतराव देशमुख
[illegible]०४ सेक्रेटरी देशमुख सभा.

---

पहा हे.

### जाहिरात.

[illegible]ो, पाटील, पटवारी, जमीदार [illegible]ांस कळविण्यांत येतें कीं [illegible] येथें आमची २० जिनसी [illegible] एंजिन बाइलर चांगले कारखान्याला लागणारा सामान [illegible]. हे कारखाने काढून वऱ्हाडांत [illegible]ळ कापूस पिळविण्या करितां [illegible]अशा गांवीं बांधण्याची आमची [illegible]हे. जागेची खबर मेहेरबानगीनें आणि कोणास भागीदार होण्याची असल्यास ते आह्मी कबूल करूं. पत्त्यावर पत्र लिहिणें.

म्यानेजर
करही जिनिंग फ्याक्टरी
पोस्ट—पाडलिया
[illegible] बरवाहा, आर एम्. रेल्वे.

---

### नोटीस

[illegible]शमी हरमुखराय खडगमल मारवाडी [illegible]न कुंभारी ता० आकोला यांस [illegible]खाली सही करणार यांजकडून नोटीस [illegible]त येते कीं तुह्मी मजजवळून २९ [illegible]चे गहाणखत लिहून घेतले आहे. त्या [illegible]ाचा वसूल वजा जातां हिशोब करून बाकी देण्यासाठी मी रा. रा. निलकंठराव [illegible]डे यांजपाशी रकम दिली आहे. तुह्मी [illegible]ाब दाखवून रकम घेऊन जावी. तुमचे [illegible]ज तारीख १३।२।०४ पासून बंद आहे. नोटिशीचा व इतर खर्च तुह्मावर पडेल. [illegible]ावें २०।२।०४

सही (मारवाडींत)
देवीदत्त निराणीराम
राहणार कुंभारी.

---

### नोटीस

बेशमी गणपतजी वल्लद नागोजी कासार [illegible]हणार पापळ पो० धनज ता मूर्तिजापूर [illegible]ल्हा उमरावती. यांस

खाली सही करणार इजकडून नोटीस दे[illegible]ण्यांत येतें कीं तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार आहांत मजला सज्ञान होऊन आठ वर्षें झालीं. त्यांत चार वर्षें मी माझे जबरदस्तीनें तुमचे घरांत नांदली. मी अज्ञान असतांनांच तुह्मास बाहेरचा गेरचालीचा छंद लागला होता. पुढें मी सज्ञान झाल्यावरही तुह्मी आपला दुर्गुण सोडला नाहीं. दुर्गुण सोडण्याविषयीं तुह्मांस कधीं कांहीं मी बोलेंलें ह्मणजे मजला तुह्मी मारहाण करीत असा. दुसरे तुमची आईही सावत्र असल्यामुळें तिचाही जाच मजला कमी नव्हता. यामुळें मजला दिवसेंदिवस सुखाचे ऐवजीं दुःखच भोगावें लागलें. ही सर्व संकटें निमुटपणें सहन करून कशीही चार वर्षें तुमचे येथें दम धरला. माझा बाप मजला दोन वेळ घेऊन जाण्यास आला. त्यास मजशी भेटूं सुद्धां दिले नाहीं. एके दिवशीं तुह्मांस बाहेरख्यालीपणा सोडण्याची विनंती करीत असतां तुह्मी मजला अतिशय मार दिले. दोन दिवस अन्न पाण्यावांचून बांधून ठेविलें व तिसरे दिवशीं माझे आंगावरील माहेरचे मिळालेले दागीनें सोनें व चांदीचे मिळून दोनशें रुपये किंमतीचे हिसकून घेऊन मजला दहशत घातली कीं आज जर तू या पापळमधून निघून गेली नाहींस तर तुला ठार मारून रात्रीं एकाद्या विहीरींत नेऊन टाकीन. तुह्मी अति निर्दय असल्यामुळें हें अचाट कृत्य सहज कराल या भीतीमुळें निरुपाय होऊन मजला माहेरचा मार्ग धरणें भाग पडलें. तेथें पोहोंचल्यावर माझ्या अब्रूस बट्टा लावावा व जातींतून उठवावे ह्मणून तुह्मी माझे आतेबंधु रा. रा. नागोरावजी राहणार मुर्तिजापूर यांजकडेस पत्र पाठविलें. त्या पत्रावरून फौजदारींत कांहीं दिवस काम चाललें शेवटीं तुह्मी कोर्टात माफी मागून आपसात समजूत काढली. मजला आतां येथें चार वर्षें पूर्ण झालीं. इतक्यांत तुह्मास माझी कांहींच गरज पडली नाहीं. कारण तुह्मास विवाहिता स्त्रीची गरज आरंभापासूनच नव्हती. तुह्मी आपले दिवस सुखानें चैनीत घालविता व मजला याप्रमाणें दुःखसमुद्रांत ठेवितां हा केवढा अन्याय? माझे संसाराचे दिवस व्यर्थ जात आहेत आजपर्यंत सावकारांचे २०० दोनशे रुपये कर्ज काढून निर्वाह केला. आतां कोणी कर्जही देत नाहीं ह्मणून शेवटचें मागणें हेंच आहे कीं ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत या नोटिशीचे खर्चासहित माझे दागिने आणून माझे स्वाधीन करावेत कारण ते माझे माहेरचे मिळालेले असल्यामुळें त्यावर तुमचा हक्क नाहीं व सावकारांचे कर्ज रुपये दोनशें अदाई करावेत. आणि तुमची मजला अति दहशत असल्यामुळें मजला तुमचे व तुमचे सावत्र आईचे हातून कोणतेही प्रकारची तकलीफ होणार नाहीं किंवा माझा तुमचे हातून अपघात होणार नाहीं अशाबद्दल कोर्टांत योग्य जमानत देऊन नंतर मजला घेऊन जावें हें तुह्मांस कबूल नसेल तर मुदतीचे आंत माझे दागीने देऊन मला फारकती द्यावी मुदतीच्या आंत तुह्मी कांहीं न केल्यास तुमचा मजवर नवरेपणाचा कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं व हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. या नोटिशीचा खर्च तुह्मांपासून घेतला जाईल. कळावें, तारीख १८ माहे फेब्रुवारी १९०४ इसवी. दस्तुर-बळीराम वल्लद गणपती पाटील राहणार हातगांव.

सही
सहीची निशाणी मनी मर्दे गणपतजी कासार राहणार हातगांव तालुके मुर्तिजापूर इचे हातची बांगडी असे.

---

## वर्तमानसार

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दाता मे दिखात है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ·॥·




दांतावर माळें जमणे, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आवणें हलं लागणें, कमजोर होणें, मेगा प णें, किडे पडणें, वाकडे तिकडे होणें, नहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दातानीं फोडता न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहीशीं होतात, प्रयेक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहते.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला

देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढत फिरते हरेक सिम्त कदरदां है हम॥

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.



## मुंबई बँकर्ची सेव्हिंग्स बँक

या बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमाच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकी एकास अथवा जास्त इसमास अ.. त्यापैकी मयताचे मागे राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेत अर्ज केला असत मिळतील

मुंबई ब्यांक | J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ | एजंट



## स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, बांधकाम, इंजिनिअरिंग इरिगेशन ... लागणारे सामान ... मुंबईहून ... सर्व प्रकारचे सामान रास्त माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी
जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.



## जाहिरात

### केडाघर खाञीचें आषध

हटकून गुण डबीस २ रुपय

व्ही. एम जोशी
पोलिस टाऊन नजीक उमरावती
प्रांत वऱ्हाड.



वाचा ! वाचा !

(मौजच मौज. हसूंच हसूंच)

तुमचा वेळ आनंदात जावा असी तुमची इच्छा आहे काय ?
असल्यास खालील पुस्तकें एकवार वाचाच.
... आहेत.

### नवीन तयार झालेली पुस्तकें.

... सुंदरराव हंबीरराव,
किं० १॥ रु.
... अथवा कामांध राजपुत्र.
किं० १ रु०
... २ रु... 
... व्ही. पी. ट. ख. माफ.

वासुदेव जनार्दन लेले,
बुकसेलर—मिरज.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी कंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

बाजूंच्या सध्यांच्या युरोपियन अधिकाऱ्यांस फारच कटकट होऊं लागते असें दिसतें. आज पुष्कळ वर्षें येथील निरनिराळे राजाधिकारी ह्याच रस्त्याच्या आजूबाजूच्या बंगल्यांतच राहात आले व त्यांस आजपर्यंत तो राजमार्ग क्रमणाऱ्या लोकांची कधीं कटकट झालेली ऐकिवांत नाहीं. पण ही कटकट रुध्यांच्या युरोपियन अधिकाऱ्यांस बिलकुलच सोसवत नाहीं. त्यांची प्रकृती फारच नाजूक झालेली असावी आणि ह्मणूनच नेटिवांच्या गाड्या, घोडीं, मनुष्यें वगैरे त्या रस्त्यानें जाऊं लागलीं ह्मणजे रस्त्यावरील सरकारचा शिपाई त्यास मज्जाव करीत असतो. ह्या मनाईचा उपसर्ग आपणास होऊं नये अशी ज्यास इच्छा असेल त्यांनीं हा राजमार्ग मुद्दाम वर्ज करावा हें बरें. हा मनाईचा बंदोबस्त मोडण्या विषयीं माजी डेपुटी कमिशनर रा. रा. रुस्तुमजी फरदूनजी साहेब यांनीं मुद्दाम हुकूमहि फिरविला होता. पण तो सध्यांच्या नवीन अमदानींत कांहीं काळ पर्यंत बाजूला ठेवण्यांत आला आहे असें दिसतें. मे. रुस्तुमजी साहेबांचा हा हुकूम मुद्दाम तोडण्यांतच येतो असा आमचा अनुभव आहे.

## शिपायाचा दरारा

येथील शिवणीकडे जाणाऱ्या राजमार्गावर तर पुष्कळच गाड्या अडविल्या जातात. रस्त्यावरून गाड्या परतविण्याचा अतिक्रम तर अलिकडे फारच अमलांत येऊं लागला आहे. तुरुंगाच्या कोंपऱ्यावर पोलिसचा जवान एक सारखा खडा असतो. तो ह्मणतो कीं, डिपुटी साहेबांचा मला हुकूम आहे. मी नेटिवांच्या गाड्या या साहेबांच्या रस्त्यानें जाऊं देणार नाहीं; या कामावरच माझी नेमणूक आहे असा त्याच्या पोलिसी अद्वातद्वा भाषणाचा सारांश असतो. एका गृहस्थाची गाडी अडविली ह्मणून त्यानें फौजदारींत फिर्यादही केली आहे. ही फिर्याद सांप्रतच्या तंव्याची निदर्शक आहे. साधारण लोक रोजच्या रोज या रस्त्यानें फारच नाडले जातात. तो काळा डगलेवाला, त्याची ती साहेबाची उतनी ऐरावी, व आंतून साहेबांच्या अधिकाराची त्याला पुष्टी इतक्या गोष्टी एकत्र झाल्या ह्मणजे सामान्य मनुष्य ह्मणतो कीं हा रस्ता नको व ही दगदगहि नको. साहेबी शिपायाच्या तोंडाशीं तोंड देण्याच्या साहसांत कोणी पडावें. काळ सर्पाच्या शेपटीवर पाय देण्यापेक्षां ती वाट सोडावी व त्यासच मन मोकळें राज्य करूं द्यावें हेंच उत्तम.

## पोलीसचा दंडा

या आठवड्यांत वरील अतिक्रमाची एक विलक्षण तऱ्हाच दृष्टीस पडली. येथील सुप्रसिद्ध गृहस्थ रा. रा. केशव गोविंद दामले बी. ए. एल. एल. बी. यांच्याशींच कांहीं दिवसापूर्वी एका शिपायानें हुंबरी तुंररीचें वर्तन केलें होतें. पण पुढें हें प्रकरण त्यांनींच सौजन्यानें थोडक्यांत मिटतें घेतलें होतें. गेल्या १८ वे तारखेला पुनः असें झालें कीं, त्यांची दमणी शिवणी रस्त्यावरील झोंपडीकडे जात असतांना पोलिसच्या शिपायानें अडविली. जवळूनच राव बहादूर दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल. एल. बी हे चालले होते. शिपायानें गाडी बैल अडविली आहे हें पाहून ते तेथें उभे राहिले व त्यांनीं सहजींच विचारणा केली. तो शिपाई आपलें नांव देखील सांगेना. त्यानेंच उलट प्रथम राव बहादुरां कडूनच पेनसिलीनें त्यांचें नांव उतरून मागितलें आणि नंतर आपला नंबर व नांव ही सांगितलीं. पुढें त्यांनीं अडविलेल्या गाडींतील दोन माणसें आपल्या गाडींत बसवून घेतलीं व बैल व दमणी त्या शिपायाच्या हुकुमा प्रमाणें त्याच्या हवालीं करून घरचा रस्ता धरला. बैल कोंडवाड्यांत पाटविण्यांत आले आणि दमणी बिनवारशी माल समजून पोलिसच्या ठाण्यांत नेऊन ठेविली. राजश्री दामले यांनीं कोंडवाड्यांतून बैल सोडवून आणिले आणि दमणी पोलिसांत तशीच पडली आहे. तो शिपाई सामान्य खरा पण त्याच्या अंगीं बादशाही शक्तीचा सर्व अधिकार त्या समयीं असतो; ह्मणून कोणीच त्याच्यापुढें ब्र देखील काढीत नाहींत.

या प्रकरणाचा येथेंच शेवट होऊं नये असा आमचा आग्रह आहे; आणि या संबंधानें सरकार दरबार होऊन कायमचा योग्य तो निकाल होईल तर फार बरें होईल. रावबहादूर भागवत व रा. दामले या सारखे सद्गृहस्थ व श्रेष्ट कायदे पंडित यांत सांपडले आहेत तर ते सध्यांचे राजमार्ग संबंधाची मोगलाई चालवून देतील, इंग्रजी सुरूं करितील व लोकांस सुख दिल्याचें श्रेय घेतील अशी आह्मांस चांगली आशा आहे.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—आतांशा थंडीचें मान वारंवार चढतें व उतरतें व त्यामुळें प्लेगाच्या मृत्यूंची संख्या पुष्कळदां कमीजास्त होते. कधीं कधीं आठ दहा मृत्यु होतात व कधीं कधीं हें प्रमाण दोन चार मृत्यू पर्यंतही उतरतें. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक नसून जनावरांच्या चाऱ्याची चंचण यंदा विशेष आहे. गुरांचे रोग पुष्कळ ठिकाणीं वाढले आहेत.

कर्नल ग्यारेट सिव्हिल आणि सेशन जज्ज हे रजेवर जात असून त्यांच्या रजेंत रा० रा० ब्रीडो साहेब हे सेशन जज्ज होतील व त्यांच्या वाशिमच्या डेपुटी कमिशनरीच्या जागीं मेजर हार्सबरो हे जाणार आहेत.

आज पासून उमरावतीला विद्यापरिषदेच्या बैठकीला प्रारंभ होऊन गुरुवारीं सभेचें काम संपूर्ण होईल. नंतर इंग्रजी व देशी खेळाचे सामने विद्यार्थी मंडळांत होऊन बक्षिसें वाटण्याचा समारंभ होणार आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८- |
| सोनें २४।= | | चांदी ७१। |
| नवारी १८ | | अवस ७७॥ |
| गहूं | | ९० |
| बाजरी | | ६० |
| मीठ | ३॥=। | रु. मण |
| चणे | २॥। ते ३ | रु. मण |
| तूप | ८॥ | रु. मण |
| तेल | ४॥। | रु. मण |
| रुई जीन | | ८० |
| कापूस | | ६१-६६ |

## वऱ्हाड देशमूखसभा

या सभेची यंदाची बैठक खामगांवा नजीक गारडगांव येथें चैत्र शुद्ध १ ता० १८।३।०४ शुक्रवारीं होणार आहे. तरी सर्व देशमूख बंधूंनीं सभेस अवश्य येण्याचें करावें. रेल्वेनें येणारे मंडळी करितां खामगांव स्टेशनावर गाड्या टेवण्यांत येतील. कळावें.

फतेखेर्डा १९।२।०४ — संपतराव देशमूख सेक्रेटरी देशमुख सभा.

पहा हे.

## जाहिरात

व्यापारी, पाटील, पटवारी, जमीदार इतर लोकांस कळविण्यांत येतें कीं गुजराथ येथें आमची २० जिनसी कारखाना एंजिन बाइलर चांगले असून सर्व कारखान्याला लागणारा सामान तयार आहे. हे कारखाने काढून वऱ्हाडांत जेथें पुष्कळ कापूस पिकविण्या करितां मिळेल अशा गांवीं बांधण्याची आमची मर्जी आहे. जागेची खबर मेहेरबानगीनें द्यावी. आणि कोणास भागीदार होण्याची इच्छा असल्यास ते आह्मी कबूल करूं. खालील पत्त्यावर पत्र लिहिणें.

म्यानेजर

करही जिनिंग फ्याक्टरी

पोस्ट—पाडलिया

व्हाया बरवाहा, आर एम्. रेल्वे.

## नोटीस

बेशमी हरमुखराय खडगमल मारवाडी दुकान कुंभारी ता० आकोला यांस

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजजवळून २९ रुपयांचे गहाणखत लिहून घेतले आहे. त्या गहाणाचा वसूल वजा जातां हिशोब करून नक्की बाकी देण्यासाठी मी रा. रा. निलकंठराव देशपांडे यांजपाशी रकम दिली आहे. तुह्मी हिशोब दाखवून रकम घेऊन जावी. तुमचे व्याज तारीख १३।२।०४ पासून बंद आहे. या नोटिशीचा व इतर खर्च तुह्मावर पडेल. कळावें २०।२।०४

सही (मारवाडींत)
देवीदत्त निराणीराम
राहणार कुंभारी.

## नोटीस

बेशमी गणपतजी वल्लद नागोजी कासार राहणार पापळ पो० धनज ता मूर्तिजापूर जिल्हा उमरावती. यांस

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार आहांत मजला सज्ञान होऊन आठ वर्षें झालीं. त्यांत चार वर्षें मी माझे जबरदस्तीनें तुमचे घरांत नांदली. मी अज्ञान असतांनांच तुह्मास बाहेरचा गैरचालीचा छंद लागला होता. पुढें मी सज्ञान झाल्यावरही तुह्मी आपला दुर्गुण सोडला नाहीं. दुर्गुण सोडण्याविषयीं तुह्मांस कधीं कांहीं मी बोललें ह्मणजे मजला तुह्मी मारहाण करीत असा. दुसरे तुमची आईही सावत्र असल्यामुळें तिचाही जाच मजला कमी नव्हता. यामुळें मजला दिवसेंदिवस सुखाचे ऐवजीं दुःखच भोगावें लागलें. ही सर्व संकटें निमुटपणें सहन करून कशीही चार वर्षें तुमचे येथें दम धरला. माझा बाप मजला दोन वेळ घेऊन जाण्यास आला. त्यास मजशी भेटूं सुद्धां दिले नाहीं. एके दिवशीं तुह्मांस बाहेरख्यालीपणा सोडण्याची विनंती करीत असतां तुह्मी मजला अतिशय मारलें. दोन दिवस अन्न पाण्यावांचून बांधून ठेविलें व तिसरे दिवशीं माझे आंगावरील माहेरचे मिळालेले दागिनें सोनें व चांदीचे मिळून दोनशें रुपये किंमतीचे हिसकून घेऊन मजला दहशत घातली कीं आज जर तू या पापळमधून निघून गेली नाहींस तर तुला ठार मारून रात्रीं एकाद्या विहीरींत नेऊन टाकीन. तुह्मी अति निर्दय असल्यामुळें हें अचाट कृत्य सहज कराल या भीतीमुळें निरुपाय होऊन मजला माहेरचा मार्ग धरणें भाग पडलें. तेथें पोहोंचल्यावर माझ्या अब्रूस बट्टा लावावा व जातींतून उठवावे ह्मणून तुह्मी माझे आतेबंधु रा. रा. नागोरावजी राहणार मुर्तिजापूर यांजकडेस पत्र पाठविलें. त्या पत्रावरून फौजदारींत कांहीं दिवस काम चाललें शेवटीं तुह्मी कोर्टांत माफी मागून आपसात समजूत काढली. मजला आतां येथें चार वर्षें पूर्ण झालीं. इतक्यांत तुह्मास माझी कांहींच गरज पडली नाहीं. कारण तुह्मास विवाहिता स्त्रीची गरज आरंभापासूनच नव्हती. तुह्मी आपले दिवस सुखानें चैनीत घालविता व मजला याप्रमाणें दुःखसमुद्रांत ठेवितां हा केवढा अन्याय? माझे संसाराचे दिवस व्यर्थ जात आहेत आजपर्यंत सावकारांचे २०० दोनशे रुपये कर्ज काढून निर्वाह केला. आतां कोणी कर्जही देत नाहीं ह्मणून शेवटचें मागणें हेंच आहे कीं ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत या नोटिशीचे खर्चासहित माझे दागिने आणून माझे स्वाधीन करावेत कारण ते माझे माहेरचे मिळालेले असल्यामुळें त्यावर तुमचा हक्क नाहीं व सावकारांचे कर्ज रुपये दोनशें अदाई करावेत. आणि तुमची मजला अति दहशत असल्यामुळें मजला तुमचे व तुमचे सावत्र आईचे हातून कोणतेही प्रकारची तकलीफ होणार नाहीं किंवा माझा तुमचे हातून अपघात होणार नाहीं अशाबद्दल कोर्टांत योग्य जमानत देऊन नंतर मजला घेऊन जावें हें तुह्मांस कबूल नसेल तर मुदतीचे आंत माझे दागिने देऊन मला फारकती द्यावी मुदतीच्या आंत तुह्मी कांहीं न केल्यास तुमचा मजवर नवरेपणाचा कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं व हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. या नोटिशीचा खर्च तुह्मांपासून घेतला जाईल. कळावें, तारीख १८ माहे फेब्रुवारी १९०४ इसवी. दस्तुर-बळीराम वल्लद गणपती पाटील राहणार हातगांव.

सही

सहीची निशाणी मनी मर्द गणपतजी कासार राहणार हातगांव तालुके मूर्तिजापूर इचे हातची बांगडी असे.

## वर्तमानसार

डा. पालन याच पत्रासंबंधानें नामदार गोखले यांचा कांहीं तरी लेख वर्तमानपत्रांत येईल असें आम्हांस वाटलें होतें आणि त्या प्रमाणें तो आलाही. नामदार गोखले यांनीं व्याख्यानांत सांगितलेली गोष्ट खुद्द न्यायमूर्ति रानडे यांचे तोंडून ऐकलेली व तीच गोष्ट इतर एक दोघां मोठ्या गृहस्थांजवळही रानडे बोलले होते. ते गृहस्थ अद्यापि हयात आहेत. पोलन साहेब स्वतः असें कधीं झालें नाहीं ह्मणतात. रानडे काल्पनिक रचना करून कधीं सांगावयाचे नाहींत. गोखले यांची स्मरणशक्ति अमोघ आहे व तिला दुसऱ्या एक दोघां थोर गृहस्थांचें पाठबळ आहे.

**जपानी मिनिस्टरचा खुलासा—** सें. पीटर्सबर्ग येथील जपानी मिनिस्टर एम. कुरिनो यानें राशयास कळविलें कीं, राशियाचे उत्तरास १२ दिवस उशीर लागला. आतून राशियानें लढाईची तयारी चालविली आहे. सबब जपानानें यापुढें उत्तराची वाट पाहण्याचें नाकारिलें.

**झारांची युद्धापूर्वीची प्रार्थना—** पूर्व संप्रदायास अनुसरून समरीं शस्त्र धरण्यापूर्वी ईश्वराची प्रार्थना करण्याकरितां झारसाहेबांची स्वारी मास्को येथील देवळांत जाण्यास निघणार आहे.

सेंट पीटर्सबर्ग येथील जपानी मंत्री एम. कुरिनो हा ८ तारखेस बर्लिनला जाणार आहे.

टिंटसिन न्यूचव्यांग रेल्वेच्या रक्षणाकरितां शेखुड फारेस्टराचें सैन्य तिंगवांगटाओ येथें जाण्यास निघालें.

**रशियन मेलबोट पकडली—** जपाननें शांघायहून रविवारीं निघालेली मोंगोलिया नावाची राशियन मेल आगबोट पकडली आहे.

**जपानची तक्रार—** जपानचें असें ह्मणणें आहे कीं, रशियास उत्तराकरितां सडा निरोप पाठविले. परंतु त्यानीं एकाकडेही लक्ष दिलें नाहीं. त्यावरून त्याचा हेतु निर्मळ नाहीं हें उघड झालें. यापुढें उत्तराची वाट पाहणें वातुळ होतें.

डेली टेलिग्राफांत अशी खबर आहे कीं, पोर्टआर्थरहून राशियन स्काड्रूननें यालू नदीवर कांहीं सैन्य आणून पोंचतें केलें. तेव्हां मग जपानास धीर धरवेना.

**रशियन लढाऊ गलबतावर हल्ला—** जपानी टार्पेडोनीं राशियन लढाऊ गलबतावर पोर्ट आर्थर येथें हल्ला केला.

आलेक्झीफ आपले सरकारास कळवितो कीं, जपानी टार्पेडोनीं पोर्ट आर्थर जवळ राशियन स्काड्रूनवर ८ व्या तारखेस हल्ला केला.

जपानचा एक काफला चेमुल्पो येथें रवाना झाल्याची खबर आहे.

होत असलेल्या प्रकारानें चीनची फारच धांदल उडाली आहे. पेकिंग येथें सैन्य जमविण्यांत येत आहे.

**इंग्लंडांतील मत—** पायोनियरचा बातमीदार कळवितो कीं, टाइम्सनें याविषयींची चर्चा करितांना असें लिहिलें आहे कीं, जपानानें राशियास मांचूरिया सोडण्याबद्दल किंवा तेथून आपलें सैन्य हालविण्याबद्दल किंवा चीनपासून लुबाडलेल्या हक्कां पैकीं एकही सोडून देण्यास मागितलें नाहीं. जपानचें ह्मणणें काय तें चीनइ सत्तेबद्दलचा तह रशियानें मान्य करावा एवढेंच होतें.

इंग्लिशमनचा लंडनचा बातमीदार कळवितो कीं, जपाननें नऊ तारखेस पोर्ट आर्थरवर मोठ्या निकराचा हल्ला केला व तोफांचा मारा धडक्यानें सुरू आहे.

मुंबई युनिव्हर्सिटीचे सेनेटची सभा गेल्या शनिवारीं भरली होती. प्रोफेसर खुर्शेदजी दस्तुर यांस दोन वर्षेपर्यंत राजिस्ट्रार नेमिलें. पहिली एल्. एल्. बी. ची परीक्षा पास होतील, त्यांनीं "जनरल जूरिसप्रूडन्स" व "रोमन ला" या विषयांत बसलें तर बेस नये असा ठराव झाला.

पार्लमेंटमध्यें राजेसाहेबांचे भाषणावर वादविवाद झाला त्यांत लार्ड ल्यान्सडौन यास असें विचारण्यांत आलें आहे कीं, ग्रेट ब्रिटन पूर्वेकडील प्रकरणांत कांहीं मध्यस्थी करणार आहे कीं नाहीं? यावर त्यानीं असें सांगितलें कीं कोणास मध्यस्ती पाहिजे असल्याशिवाय मध्यस्थी करावयाची काय? जपानानें तर आह्मास मध्यस्थी नको असें जाहीर केलें आहे. तिबेट संबंधाचे कागद पत्र लवकरच सादर केले जातील त्यावरून ही मोहीम राजकीय व लष्करी नाहीं हें सहज दिसून येईल असें ते ह्मणाले. मि. आस्टिन चेंबर्लेन यानीं असें सांगितलें कीं, पूर्वेच्या प्रकरणासंबंधानें वादविवाद करणें गैर आहे आणि याबद्दलचे कागदपत्र पार्लमेंटास सादर करण्याची वेळ अजून आली नाहीं.

मि० भावनगरी यानीं अशी सूचना केली कीं ट्रान्सव्हालमध्यें ब्रिटिश प्रजेस मजुरांचा कायदा लागू होऊं नये. त्यावर असें उत्तर देण्यांत आलें कीं, ब्रिटिश इंडियन लोकांस मजुरीवर लावण्याचाच विचार नाहीं. अशी लार्ड मिल्नर यांची तार आली आहे.

**विलक्षण चाल —** क्विटो नावाच्या दक्षिण अमेरिकेंतील एका शहरांत अशी विलक्षण चाल आहे कीं प्रत्येक मनुष्यानें विज चमकताच आपली टोपी काढली पाहिजे. पाऊस जरी पडत असला तरी टोपी काढून विजेचा सन्मान करणें हा येथील शिष्टाचार आहे. प्रत्येक सभ्य गृहस्थाचें हें कर्तव्य आहे असें तेथें समजतात.

**सर्वांत जुनें पत्र —** पेकिंग गॅझिट नामक चिनी वर्तमानपत्र जगातील सर्व वर्तमानपत्रांपेक्षां जुनें आहे. ९ व्या शतकाच्या अखेरीस तें प्रसिद्ध झालें, आणि इ. स. १३५१ पासून तर ते अगदीं नियमित पणें प्रसिद्ध होत असतें. हें सरकारी पत्र असून लाकडी टाईपावर छापलें जातें. साडेपांचशें वर्षें नियमित पणें पत्र निघणें ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे.

माशीला १६००० डोळे असतात. ह्मणजे सहस्र भोंके पडलेल्या इंद्रावरही तिची ताण असते. परंतु इतके असूनही तिला सुतळीचा एक फटकारा कांहीं चुकविता येत नाहीं.

गेल्या बुधवारीं लॉर्ड व लेडी लॅमिंग्टन कांहीं अधिकाऱ्यांसह मुंबईंत वाळकेश्वरावरील सर रामलदास यांचें देऊळ, बाणगंगा तलाव, रामेश्वराचें व लक्ष्मीनारायणाचें देवालय व वैदिक पाठशाळा पहाण्यास गेल्या होत्या. गौड सारस्वतांचेंही देवालय यांनीं पाहिलें. देवालयाच्या बाहेर उभें राहून त्यांनीं पुजाअर्चा, आरती वगैरे पाहिलें. परत जातांना त्यांनीं हिंदु स्मशानभूमिही पाहिली.

गेल्याचे मागील सोमवारीं प्रो. मोरे यांच्या सर्कसीचे खेळांत नबाबजादा नरसुल्लाखान यानीं प्रो. मोरे यास सैन्याचें व मि. राण यांस रुप्याचें वज्याळ बक्षीस दिलें. व मंगळवारच्या खेळास बेल्जम, स्पेन व पोर्तुगाल या देशाचे वकील हजर होते, त्यांनीं प्रो मोरे यांचे कौशल्याची तारीफ केली व सर्टिफिकिटें दिलीं आहेत. गेल्या शनवारींही त्यांनीं लार्ड व लेडी लॅमिंग्टन व सर जेकिन्स यांचे आश्रयाखालीं सानिटरी असोसिएशनचे मदतीसाठीं एक खेळ केला.

सरहद्दीपलीकडील स्वाट खोऱ्यातील पठाण जातींचे पुढारीपण मियानगुळ नांवाच्या जुन्या घराण्याकडे आहे. या लोकांत दोन तट आहेत. ब्रिटिश सरकाराशीं व अधिकाऱ्यांशीं सलोख्यानें वागावें, असें एका पक्षाचें ह्मणणें आहे. आपल्या स्वाट खोऱ्यात दुसऱ्या कोणत्या लोकांस ढवळाढवळ कारभार करूं देऊं नये. असें दुसऱ्यापक्षाचें ह्मणणें आहे, मियानगुळ याचा धाकटा मुलगा गुलबादशहा हा या दुसऱ्यापक्षाचा अभिमानी असून त्यानें आपला चुलतभाऊ सय्यदबक्ष यानें मालकंड येथील ब्रिटिश अधिकाऱ्याशीं संबंध ठेवला ह्मणून त्यास व त्याच्या अनुयायांस ठार केलें. स्वाट खोऱ्याचा लाखचा भाग आह्मी बेतला व व्यापार वाढविला तरी स्वाटी लोक आडदांडपणा अजून सोडून देऊन सौम्य बनत नाहींत, याचें इंग्रजी लेखकांस आश्चर्य वाटत आहे!

आ. मि. लेली यांस व्हाइसरायांनीं आपल्या कौन्सिलचे सभासद नेमिलें आहे. शिवाय येत्या मार्चमध्यें १५० रुपये रजेवर गेले म्हणजे त्या रजेंत त्यांस मध्यप्रांताचे चीफ कमिशनरही नेमिलें आहे.

बुशायर येथें किनाऱ्यावर लॉर्ड कर्झन साहेब उतरणार होते पण त्या कामांत त्याचे हयगयीमुळें व्यत्यय आला, त्या फार्स प्रांताच्या अला उद्दवला नावाच्या इराणी गव्हर्नरास शहानें कामावरून दूर केलें आहे.

आपल्या आज्ञेचा भंग केला म्हणून कैसरनें आपला वडील मुलगा अटकेंत ठेवला आहे खाजगी वर्तनवर जर आपले वडील इतका असह्य दाब ठेवतील तर आपण इंग्लंडांत जाऊन राहूं असें युवराज म्हणत आहे असें समजतें.

ट्रान्सवालांत खाणी. वगैरेवर काम करण्यासाठीं कांहीं अटींवर चिनी व इतर आशिआटिक मजूर नेण्याबद्दलचें बिल प्रिटोरियाचे कायदे कौन्सिलांत पास झालें.

दक्षिण आफ्रिकेंत ठेवलेल्या इंग्रजी सैन्यामध्यें फार असमाधान व असंतुष्टता माजली असून तिचा लॉर्ड रॉबर्टस व लष्करी खात्याचे सेक्रेटरी मि. फास्टर हे विचार करीत आहेत.

पुण्याच कायम डिस्ट्रिक्ट व सेशन जज्ज मि. एफ. सी. ओ. बीमन यास त्याच्या रजेच्या मुदतींत, तिकडे कामावर परत येण्याची स्टेटसेक्रेटरींनीं परवानगी दिली आहे.

स्टेटसेक्रेटरी फार इंडिया यांनीं नेमणूक केल्याप्रमाणें मि. एफ. डब्ल्यु. क्लार्क, बी. ए. यानीं पुणें येथील डेकन कालेजांत प्रोफेसर आफ इंग्लिश लिटरचरच्या जागेचा चार्ज घेतला.

शिरसी येथें येत्या तेविसाव्या तारखेपासून रथयात्रा भरणार आहे. या प्रसंगाचा उपयोग करून घेण्याकरितां तेथील मंडळीनें तेथें एक औद्योगिक व कलाकौशल्याचें प्रदर्शन भरविण्याचें ठरविलें आहे. या प्रदर्शनाकरितां आसपासच्या सर्व लोकानीं जिन्नस पाठवावे अशी सदर प्रदर्शनाच्या सेक्रेटरीची सर्वांस विनंती आहे. हें प्रदर्शन ता. २० फेब्रुवारीपासून सुरू होऊन दहा दिवसपर्यंत उघडें राहील. प्रदर्शन सकाळीं ७ वाजल्यापासून तें सध्याकाळच्या ६ वाजेपर्यंत उघडें ठेविलें जाईल. उत्तर कानडा व आसपास बेळगांव, धारवाड, शिमोगा व दक्षिण कानडा या ठिकाणच्या लोकानीं कलाकौशल्याचें व हस्तकौशल्याचे जिन्नस पाठविल्यास त्यांतून योग्य ठरतील त्यांस बक्षिसें देण्यांत येणार असल्याचें धारवाडवृत्तावरून समजतें.

दिल्ली शहराच्या बाहेरच्या अंगास असलेल्या टेकडीवर हिंदुरावांचा एक जुना ऐतिहासिक वाडा आहे त्याची हल्लीं दुरुस्ती चालली असून, इस्पितळांतून बरें होऊन बाहेर पडलेल्या लोकांस राहण्यासाठीं यापुढें उन्हाळ्यांत त्या वाड्याचा उपयोग केला जाणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

अलीगड येथील कालेजच्या ट्रस्टीचे अध्यक्षाची जागा इमादिलमुल्क बहादूर सय्यद हुसेन बिलग्रामी यांस यंदा मिळाली आहे. या कालेजांत शर्टहांड, टाइपरायटिंग व इंग्रजी जमाखर्च यांचे नोकरी सुरू केले जाणार आहेत.

चित्रळपासून दार्जिलिंगपर्यंत सर्व हिमालयामध्यें बरेच बर्फ पडलें आहे यामुळें यंदा उत्तर हिंदुस्थानातील हिवाळा जास्त कडक व जास्त दिवस टिकणारा होईल असें ह्मणतात.

पोर्ट आर्थर येथें २००००० लोकांची दोन वर्षें पुरेल इतकी सामुग्री होती अशी वार्ता होती, परंतु तपास करतां ती सहा महिनेही पुरणार नाहीं असें समजलें. या वरून आलेक्झीफ यांनीं कित्येक कामगारां बरतर्फ केलें आहे.

पारशी स्त्रियांनीं आजपर्यंत केव्हांही रंगभूमीवर येऊन नाटकांत सोंगें घेतलीं नव्हतीं. पण अलीकडे त्या जातीच्या दोन स्त्रिया नाटकांत नाचूं लागल्या आहेत. बहुतेक पारशांस ही गोष्ट नापसंत असल्यामुळें समाजनीतीस धक्का येईल असें त्यांचे मत झालें आहे. व ह्मणून याबद्दलची आपली नापसंती दर्शविण्यासाठीं मुंबईंत नुकतीच सर जमशटजी जिजीभाई यांच्या अध्यक्षते खालीं एक सभा भरली होती.

वर्गणी आगाऊ दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........रु१ ०६
दुसरे खेपेस.... ......रु१

All Subscription to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

REGISTERED No. N.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 29 FEBRUARY 1904 NO 9

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २९ माहे फब्रुवारी सन १९०४ इ० अंक ९

### शिवकल्याणांची रासपंचाध्यायीवरील विस्तृत ओवीबद्ध टीका

आजपर्यंत प्रसिद्ध न झालेला हा सुरस ग्रंथ जुन्या हस्तलिखित प्रतीवरून छापून काढण्याचा आमचा विचार आहे. ग्रंथ येत्या वर्ष प्रतिपदेस छापुन तयार होईल. ग्रंथाची किंमत सारी १ रुपया आहे

ग्रंथ सुमारे साडेचार हजार असल्यामुळें १ रुपया ह्मणजे अगदींच थोडी कींमत आहे टाईप साधारण मोठा वापरूं वर्गणी पाठविणें ती रा० दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर आकोला यांचेकडे पाठवावी. वर्गणीदारांचीं नांवे प्रसिद्ध केलीं जातील. पुस्तकाचें सर्व उत्पन्न दुसरे जुने ग्रंथ प्रसिद्ध करण्याकडे लावणार आहों. परमेश्वराची इच्छा असल्यास रक्कम हळूहळू वढत जाऊन पुष्कळ जुने ग्रंथ बाहेर निघतील. असो. फाजील अधिक लिहून उपयोग नाहीं.

आकोला २३।२।१९०४ { गणेश बळवंत मोडक बी. ए. संपादक.

### नोटिस

शेषराव बाळाजी वल्लद महाळाजी मोहिते दरवणी कुणबी राहणार नागझरी हल्लीं पैंगे ठंद्री तालुके चिखली पोष्ट चिखली यास:—

खालीं सही करणार इकडून नोटीस देण्यांत येते कीं तू माझा लग्नाचा नवरा असून लग्न जाहल्यास अजमासे १५ वर्षे झालीं व मी वयांत येऊनही पांच सहा वर्षे झालीं तरी तुह्मी आज पावतों मजला कधींच आण ने केंव्हां नाहीं. माझें लग्न जाहलें त्या वेळीं मी सुमारें दोन तीन वर्षांची होती व मी तुह्मास त्याजवर कधींच पाहिलें नाहीं मी लोकाचें कर्ज सुमारें रुपये ४०० काढून आजपावेतों खाल्लें. आतां मला कोणी ही कर्ज रुपये देत नाहीं तर तुह्मी ही नोटिस पावल्या पासून १५ पंधरा दिवसांचे आंत येथें येऊन सावकाराचें कर्ज देऊन मजला घेऊन जाऊन संसार करावा. मी येण्यास तयार आहे असें तुह्मी न केल्यास ही नोटीस दिली आहे हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर कोणतेही प्रकारें राहणार नाहीं ही नोटीस दिली सही तारीख २६।२।०४ इसवी०

सही

सारजी मर्द बाळाजी मोहिते दरवणी कुणबी राहणार आकोली बुजरुक तालुके आकोले पेठ आकोले निशाणी खुद हातची बांगडी.
दस्तूर-- सोनाजी

### जमीन

#### तिचा उगम व घटना

तामील भाषेंत अशी एक ह्मण आहे कीं जो दगड पहारेनें फुटणार नाहीं तो झाडांच्या मुळांनीं भेदला जातो. ह्या ह्मणीची सत्यता आपल्या नजरेस पुष्कळ वेळां येते. एखाद्या चिरेबंदी तटावर किंवा विहिरीचे आसपास चुकून पिंपळाचें किंवा वडाचें झाड उगवतें व तें जसजसें मोठें होत जातें तसतसें तें तटाच्या किंवा विहीरीच्या भिंती फोडून बाहेर निघतें. एखादी पिंपळाची मुळी दगडाच्या आगच्या चिरेंत गेली तर ती आपल्या वढीच्या जोरानें त्या दगडाचीं दोन छकलें करून बाहेर निघते मग तो दगड कितीही मोठा असो. त्याच प्रमाणें प्रथम मुळांचीं सूक्ष्म टोकें दोन दगडांमधील चिरेंत शिरकाव करितात व तीं वाढूं लागलीं ह्मणजे कसलाही कठीण चुना असला तरी त्यास न जुमानतां भिंती मध्यें मोठमोठीं खिंडारीं पाडतात व यामुळें कित्येक विहिरी व सुंदर इमारती शिकस्त झाल्या आहेत. सबब हीं झाडें इमारती पासून बऱ्याच अंतरावर लाविलेलीं असावींत. अशा रीतीनें दगडाचे पृष्ठ भाग थोडे मऊ झाले ह्मणजे प्रथम त्यावर आपल्या दृष्टीस अगोचर अशा लहान लहान वनस्पती उगवतात. ह्यांच्या मुळांनीं व मेलेल्या वनस्पती कुजल्यामुळें खडकाचा पृष्ठ भाग अधिकच मऊ होतो. ह्या नंतर जरा मोठीं झाडें त्यावर दिसूं लागतात तीही मरतात व तीं कुजल्या नंतर त्याची माती बनते. अशा रीतीनें मातींत वरचेवर भर पडून व तो दगडही त्या त्या मानानें फुटत जाऊन मोठ्या झाडांच्या लागवडीला योग्य अशी त्या दगडाची कालांतरानें माती बनते.

दगडाची माती बनण्याचीं कारणें लक्षांत राहण्यासाठीं थोडक्यांत दिलीं आहेत:—

१ वातावरणांत उष्णते नंतर थंडी व थंडी नंतर उष्णता असे त्वरित व वरचेवर फेरबदल होणें.

२ जमीनींत मुरणारें पाणी.

३ लोखंड गंजताना लोखंडावर हवेची जी क्रिया घडते ती.

४ पाण्याच्या ओघाबरोबर वाहणाऱ्या दगडामुळें नदीच्या पात्रांत असणाऱ्या खडकावर होणारें घर्षण.

५ झाडाच्या बारीक मुळ्या दगडाच्या फटींत शिरून दगडाचें विदारण होणें.

पावसाळ्यांत नदीस अपार पूर आला ह्मणजे ती उंच प्रदेशांतून चिखल व गोटे आपल्या ओघाबरोबर सखल प्रदेशांत वाहून नेते. व पाण्याचा जोर जरा कमी होऊन तें संथपणानें वाहूं लागलें ह्मणजे ते सर्व थराथरानें दोन्ही बाजून सांचून बसतात. वाळू जड असल्यामुळें ती अगोदर खालीं बसते व गाळ हलका असल्यामुळें तो काहीं वेळ तपाच तरंगत राहून सर्व वाळू खालीं बसली ह्मणजे मग त्यावर गाळाचा थर बसतो. यामुळेंच एखादा महापूर येऊन गेला ह्मणजे नदीच्या दुथड्या अगदीं निसरड्या होतात असा गाळ पुष्कळ खालवर जातो. पाणी निघून गेल्यानंतर कोणत्याही ठिकाणचा थोडासा गाळ उकरून काढला तर त्याचाळीं आपणांस वाळूचा थर खात्रीनें दिसून पडेल. एकंदरींत वाळू व माती यांचे थरावर थर बसलेले असतात. अशा जमीनीस केवटा किंवा मळई जमीन अशी संज्ञा आहे. एखाद्या नदीचें पात्र अतिशय रुंद असलें ह्मणजे तिच्या प्रवाहाचा जोर फार कमी असतो व त्यामुळें वाळूचें फारसें स्थलांतर न होतां फक्त गाळ मात्र तरंगत पाण्याबरोबर लांबवर पसरतो. व पाणी ओसरलें ह्मणजे गाळ तेथल्या तेथेंच बसतो. त्यामुळें मोठमोठ्या नदीच्या कांठच्या जमीनी अतिशय सुपीक होतात. अशा जमीनी महानद्यांच्या मुखाजवळ हमेशा दिसून येतात.

### जमीनीचें वर्गीकरण व तिचे गुणधर्म

जमीनी खडकापासून झालेल्या असतात. खडकाच्या निरनिराळ्या जाती प्रमाणें यापासून झालेल्या जमीनी निरनिराळ्या प्रकारच्या असल्याच पाहिजेत. ज्या खडकापासून जमीन झाली त्याच खडकावर जर ती कायम राहिली असेल तिला तत्स्थानिक किंवा अचल असें ह्मणतात. अचल्या जमीनीचा थर मूळ खडकावर फारच पातळ असतो. व अशा जमीनीखालीं दगड अगदीं जवळ असल्यामुळें त्यावर लागणाऱ्या झाडांचीं मुळें फार खोल जात नाहींत व तीं जोरानें वाढतही नाहींत. तत्स्थानिक जमीनी बहुतकरून देशाच्या उष्ण भागांत असतात कित्येक जमीनीचा पापुद्रा इतका पातळ असतो कीं जरा खालीं उकरलें कीं खालचा दगड दिसूं लागतो. दुसऱ्या प्रकारच्या जमिनीचें स्थलांतर जाहलेलें असतें. यास स्थलांतरित, किंवा स्थानभ्रष्ट असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणजे ह्या जमीनी ज्या खडकापासून पैदा झाल्या तेथें न राहतां तेथपासून बऱ्याच दूर सांपडतात. ह्या पुष्कळ प्रकारच्या असतात. त्या समुद्रकांठीं, दरीखोऱ्यांत व नद्यांच्या दुआबांत सांपडण्याचा पुष्कळ संभव असतो. समुद्र किनाऱ्यावरील ओसाड वाळवंटें, दऱ्यांतील व सिंधु नदासारख्या नदीच्या दुआबामधल्या खोल व सुपीक मळईच्या जमीनी ह्या स्थलान्तर जाहलेल्या जमीनीचीं उदाहरणें होत. जमीनीचें स्थलान्तर होण्याचें मुख्य कारण पाण्याचा प्रवाह हें होय. परंतु कित्येक ठिकाणीं वाऱ्याच्या जोरामुळें जमीनीवरील असंख्य रजःकण उडावयास लागून लांबवर जाऊन तेथें सांचतात. मागें सांगितलेल्या मळई जमीनी पाण्याच्या प्रवाहामुळें स्थलांतर झालेल्या जमीनीचें उदाहरण होय. ह्या अनेक खडकाच्या मिश्रणापासून जाहलेल्या असल्यामुळें अतिशय सुपीक असतात. वाऱ्याच्या योगानें बनणाऱ्या जमीनी मोठ मोठ्या नदीच्या किनाऱ्यावर ओसाड मैदानांत सांपडतात. अशा ठिकाणीं मोठमोठ्या सोसाट्याचे वारे सुटले ह्मणजे त्यांच्या योगानें नदीचे पात्रांतील वाळू किंवा इतर ठिकाणचे कण उडत जाऊन जवळपासच्या प्रदेशांत सांचतात.

जमीनींत ज्या प्रमाणानें वाळू, माती व सेंद्रिय किंवा अग्निदाह्य भाग असेल त्या त्या मानानें जमीनीच्या निरनिराळ्या जाती बनतात. परंतु जमिनींत आणखी एक घटकावयव असतो तो ज्यास्त कमी असेल त्या मानानें जमीनीच्या सुपीकतेंत व जातींत फरक पडतो. हा चुना होय. चुना जमिनींत फार असला ह्मणजे वाळू व चिकण मातीचें स्वरूप व गुणधर्म बदलतात. जमिनीमधील वाळू, चिकणमाती व अग्निदाह्य अंश निरनिराळे कसे करावयाचे ते एकदां सांगितलेंच आहे. थोडीशी माती घेऊन तिजवर सिरका (व्हिनिगर) ओतल्या नंतर जर मातीच्या गोळ्यांतून फेंस निघूं लागला तर त्यांत चुना पुष्कळ आहे असें समजावें.

जमीनीचे घटकावयवा प्रमाणें वर्गीकरण:- जमिनींतील वाळू, चिकण माती व अग्निदाह्य अंश वेगवेगळे केले ह्मणजे जमीनीचें वर्गीकरण करण्यास फार अडचण पडणार नाहीं निरनिराळ्या वर्गांच्या जमीनीस खालीं लिहिल्या प्रमाणे निरनिराळीं नांवें देण्यांत आलीं आहेत.

निव्वळ चिकण मातीच्या जमीनी. ज्यांत $\frac{2}{3}$ पेक्षां अधिक चिकण मातीचा अंश असतो त्या.

हलकी चिकणमातीची जमीन—यांत $\frac{1}{2}$ पासून $\frac{2}{3}$ पर्यंत चिकणमातीचा भाग असतो.

मळई जमीन—हींत चिकण माती व वाळू हीं सारख्या प्रमाणांत असतात.

रेताड मळीची जमीन— हींत $\frac{3}{4}$ भाग पर्यंत वाळू असते.

वळकानय— हलक्या रेताड जमीनींत कधीं कधीं $\frac{3}{4}$ पेक्षां अधिक रेतीचा भाग असतो.

हलकी मातीची जमीन मळई जमीनींत मोडली जाते व मळईत रेती ज्यास्त असली ह्मणजे तीस रेताड ह्मणतात.

कोणत्याही जमीनींत अग्निदाह्य अंश $\frac{1}{6}$ पेक्षां जास्त असला तर तीस वनस्पतिभूत किंवा वनस्पतिजन्य जमीनी ह्मणतात. जमिनीमध्यें अग्निदाह्य सेंद्रिय अंश थोडासा तरी असलाच पाहिजे. जमिनीच्या शंभर भागांत ह्या पदार्थांचे ३—४ भाग असल्या त्या जमीनी चांगल्या पिके येणें फार कठिण

(पुढें चालू.)

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १४ शके १८२९

## वऱ्हाड शिक्षक समाज

ठरल्याप्रमाणें या समाजाची २० वी बैठक येथील हायस्कूलच्या भव्य इमारतींत झाली. समाजाचें काम गेल्या सोमवारपासून गुरुवार पर्यंत चार दिवस चालू होतें. एकंदर शिक्षक लोक १९० वर जमले होत. वऱ्हाडचा मध्य प्रांताशीं नवीन संबंध जडला असल्यामुळें मे. डायरेक्टर साहेबांनीं नागपूरच्या नार्मल स्कूलचे सुपरिंटेंडट रा. रा. विनायक बाबाजी अयाचित. बी. ए. यांस आणि तेथील मुसलमानी तालीम मास्तर यांस मुद्दाम या समाजाकरितां पाठविलें होतें. या समाजास येण्याबद्दल येथील व बाहेर गांवच्या शिष्ट शिष्ट विद्वान मंडळींस अगत्यानें बोलावणें केलें होतें. परंतु दोघांचीहि कार्यवेळा एकच असल्यामुळें पुष्कळ मंडळींस येतां आलें नाहीं.

या समाजास स्त्री शिक्षकांपैकीं तिघीजणी आल्या होत्या. त्यां शिवाय इतर सभ्य स्त्रियाहि आल्या होत्या. परंतु उमरावतीसारख्या राजधानीच्या व सुधारलेल्या शहरांत स्त्रियांचा जितका समाज जमेल असें वाटत होतें तितका जमला नाहीं. शिक्षक समाजाचे जे व्यवस्थापक असतात त्यांणीं अशा समारंभास स्त्रियांनां आमंत्रण करून आणण्याची व्यवस्था करावी असें आह्मांस वाटतें. आह्मा हिंदु लोकांत लग्न मुंजी इत्यादि समारंभांत स्त्री पुरुषांची एका ठिकाणीं जमण्याचा चाल आहे. तेव्हां शिक्षक समाजासारख्या प्रसंगीं स्त्रियांनां पडदपोशीची जागा करून तेथें आणल्यास त्यांनाही एका प्रकारचें शिक्षण मिळणार आहे.

सोमवारीं ११ वाजतां सर्व मंडळी एकत्र जमली. अध्यक्षस्थानीं रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर हेड मास्तर उमरावती हायस्कूल हे विराजमान होते. मे कँडी साहेब बहादूर इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स वऱ्हाड यांनीं कान्फरन्सच्या कामास सुरवात केली.

## क्यांडी साहेबांचें भाषण

मित्र हो, आपणा सर्वांचें स्वागत करण्याचा आज प्रसंग आला याबद्दल मला मोठा आनंद होत आहे. मामुली प्रमाणें हा समाज १२ महिन्यांनीं भरावयाचा परंतु प्लेगामुळें हें कार्य आपणांस तिन महिने लांबणीवर टाकावें लागलें. हा प्लेग चालल्या गाड्यांनां कशी अचानक खीळ घालतो याचा अनुभव सर्वांस चांगला आला आहे. चिखलीचे हेड मास्तर व दोन असिस्टंट या रोगास बळी पडले ह्मणून मला फार वाईट वाटतें. या रोगास स्थानत्याग हाच उत्तम उपाय होत आणि याची हयगय कोणी करूं नये हें सर्वांनीं मुद्दाम लक्ष्यांत ठेवावें.

गेल्या वर्षांत झालेला एकंदर फेरफार पाहतां आपणांस असें दिसून येईल कीं, आपल्या खात्याचें स्वतंत्र असें अस्तित्व आतां उरलें नाहीं तरी पण मध्यप्रांताच्या फार विस्तृत अशा शाळाखात्यांत आपला समावेश झाला आहे त्या अर्थी आपणांस पूर्वींपेक्षांहि ज्यास्त चांगलें काम करितां येईल अशी मला फार उमेद आहे. वऱ्हाडचें शाळाखातें मुंबईकडील धर्तीवर स्थापित केलेलें आहे. तें मध्यप्रांताच्या पद्धती बरहुकूम करण्यास आपण सर्वजण मला मदत कराल अशी आशा आहे. नागपूरच्या नार्मल स्कूलचे सुपरिटेंडंट आणि कसरती मास्तर यांस किंडर गार्टन व देशी कसरत शिकविण्यासाठीं पाठविण्यांत आलें आहे. मे. डायरेक्टर साहेबांनीं हा समाज भरविण्याची परवानगी दिली ही फार आनंदाची गोष्ट झाली. या पुढें हा समाज असाच सुरळीत चालेल किंवा नाहीं ही गोष्ट आपण येथें जें काम कराल त्या वरच विशेष अवलंबून राहील आणि आपण सर्वजण ह्या संबंधीचा उत्कृष्ट उपयोग करून घ्याल असा मला भरंवसा आहे.

नेहमी प्रमाणें यंदाच्या समाजांतही शाळा खात्यांतील मंडळांचीं व इतर लोकांचीं बरींच व्याख्यानें झालीं व कांहीं निबंधही वाचण्यांत आले. स्थलसंकोचामुळें सर्व व्याख्यानांचा गोषवारा किंवा व्याख्यात्यांचा नामनिर्देश आह्माला करितां येत नाहीं याबद्दल आह्माला फार दिलगिरी वाटते. सर्व व्याख्यानें व निबंध नीतिबोधानें भरलेले होते.

रा. रा. हरी लक्ष्मण हातीवलेकर यांनीं स्मरणशक्ति या विषयावर निबंध वाचला. निबंध सुश्राव्य होता पण इंग्रजींत होता. मराठींत असता तर त्यापासून ज्यास्ती फायदा झाला असता. तेल्हाऱ्याचे असिस्टंट मास्तर राजश्री किसन महादेव शिंदे यांनीं इंडियाच्या सद्यः स्थितीवर निबंध वाचला; निबंध शिक्षकसमाजाच्या व्यापारा बाहेरील होता पण बरा लिहिलेला होता. त्याच प्रमाणें मिसेस द्वारकाबाई यांचा निबंध मंडळीस चांगला पसंत वाटला. तसेंच रा. रा. रामचंद्र गंगाधर भागवत यांनीं "जेथें शांतीची वसती। तेथें खुंटे काळ गति" या विषयावर फार सुरस असा निबंध लिहिला आहे तो वाचण्यांत आला.

सौ० सुंदराबाई कावतकर यांनीं मुलींच्या शाळांतून मुलींस शिक्षण देण्याच्या अडचणी व त्यांवर उपाय या विषयावर एक निबंध वाचला. त्यांनीं दाखविलेल्या अडचणी व त्यांवर त्यांनीं सुचविलेले उपाय, यांचा आपण नीट विचार करूं असें मे० क्यांडी साहेब यांनीं सांगितलें. हा निबंध बोधपर आणि मनोरंजक आहे. त्यांनीं केलेल्या सूचनांत एक अशी आहे कीं शाळा खात्यांत काम करून पेनशन घेतलेल्या माणसास पुनः शाळाखात्यांत घेऊं नये. तो आधींच थकलेला व कंटाळलेला असतो व त्याचे हातून काम नीट होत नाहीं. यांचें हें ह्मणणें फक्त शाळाखात्यांतील पेनशनर लोकांनाच लागू पडतें असें नाहीं. पेनशनीला योग्य होण्याला सरकारानें जी मुदत ठरविलेली आहे तितक्या मुदती पर्यंत कोणत्याही खात्यांत नोकरी करून पेनशनीपर्यंत येण्यासच नाकीं नव येतात. त्यानंतर पुनः नोकरी करणें ह्मणजे नावाचेंच. या निबंधांत गेल्या पाव शतकांतील स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचें यांणीं सिंहावलोकन केलें आहे तें मोठें मार्मिक आहे.

नागपुराहून आलेले नार्मल स्कूलचे सुपरिंटेंडंट रा. रा. विनायक बाबाजी अयाचित बी. ए. यांनीं मध्यप्रांतांतील मराठी शाळांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या माहितीचा निबंध वाचला. या निबंधांत त्यांनीं पटवारी लोकांचे कागदपत्र, सावकारी हिशोब, शाळांचे बगीचे, भुगोल शिक्षण वगैरे संबंधीं चांगली माहिती सांगितली. तसेंच पृथ्वीचा आकार दर्शविणारे गोल कसे तयार करावेत, कात्रीनें कागदांचे तुकडे करून ते कागद चटयासारखे कसे विणावेत, खेड्यांचे नकाशे कसे काढावेत वगैरेंचे नमुने दाखविले.

रा० रा० वासुदेव रघुनाथ तळवलकर एल. एम. अँड एस. यांनीं "मानवी शरीराची सामान्य रचना व मुख्य इंद्रियांचीं कार्यें" या विषयावर व्याख्यान दिलें. मध्यें मध्यें व्याख्यानाच्या विषयाचा खुलासा करण्याकरितां चित्रपट त्यांनीं आणिले होते तेहि दाखविले. त्यामुळें तें व्याख्यान समजण्याला फार सुलभ झालें.

अशा नव्या नव्या विषयांवर त्यांतील प्रविण लोकांनीं व्याख्यानें दिल्यास या समाजापासून शिक्षकांस व इतर लोकांसही फार फायदा होईल.

नागपुराहून मुद्दाम आलेल्या तालीम मास्तरांनीं आपल्या बरोबर आणिलेल्या दोन मुलांकडून दोन्ही तिन्ही दिवस निरनिराळ्या तऱ्हेच्या बैठका व दंड करून दाखविले. व ही कसरत येथें जमलेल्या दुसऱ्या कसरती मास्तरांनाहि शिकविली. ही कसरत फार प्रेक्षणीय होती.

ह्या शिक्षक समाजांत एक चांगला ठराव पास झाला. वऱ्हाडांतील शिक्षकांच्या उपयोगा करितां एक सेंट्रल एज्युकेशनल म्युझिअम आणि लायब्ररी आकोला किंवा उमरावती येथें स्थापण्यांत यावी व या करितां समाजाच्या फंडांतून २०० रुपयांची रकम द्यावी आणि या संस्थेकरितां चांगली देणगी व वार्षिक मदत देण्याची अधिकारी वर्गास विनंती करावी अशा आशयाचा हा ठराव होता. वरील ठरावाप्रमाणें घडून आल्यास शिक्षणाच्या कामास फारच मोठी मदत होणार आहे.

## उपसंहार

शेवटचे दिवशीं मे. क्यांडी साहेब बहादुरांनीं इंग्रजींत भाषण केलें ते ह्मणाले:— माझ्या मनाप्रमाणें तुह्मी सर्वांनीं या प्रसंगाचा चांगला उपयोग केलांत हें पाहून मला संतोष वाटतो. माझ्या सध्यांच्या इनस्पेक्टर मंडळासारखे चांगले मंडळ दुसरीकडे क्वचित् सांपडेल याचा मला मोठा अभिमान वाटत आहे. नागपुराहून आलेले मि. अयाचित, व कसरती मास्तर यांचा मी आभारी आहे. त्यांनीं दाखविलेल्या गोष्टी इकडेहि हळूहळू सुरू करण्यांत येतील.

शिक्षक वर्गास उद्देशून ते ह्मणाले कीं शिक्षकाचें काम मनास मोठें आनंद देणारें आहे पण तें तसें करून मात्र घेतलें पाहिजे असा माझा वीस वर्षांचा अनुभव आहे मुलांना शिकविण्यांत शिक्षकांनीं एक प्रकारचा अप्रतिम आनंद वाटला पाहिजे व तो आनंद अनुभवास उतरण्याकरितां मुलांना शिकवितांना मास्तरांनीं स्वतां शिकत असलें पाहिजे. व अशा रीतीनें शिक्षणाचें कार्य शिक्षक करतील तर तो अनुपमेय आनंद त्यांस निःसंशय प्राप्त होईल. मुलांना नुसत्या वर्गांतच किंवा नुसतीं पुस्तकेंच शिकवावयाचीं नव्हेत. त्यांस आपल्या बरोबर फिरण्यास न्यावें, व त्यांनबरोबर अनेक खेळ खेळावेत. अशा रीतीनें मुलें फार चांगलीं शिकतात असा अनुभव आहे. तसेंच मास्तरांनीं आपलें वर्तन विशेषच शुद्ध ठेवावें कारण मुलें त्यांच्याच आचरणाचा कित्ता गिरवीत असतात. येणेंप्रमाणें मुलांचीं मनें नाना तऱ्हेनें वळवून त्यांस शिकवीत जावें.

खेड्यापाड्यांतील शिक्षकांनीं मुद्दाम लक्ष्यांत घेण्यासारखी एक गोष्ट त्यांनीं सांगितली ती ही कीं, गांवांतील तंट्याबखेड्यांत त्यांनीं कधींहि पडूं नये इतकेंच नव्हे तर गांवांत कदाचित् कांहीं तंटा उद्भवल्यास तो मोडण्याविषयीं त्यांणीं सल्ला द्यावी.

येणेंप्रमाणें भाषण होऊन शिक्षक समाजाचें विसर्जन झालें.

---

## कसरती व शर्यती.

( आमच्या बातमीदाराकडून. )

मे० कँडी साहेब हे वऱ्हाडांत आल्यापासून शाळांतील मुलांचें लक्ष नाना प्रकारच्या खेळाकडे व कसरतीकडे विशेष लागलें आहे हें कोणाच्याही सहज ध्यानांत येईल. मुलांच्या शारीरिक उन्नती विषयीं साहेब बहादुराची काळजी व मेहनत हीं फार स्तुत्यनीय आहेत. 'वऱ्हाड अथलेटिक असोसिएशन' ही त्यांच्याच परिश्रमाचें फळ होय. ह्या संस्थेची भरभराट दिवसेंदिवस जास्त होत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

यंदा कसरतींचे व शर्यतींचे खेळ उमरावती येथें झाले. कानफरंस आटोपल्यावर दुसरे दिवशीं ह्मणजे शुक्रवारीं सकाळीं ठरलेल्या प्रोग्राम प्रमाणें हायस्कुलांत मुलांच्या कसरती झाल्या. शिशाचा गोळा फेंकणें, हारिझांटल बार व पारालल बार्स वरील उड्या आणि मलखांबाची कसरत झाली. व दोन प्रहरीं क्रिकेटचा सामना झाला. नंतर दुसरे दिवशीं दोन प्रहरीं सर्व शर्यती झाल्या. लांब उडी मारणें, उंच उडी मारणें, पळण्याची शर्यत, रस्सी खेची, आणि कुस्त्या वगैरे कार्यें फार चांगलीं झालीं. उमरावतीच्या मुलांचीच बहुतेक सरशी झाली तरी आकोल्याच्या मुलांनीं मोठ्या नेटानें पुढील वर्षीं मुरेल कसरती दाखविण्याची उमेद धरावी. रा. रा. शिंपी देवभानकर आणि रा० रा. मोडक या दोघा शिक्षकांनीं ह्या समारंभाचे प्रसंगीं टेविलेली टापटीप चांगली होती. हे खेळ व कसरती पाहण्यासाठीं बहु जनसमाज जमला होता. लोकांची गर्दी फार मोठी होती. लोकांना व मुलांना ह्या शर्यतींच्या खेळांची फारच आवड व हौस वाटते यांत शंका नाहीं.

मध्यंतरीं थोडथोड बोथाटी व पट्टे खेळण्याचे हात झाले. सरते शेवटीं नंबरवारीनें मुलांस बक्षीसें देऊन मे. कँडी साहेबांनीं उत्तेजनपर दोन गोड शद्ब बोलून सर्व समारंभाची यथासांगता केली. आणि विडे, हार तुरे, गजरे, अत्तर गुलाब वगैरे प्रेक्षकजनांना अर्पण करून सर्वांस आनंदीत करून सोडलें.

## दुःखांत सुख

( रजश्री बॅटन जुडिशिअल अमिशनर यांस झालेला अपघात )

आह्मांत लिहिण्यास दुःख वाटतें कीं शनिवार तारीख २० रोजीं रात्रौ आमचे लोकप्रिय बॅटन साहेब जु० कमिशनर हे नित्यक्रमा प्रमाणें आपल्या क्लबांत जाऊन परत आले. त्यांचा नेहमींचा असा परिपाठ असे कीं, रात्रीं निजण्याचे वेळीं आपल्या बिछान्यावर उशीच्या खालीं ६ बारांनीं भरलेलें एक पिस्तुल ठेवावयाचें आणि मग निजावयाचें. त्याप्रमाणें त्यांनीं त्या रात्रीं आपलें पिस्तुल आंत बार भरून उशी खालीं ठेविलें आणि नंतर पलंगावर घातलेली मच्छरदाणीचे पदर बिछान्या खालीं दाबले होते ते ओढून खालीं सोडावयास लागले. ह्या मच्छरदानीचे कांहीं भाग पिस्तुलाच्या ट्रिगर मध्यें अडकला होता असें दिसतें, मच्छरदाणी ओढल्याबरोबर ट्रिगर ओढला गेला व त्याबरोबर गोळीनें भरलेला बार पिस्तुलांतून ( रिव्हालव्हर मधून ) उडाला. त्या बरोबर त्यांतील गोळी निघाली व ती साहेब बहादुरांच्या गुडघ्याच्या खालीं त्याच्या उजव्या पायांत शिरली ती तशीच मांडींतून वर जाऊन कंबरेच्या खालीं थोड्या अंतरावर बाहेर निघाली व डाव्या मांडीस लागून खालीं पडली. गोळी पायांत शिरल्यापासून बाहेर निघाली ती सुमारे दोन विती अंतरावर बाहेर पडली. आवाज झाल्या बरोबर साहेब बहादुरांच्या पत्नी जवळच दुसऱ्या पलंगावर होत्या त्यांच्या लक्षांत सर्व प्रकार आल्या बरोबर त्यांनीं उगीच आक्रोश न करितां साहेब बहादुरांस औपचारिक उपचार करण्यास सुरवात केली. पलंग पोसाचे कपडे फाडून त्याचे पट्टे केले व त्यांनीं साहेब बहादुरांच्या जखमा बांधल्या व त्यांस सावध केलें इतक्यांत तेथें सिव्हिल सर्जनहि येऊन दाखल झाले. साहेब बहादुरांच्या पत्नींनीं जखमा बांधण्याची, व रक्त वाहत होतें तें बंद करण्याची खटपट तात्कालिक केली नसती तर साहेब बहादुर ह्या अपघातांतून वांचले असते कीं नाहीं याबद्दल संशयच आहे. त्यांच्या पायाच्या जखमेंतून रक्ताचा फारच स्त्राव झाला व तशांतूनहि ते वांचले हा केवळ त्यांचा दुसरा जन्म झाला असें समजलें पाहिजे. कारण कीं, ह्यांतून ते निभावतील असा कोणासहि भरंवसा नव्हता. आतां कर्नल रो सिव्हिल सर्जन यांचे उपचार सुरू आहेत आणि कर्नल रो हे शस्त्रक्रियेंत फार निपुण आहेत अशाबद्दल त्यांची दूरवर कीर्ति आहे. साहेबांच्या जीवाला धोका नाहीं असें त्यांचें ह्मणणें आहे. व ह्मणूनच आह्मी हें दुःखांत सुख आहे असें ह्मणतों. साहेब बहादुरांची प्रकृती दिवसेंदिवस सुधारत चालली आहे. त्यांना अद्याप चांगलेंसें लिहितां येत नाहीं. परंतु गेल्या दोन तीन दिवसांत त्यांनीं कोर्टांतील कांहीं जरूरींच्या प्रकर्णांचा निकाल केला आहे व कांहीं फैसलेहि लिहिले आहेत.

पिस्तुलांतील गोळी पायांत शिरल्यापासून मांडींतून बाहेर पडे तों पर्यंत कशी कशी गेली व मांडीच्या आणि गुडघ्याच्या हाडांस कितपत इजा झाली आहे हें अद्याप समजलें नाहीं. हें समजण्याकरितां रांटजन रेज वगैरे अवश्य असणारीं साधनें आणणार आहेत व तीं आल्यावर काय तो खरा प्रकार कळेल.

साहेब बहादुर वयानें तरुण, शरीरानें सदृढ आणि मनानें धैर्यवान् असे आहेत व या त्रयीच्या अनुकूलतेमुळें ते लवकरच बरे होतील अशी फार उमेद आहे.

---

## रणसंग्राम

मनाचे कल कांहीं विलक्षण असतात. रशिया जपान बरोबर लढत आहे तर मनाला वाटों कीं जपानाला जय मिळावा. विद्युत्संदेश तशा जया संबंधानें वाचण्यांत आले ह्मणजे हर्षनिर्भरही वाटतो. जपान पूर्वेकडील राष्ट्र आहे. नांव घेण्यासारखें स्वतंत्र असें राष्ट्र तेवढेंच आहे. सांप्रत्यां जपानशीं इंडियाचा नैसर्गिकच स्नेहभाव आहे. तशांत जपानाचा बादशहा निकाडो याला इंग्लंडचा बादशहा समुद्रांत मागून पुढें ढकलत आहे. असें एका चित्रांत दाखविलें आहे. त्या चित्राचा गुढ अर्थ कांहींही असो, पण आह्मी इंडियन व राज्यकर्ते इंग्रज यांची मनीषा जपानाच्या विजयासंबंधानें एकच आहे. ट्रान्सव्हालच्या लढाईत मनाचे कल फार विरोधी होते. राजनिष्ठेमुळें वाटे कीं इंग्रज विजयी व्हावेत पण अहेतुक प्रेमामुळें वाटे कीं ट्रान्सव्हालाला जय मिळावा. पण तसा विरोध जपानासंबंधानें नाहीं ही गोष्ट विशेष होय.

सध्यां पोर्ट आर्थर हे लढाईचें मुख्य स्थळ आहे. त्या बंदरांत जाण्याचा मार्गच बंद करण्याचा विचार जपानानें फार बहादरीचा केला होता पण तो फसला ! नेहमीं बातम्या येतात त्या एकतर्फीच्या व फुगवून सांगितलेल्या असतात. बहुधा जपानाची सरशीच आहे परंतु रशिया हें राष्ट्र फार दांडगें आहे. सध्यां आरमारांच्या चकमकी होत असतात. विध्वंस करण्याची शक्ती अजमावण्याचे पराक्रम हल्लीं चालू आहेत. रशियाची तयारी कच्ची आहे पण रशियन लष्कर हत्ती एवढें असून जपानी लष्कर मुंगी एवढें क्षुद्र आहे. दुरून लढायांच्या बातम्या फार मनोहर वाटतात. कांहीं तरी प्रसंग चालू असला ह्मणजे ही हौस आपोआपच पुरली जाते. इंडियाला तरी लढायाच्या बातम्या पलिकडे कांहीं पाहिजे असें आह्मांस वाटत नाहीं. निर्बल, निःशस्त्र व निर्बळ अशा राष्ट्राला लढाईचें पुराण पुरें आहे.

---

## भोंदू

भोंदू ह्मणजे लुच्चा साधु. अशा गुलामाचा कावा किती तरी भोळ्या लोकांस फसवितो! मुक्तांच एक नकली साधु आपल्या कृतकर्मांचा झाडा देण्यास तुरुंगांत गेला. गोकूळदास नांवाचा हा उंच धीप्पाड मनुष्य होता. याला गेल्या मंगळवारीं येथील १ ले वर्गाचे माजिस्ट्रेट रा. रा. क्ले साहेब यांनीं १५ महिन्यांची कैद, २०० रुपये दंड अशी शिक्षा दिली, या कैदेंत दोन महिने अंधार कोठडीही मिळावी असा ठराव आहे. हा गोकूळदास आकोल्यास मोठा साधुबोवा ह्मणून तीन वर्षां पूर्वी प्रसिद्धीस आला होता. येथील एका जहागिरदाराच्या घरीं याला आश्रय मिळाला. बुवा चमत्कार करीत. प्रसाद ह्मणून पेढे बरफी काढीत. हा मनांतली गोष्ट बरोबर सांगत असे. त्याचें गुप्त पिशाच ह्मणजे ताराची बातमी उतरतांना जो कारबानचा काळा कागद खालीं ठेऊन दोन तीन प्रती तयार करितात तो कागद असे. बुवानें आपला पुष्टीपत्राचा कागद पुढें करावा, पृच्छकानें एका कागदावर आपला इष्ट प्रश्न लिहावा आणि आपला कागद स्वतांजवळच ठेवावा. इकडे पुष्टीपत्रांतील कागदावर त्या प्रश्नाची नक्कल झालेली असे. ही नक्कल ह्मणजे बुवाचें कर्ण पिशाच होय. त्या शिवाय बुवा फार चलाख, धोरणी व धूर्त आहे. त्याला पृच्छकाच्या चेहऱ्यावरून पुष्कळशा गोष्टी ताडता येत असत. हा बुवा स्त्रियांस पुत्रकामनेच्या सिद्धीचा मार्ग दाखवीत असे. असो, त्याचा लौकिक मोठा वाढला होता व भक्तमंडळही मोठेंच होतें.

त्या भक्तांपैकीं एका सोनाराजवळून बुवानें एक दुशी, एक ठुसी, एक मूद, व डोकींतील फुलें हीं मागविलीं. सुमारें दोनशे रुपयांचा हा माल होता. बुवाला कोणत्या पाह्मनी साठीं या वस्तु पाहिजे होत्या याचा बुवानें कोर्टापुढें ही नीटसा उलगडा केला नाहीं. दुसरे दिवशीं वजनभाव करून रुपये द्यावयाचा संकेत ठरला. बुवा रात्रींच आगगाडीनें परांगदा झाला. तीन वर्षेपर्यंत बुवाचा कोठें पत्ता लागला नाहीं. त्या सोनाराला बुवा दीड महिन्यापूर्वी बोरगांवास दृष्टीस पडला. सोनारानें आकाश पाताळ एक केलें तेव्हां बुवाच्या एका भक्तानें त्याला १०० रुपयांची प्रामिसरी नोट लिहून दिली; पण रुपये कांहीं पटेनात तेव्हां प्रकरण पोलिसांत जाऊन बुवावर खटला झाला. बुवा ह्मणे कीं त्या सोनाराला त्याच संध्याकाळीं तीन तोळ्याचे दोन छल्ले दिले आणि बाकीचे रुपये नागपुराहून पाठविणार होतो. पण पैशाच्या जम बसला नाहीं. बुवाला कांहीं भक्त साक्षी साठीं मिळाले पण ते कोर्टांत लटके पडले. आणि या रितीनें गोकूळदास हा ज्ञानमठांत पुरश्चरण करण्यास गेला आहे.

---

## टिळक प्रकरण

न्याय दरबाराच्या खटपटी देखील मोठ्या विलक्षण असतात. हल्लीं हायकोर्टापुढें अपील २४ वे तारखेपासून चालू आहे, बारिस्टर ब्रान्सन यांचें भस्तुतर आज पुनः चालणार आहे. राजश्री टिळक यांजवरील खोट्या जबानीचा मोकदमा अगदीं संक्षेपांत आला आहे. प्रश्न इतकाच आहे कीं तारीख २८ जून १९०१ रोजीं औरंगाबादेस जगन्नाथाला ओव्यांत दिल्याबद्दल आणि मुलगा ह्मणून घेतल्याबद्दल जा लेख झाला आहे त्यावेळीं मुलाला ताईमहाराजांच्या मांडावर बसविले आणि ताईमहाराजांनीं त्याला मांडोवर घेतला असें राजश्री टिळक यांचें ह्मणणें आहे. सरकार तर्फेचें ह्मणणें कीं राजश्री टिळक यांनीं हें खोटें सांगितलें आणि प्रत्यक्ष मांडीवर बसविण्याची क्रिया औरंगाबादेस घडलीच नाहीं. सरकार तर्फेचे आडव्होकेट जनरल आपल्या वादाचें प्रतिपादन करीत असतांना नामदार न्यायमुर्ती सर लॉरेन्स जेनकिन्स मध्येंच बोलले कीं मुख्य प्रश्न हा कीं मुलगा प्रत्यक्ष मांडीवर घेतला कीं नाहीं. जर तसें नसेल तर असें दिसतें कीं ताई महाराजांनीं मुलगा मांडीवर घेण्या पूर्वीच मुलगा घेतल्या विषयींचा उल्लेख असलेल्या कागदावर त्यांनीं सही केली; आणि असाही भावार्थ निघतो कीं टिळक कायदे पंडित असून व ताई महाराजांपेक्षां अधीक व्यवहारचतुर असून त्यांनीं दत्तविधानाच्या पूर्णतेला जरूर लागणारा प्रत्यक्ष विधी मुद्दाम वगळला आणि वीस वर्षां हूनही कमी अशा पोरवयाच्या ताईमहाराजांस जरी कायदा ठाऊक नव्हतां तरी त्यांनीं प्रत्यक्ष मांडीवर घेण्याची क्रिया मुद्दाम वगळली असें कोर्टांनीं खरें मानावें ह्मणून सरकार तर्फेचा आग्रह दिसतो.

नामदार चीफ जस्टिस यांच्या वरील उद्गारांत पुष्कळसा महत्वाचा अर्थ आहे ह्मणून आह्मी तेवढाच भाग इंग्रजींतून मराठींत उतरून घेतला आहे. हा उद्गार ह्मणजे भावी निकालाचा ध्वनितार्थच आह्मी समजतों.

---

## वऱ्हाडवृत्त

**सुटी**--- होलिकापूजनाच्या व रंगपंचमीच्या महोत्सवा निमित्त सालाबाद प्रमाणें तारीख ७ मार्चचा अंक निघणार नाहीं.

हवामान-साभ्र आकाश, सोसाट्याचा वारा, व विजांची चमक यांनीं पर्जन्याचा दुर्दिन येतो कीं काय असाही भास होई. हवा फार बिघडली होती. प्लेगाचा आजार येथें चालूच आहे. कधींकधीं ५।७ व कधीं १० असें मृत्यूंचें प्रमाण आहे. कालपासून हवा ऋतुमाना प्रमाणें पुनः सुधरूं लागली आहे. बाजारभाव मंदीचाच आहे.

रा. रा. विश्वनाथ मोहनीराज धर्माधिकारी डेप्युटी इनस्पेक्टर, इलिचपूर यांस दोन महिन्यांची हक्काची व ७ महिन्यांची फर्ली मिळून ९ महिन्यांची रजा देण्यांत आली आणि त्या रजेंत रा. रा. कृष्णाजी रामचंद्र काळे बी. ए. असि. मास्तर, हायस्कूल, उमरावती यांस अक्टींग डिप्युटी इनस्पेक्टर नेमण्यांत आलें.

लेफ. कर्नल म्यारेट सिव्हील आणि सेशन जज्ज यांस ६ महिने २१ दिवसांची रजा मिळाली.

त्या रजेंत रा. रा. एफ. डब्ल्यू . भीडो डिपुटी कमिशनर, वाशिम यांस सिव्हील आणि सेशन जज्ज नेमण्यांत आलें.

आणि मेजर हार्सबरो असि. कमि. इलिचपूर यांस वाशिमास डिपुटी कमिशनर नेमण्यांत आल्या प्रमाणें ते वाशिमास रुजू झाले.

नागपूरचे प्रसिद्ध वेदशास्त्र संपन्न रा. रा. विष्णू परशराम ऊर्फ बापूजी दातार यांस ६३ वे वर्षी मूत्रविकारानें देवाज्ञा झाली. यांच्या सारखा वेदमूर्ती विरळा! यावन्मरण विद्याव्यासंग चालू होता.

लाटसाहेब विचारितात "आपणास देगण्या नाहींत, स्कॉलरशिपा नाहींत, शिक्षक नाहींत, विद्यार्जनाकरितांच विद्यार्जन करण्याची हौस नाहीं, आपल्या बुद्धिरूपी वर्तिकेस छाटून नीट करण्यास आपण शिकलों नाहीं, पण ज्ञानज्योती कशी चेतवावी ते आपणास अद्यापि कळलें नाहीं असें कोणी ह्मणेल तर तें खरें आहे, पण तेवढ्यानें भिऊन जाऊन आपण स्वस्थ बसावें काय? आपण प्रारंभ कां करूं नये, अथवा आरंभ करण्याचा उद्योग कां करूं नये?" लाटसाहेबांचा हा प्रश्न अगदीं योग्य आहे, पण येवढी गर्जना केल्यानंतर त्या प्रयत्नाद्दलचें युनिव्हर्सिटी बिलाचें लहानसें पिलूं बाहेर यावें, ही सखेद आश्चर्याची गोष्ट आहे! वरिष्ठ शिक्षणासाठीं कोट्यवधी नाहीं तरी लक्षावधी रुपये खर्च करण्याबद्दल एक अक्षर जरी त्या बिलांत किंवा ते सादर करण्याचे वेळीं झालेल्या भाषणांत असतें, तर लाटसाहेबांचें वक्तृत्व फोल आहे असें कोणी ह्मटलें नसतें.

ना० प्रो० गोखले यांनीं ह्मटलें आहे कीं या बिलानें युनिव्हर्सिटी सरकारचें एक खातेंच होऊन बसेल. तिची अंतर्व्यवस्था युरोपियन फेलोंच्या हातीं सर्वस्वी राहील आणि नेटिव फेलोंच्या हातून सर्व सत्ता नाहींशी होऊन जाईल येवढा मात्र परिणाम होईल हें खास आहे. बाकीचे परिणाम होतील किंवा नाहींत याची शंकाच आहे. मुंबई इलाख्यापुरतें तरी असें ह्मणण्यास चिंता नाहीं कीं या बिलानें युनिव्हर्सिटी शिक्षणाची इयत्ता बिलकूल वाढणार नाहीं. नवीन कॉलेजें पसंत करणें किंवा जुनी बंद करणें सर्वस्वी सरकारच्या हातीं आहे हें त्यांस पसंत नाहीं, यामुळें सिनेटच्या एकमतानें ठरलेला ठरावही सरकारास धाब्यावर बसवितां येईल. कॉलेजाचें सामर्थ्य हळूं हळूं वाढत जातें. एकदम सर्व तयारी कशी होणार! इतक्या कडकपणें सर्व तयारी करण्याचा प्रारंभींच हट्ट धरिला असता तर मुंबई इलाख्यांतील लोकांचा व रांगलरजबड्यांचा आधार असतां फर्ग्युसन कॉलेजासारखें कॉलेज कधींही निर्माण झालें नसतें.

हल्लीं संकेश्वरपीठाधिष्ठित श्री० शंकराचार्य–पूर्वाश्रमींचे ब्रह्मनाळकर हरिदास संचारासाठीं कोंकणप्रांतीं गेले आहेत. श्रींनें शिखासूत्राचा त्याग केला, परंतु त्याबरोबर पूर्वाश्रमींच्या मायापाशांचा त्याग केलेला दिसत नाहीं. स्वारीबरोबर त्यांचें गोत कधीं घोड्यावर तर कधीं हत्तीवर मिरवत जात असतें. त्यांच्या कथेकरी वृत्तीचाही अंमल अद्यापि विसर पडला नाहीं. कारण आपल्या भाषणांत श्रृंगारादि रसांनीं व काटिकमांनीं शोभा आणण्यांत ते कमीपणा मानीत नाहींत, आणि मठाच्या परंपरेविरुद्ध उपदेश करण्यासही कमी करीत नाहींत असें आमचे महाडचे एक मित्र कळवितात. सु.

बायकांना कोणकोणत्या विषयांची साधारणतः माहिती पाहिजे याविषयीं एका संस्कृत श्लोकांत सांगितलें आहे:–

लेखनं वाचनं चैव गणितं व्याकरणं तथा।
सूपशास्त्रं शिल्पशास्त्रं बालसंगोपनं हि तत्॥
श्रीरक्षा गर्भरक्षा च भर्तृप्रेमविवर्द्धनम्॥

ज्ञा० प्र०

बडोद्यास गुप्त मंजूष खेळ करविला तेव्हां दहा वाजण्याच्या सुमारास श्रीमंत युवराज फत्तेसिंहराव, व त्यांच्या पत्नी श्रीमंत सौ. पद्मावतीसाहेब हीं दोघे बरोबर येऊन खालीं पुढील रांगेंत बसलीं. श्री. युवराज हे आपल्या कुटुंबास पडदा ठेवीत नाहींत. बायकांस पडदा नसावा हो सुधारणा अत्यंत आवश्यक आहे ह्याविषयीं कोणाचाच मतभेद नाहीं. पण पडदा काढणें ह्मणजे काल लग्न झालेल्या मुलीस युरोपियन पद्धतिप्रमाणें सर्व समाजांत वडील मंडळीपुढें मिरवित आणणें नव्हे. हल्लींच दक्षिणी ब्राह्मणांत व गुजराथी मंडळींत पडदा नाहीं. ह्मणून त्यांतील वीस वर्षांचा मुलगा व तेरा वर्षांची त्याची बायको समाजात कधीं मिरवित येत नाहींत. पडदा काढणें ह्मणजे पाश्चात्य पद्धत स्वीकारणें नव्हे. हिंदु कल्पनांप्रमाणें युवराजांची पत्नी आपल्या सासूबाईजवळच बसलेली ज्यास्त शोभली असती. वडीलमाणसें श्री. काकासाहेब वगैरे, वृद्ध सरदार, व मोठमोठे आफिसर्स ह्यांजपुढें तेरा वर्षांची मुलगी बायको ह्मणून मिरवित आणण्यानें मोठासा रमणीय देखावा दिसणारा नाहीं. स० वि०

जपानी बादशहाचें राजघराणें सर्वांत पुराणें आहे. जपानचें सिंहासन व राजमुकुट ख्रि. श पूर्वीं ६६६ च्या वर्षीं जपा बादशहास मिळालें होतें, तो जेव्ह–चाहनेझारचा समकालीन असून सूर्यपुत्र होत. यापासून आजतागाईत तें अव्याहत त्यांचे घराण्यांत चाललें आहे. जपानचा हल्लींचा मिकाडो या घराण्यांतील १२२ वा राजा आहे. ज. हि.

वाशीम अबकारीचा जिल्ह्याचा हरास मंगळवारीं झाला. वाशीम ४९२०० मंगरूळ ५७२०० व पुसद ३१००० बिडीनें व तिगतसालपेक्षां अंदाज १॥। पटीनें वाढले आहेत.

नागठाणे तालुके वाशीम येथील स्कूल मास्तरावर त्या गांवतील एका 'शिवाजी' नावाच्या गृहस्थाची क्रूद्ध मर्जी होऊन त्यानीं शाळेंत जाऊन मास्तरची चांगली पूजा केली. मास्तर मजकूरानीं या मारहाणीबद्दल येथील कोर्टांत फिर्याद केली. मुकदमा रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे फ. क्ला. मा. यांजकडे चालू होता. आरोपी गुन्हेगार आहे असें वाटल्यावरून त्यांस ३ महिन्याची सक्त कैद व १०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा सुनावली गेली. अलिकडे मास्तर लोकांचें वजन किती कमी झालें आहे हें प्रत्यहीं दिसून येतें. मास्तर ह्मणजे गुराखी असाच ग्रह खेडोपाडीं होत आहे त्याशिवाय अशीं कृत्यें घडून येत नसावींत. आमच्या जिल्ह्यापैकीं अशिक्षित लोकांनीं हें उदाहरण जरूर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

गेल्या जानेवारींत माचुरिया व आमूरांच्या ठिकाणीं मिळून १ लक्ष ४७ हजार ८७९ स्वार ३१ ९ अंमलदार व २६६ तोफा आणि १ लक्ष ६ हजार ८२९ शिपाई, २१०० अंमलदार व घोडेस्वार लष्कराच्या १४८ तुकड्या होत्या. त्यांत ६०३ अंमलदार व २१९१४ शिपाई आहेत. याशिवाय आणखी केसाकोलाच्या संरक्षणार्थ ८८ आणि सरहद्दीच्या संरक्षणार्थ ९९ तुकड्या आहेत. तोफखान्यांत ३६८ व्याटरी व २६६ तोफा आहेत. याप्रमाणें रशियाची लष्करी तयारी आहे.

जपानची मुख्य ठिकाणें सासेबो कागोशी व नागासाकी अशीं तीन आहेत. सासानपो २०० मैल, मोकपो २८० मैल व चेमलपो ५०० मैल आहे. कुमामोटो व हिराशिया हीं जपानची खुशकी लष्कराची मुख्य ठाणीं आहेत. फोरमोसा येथें असलेल्या लष्कराशिवाय वरील ठिकाणीं जपानचें लष्कर पुढील प्रमाणें आहे:– अमलदार ११७३९, शिपाई ३ लक्ष ८४ हजार १००, तोफा १११६; घोडे ८६४६० व, लढाईच्या प्रसंगी ६ लक्ष ३२ हजार वालंटीयर लढाईस तयार आहेत. रशियाजवळ लष्करी बारकसी ९ आहेत व जपान जवळ फक्त ६ आहेत. परंतु जपानी बारकसी जलद चालणाऱ्या असून त्यांत लढाईची पूर्ण सामुग्री भरलेली आहे. नाश करणारे क्रुझर जपानजवळ ६ व रशियाजवळ ५ आहेत. बचाव करणारी क्रुझरें रशियाजवळ ८ व जपानजवळ ६ आहेत पहिल्या वर्गाची लष्करी बारकसी जपानजवळ फक्त १८ आहेत व रशिया जवळ २२९ आहेत. टार्पिडोंचा नाश करणाऱ्या बोटी जपानजवळ १९ व रशियाजवळ ३१ आहेत.

हल्लीं तिबेट मिशन च्यूवा येथेंच असून चुंबी दरीकडेस रस्ते बांधण्याचें काम जारीनें चालूं आहे, व ग्यांटसी येथें जाण्याची तयारी होई पर्यंत तेथील मुक्काम हालणार नाहीं. तिबेटी लोकांचा तळ गुरु येथें असून त्यांस तेथें उगीच बसण्याचा कंटाळा आल्यासारखें दिसत आहे च्यूवा येथें अद्याप स्थिरस्थावर आहे. भुतानी प्रतानें एक गव्हरनर बरोबर १५० लोक घेऊन तिबेट मिशनचे भेटीस च्यूवा येथें जाण्यासाठीं फारी मुक्कामापर्यंत आले आहेत. इं. प्र.

साकरेचा गुण–साखर ही स्नायूंची शक्ति वाढविणारी अजब चीज आहे. त्यांना डोंगर चढणें, प्रवास करणें किंवा इतर अंगमेहनतीचीं कामें करावयाचीं असतील, त्यानें साखर फार खावी असें युरोपांतील डाक्टरांचें मत आहे. साखर न खाणाऱ्यापेक्षा साखर खाणाऱ्याचें काम विशेष होतें असें अनुभवास आलें आहे.

नवीन सरोवर–केवलाका नामक रशियन प्रांतांतील स्काव्हा नांवाच्या गांवाजवळ जमिनींतून पुष्कळ दिवस चमत्कारिक आवाज निघत असे. तोफांची सरबत्ती सुरू आहे असा भास होई तर कधीं बंदुकांच्या शिट्या वाजताहेत असें वाटे. असें होतां होतां जमिनींत भेगा पडूं लागल्या. थोडें पाणीहि दिसूं लागलें शेवटीं जमीन हळूं हळूं खालीं जाऊं लागली व पाणी वर येऊं लागलें. ते इतकें कीं काहीं वेळानें एक मोठें सरोवर तयार झालें. भूगर्भ–शास्त्रवेत्ते याचा शोध लावीत आहेत. स. शो.

मिस सारकीसोवा नांवाची एक रशियन लावण्यवती व प्रख्यात गाणारी स्त्री रशियन रेलवेमधून प्रवास करीत असतां आगगाडीच्या अपघातामुळें तिचे पांच दांत पडले त्यावरून त्या लावण्यवतीनें रेलवे कंपनीवर तीन लक्ष रुपये नुकसानीचा दावा मांडला होता. त्यांत बाईस दीड लक्ष रुपये नुकसान भरून मिळण्याबद्दल कोर्टानें हुकुमनामा दिला. सुदैवानें रेलवेच्या अपघातांत बाईचे पांचच दांत पडले ह्मणून ठीक झालें. नाहीं तर सर्व दांत पडले असते; तर बिचाऱ्या रेलवे कंपनीस किती तरी लक्ष रुपये भरावे लागले असते!

खाणी वगैरेचीं कामें शिकण्याकरतां जी पगारी विद्यार्थ्यांची नवीन पद्धत सुरू करण्यांत आली आहे ती फक्त नेटिवांकरतांच आहे असें नाहीं, असें समजतें! नेटिव या शब्दांत हिंदुस्थानांतच जन्मलेल्या युरोपियन लोकांचाही समावेश होणार आहे. यावरून त्यांचा हिंदुस्थानच्या लोकांस कितपत फायदा मिळेल हें दिसतेंच आहे. धा. वृ.

मद्रास येथील औद्योगिक प्रदर्शन झाल्यानंतर, मद्रासकर मंडळी स्वस्थ न बसतां त्यांनीं साबण, पितळ व अल्युमिनमची भांडीं हीं तयार करण्याचा कारखाना स्थापण्याचा प्रयत्न चालविण्याचें कळतें. यत्न स्तुत्य आहे.

इसवी सन १८६३ पासून १८८२ पर्यंत २३ वर्षांत सबंध हिंदुस्थानांत बी. ए. आणि एम. ए. मिळून ५००० पेक्षां जास्त झाले नाहींत; परंतु इ० स० १८९१।९२ पासून १९०१ पर्यंतच्या १० वर्षांत, ११७५ एम. ए. झाले आणि १०,५२३ बी. ए. झाले!

विद्या हुन्नर संबंधानें लागणाऱ्या नावांचा हिंदी भाषेंत एक शब्दकोश तयार करण्याचें काम बनारसच्या नागरी सभेनें आपल्या शिरावर घेतलें आहे.

कोल्हापूर दरबारांतील खासगी खात्याकडील व दरबारी खात्याकडील नोकर लोक सरकाराकडे सरदार प्रभृती यांच्या पाहुण्याकडून पैसा बक्षीस व सण घेतात हें प्रशस्त नाहीं. सबब यापुढें या प्रकारें कोणी नोकर काहीं घेईल तर त्याणें आपल्या वरिष्ठ अंमलदारास लेखी कळवावें.

१८९५ सालीं, चीन व जपान ह्या दोघांत जें एक आठ महिन्यांचें युद्ध झालें, त्यास आरंभ होऊन त्याचा शेवट १८९६ मध्यें शिमोनोसेकीच्या तहानें झाला. ह्या तहाच्या योगानें कोरिया देशास जपाननें चीनच्या स्वामित्वांतून मोकळें केलें व त्यास स्वातंत्र्य दिलें; व ह्याच लहानशा देशाचें पायीं रशिया व जपान ह्या दोन राष्ट्रांत लढा पडला आहे. कोरिया पीतसमुद्र व जपानचा समुद्र ह्या दोहोंच्यामध्यें आहे. हा देश सुपीक असून तेथील वनश्री फारच रमणीय आहे. कोरियाचा इतिहास फार जुना आहे असें ह्मणतात. तेथें नांव घेण्यासारखीं जुनीं देवालयें किंवा इमारती नाहींत. तेथील वाङ्मयही विशेष नांवाजण्यासारखें नाहीं. तीनशें वर्षें झालीं, कोरियन लोकांनीं आपला जुना बौद्ध धर्म झुगारून दिला व तेव्हांपासून त्यांचा अमुक एक धर्म आहे असें ह्मणतां येत नाहीं. ज्ञा० प्र०

*NOTIFICATION*

No. 5—B.— The following rules for the regulation of serais, meat and vegetable markets, slaughter—houses, and burial grounds within the limits of the Shegaon Municipality, made by the Municipal Committee under Sub—sections (1) (e), (1) (g), and (2) of Section 116 of the Berar Municipal Law, 1886, have been confirmed by the Chief Commissioner under Section 116 (3) of the said Law:—

Part I.— *Serais.*

1. Public serais under the management of the Municipal Committee may be used by *bona fide* travellers only.

2. No traveller shall be allowed to reside in a serai for more more than 72 hours continuously except by express permission from a responsible officer of the Municipality.

3. The Committee may temporarily close a serai to the public and may divert it to a temporary special use.

4. Any person who suffers from an infectious disease, or who misconducts himself, may be removed from a public seria by any responsible officer of the Municipality.

5. Every serai under municipal management will be supervised by the Chairman of the Sanitation Sub—Committee, who will primarily be responsible for its proper sanitation and up—keep and for the due observance of these rules.

6. The Committee may, at its discretion, reserve for the use of respectable travellers a room or rooms in any public serai under municipal management, and may charge fees for such reserved accommodation at the rate of four annas per room per diem.

Part II.—*Meat Markets*

1. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, from time to time, appoint a place or places to be used as meat market or meat markets.

2. A meat market may be used for exposing for sale the following articles only:—

(*a*) Animal flesh intended as human food.

(*b*) Fish, fresh or dried.

Nothing not intended for sale shall be admitted to the market.

3. Sites within a market will be allotted to vendors, within which they must keep their shops, and no chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee

4. A meat market may be open daily from 4 o'clock A. M. to 9 o'clock P. M., and shall be closed at the latter hour.

5. Lepers, beggars, and persons who misconduct themselves may be ejected from a meat market by any Municipal Officer or servant.

6. Any article exposed for sale pronounced by the Civil Surgeon, Akola, or by the Medical Officer in charge of the Charitable Dispensary, Shegaon, to be unfit for human consumption shall be seized, and may, under the direction of a Municipal Officer, be destroyed or otherwise disposed of.

7. Every meat market shall be under the management and supervision of the Municipal Officer appointed by the Municipal Committee for the purpose, and such person shall be primarily responsible for the sanitation of such markets and for the due observance within them of these rules.

Part III—*Vegetable Markets.*

1. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, appoint a place or places to be used as vegetable, fruit and flower market or markets.

2. The vegetable market shall be used only for exposing for sale the following articles:—

(*a*) Vegetables, fresh or dried.

(*b*) Fruits and roots, fresh or dried.

(*c*) Plantain and other leaves.

(*d*) Flowers.

Nothing not intended for sale shall be admitted to the market.

3. Sites within the market will be allotted to vendors, within which they must keep their shops, and no chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee.

4. A vegetable market may be open daily from 4 o'clock A. M. to 9 o'clock P. M., and shall be closed at the latter hour.

5. Lepers beggars, and persons who misconduct themselves may be ejected from a vegetable market by any Municipal Officer or servant,

6. Any article exposed for sale pronounced by the Civil Surgeon at Akola, or by the Medical Officer in charge of the local Charitable Dispensary, to be unfit for human consumption, shall be seized and may, under the direction of a Municipal Officer, be destroyed or otherwise disposed of.

7. Every vegetable market shall be under the management and supervision of the Municipal Officer appointed by the Municipal Committee for the purpose, and such person shall be primarily responsible for the sanitation of such markets and for the due observance within them of these rules.

Part IV—*Burial and Burning Grounds.*

1. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, from time to time, fix a site or sites for public burial and burning grounds.

2. Except by special permission of the Municipal Committee, no person shall bury or burn a human body elsewhere than in ground set apart for such purpose.

3. Every body buried must be completely covered with earth to a depth of not less than six feet from the surface of the ground or, if burnt, completely reduced to ashes.

4. The erection of a tomb or monument within the area of a public burning or burying ground is forbidden, except with the previous permission of the Municipal Committee.

5. Every burial and burning ground shall be under the management and supervision of the Municipal Officer appointed by the Municipal Committee for the purpose, and such person shall be primarily responsible for the sanitation of such burial and burning grounds and for the due observance within them of these rules.

Part V—*Slaughter—houses*

1. Every slaughter—house established at a place fixed by the Municipal Committee under Section 89 of the Berar Municipal Law, 1886, shall have an outer and inner yard, and shall be cleansed in accordance with such orders as may from time to time be issued by the Municipal Committee.

2. All cattle, sheep, and goats intended for sale for human consumption within municipal limits shall be brought to the outer yard of the slaugher—houses at the hours appointed by the Municipal Committee and presented for inspection.

3. An officer appointed or authorised by the Municipal Committee shall inspect every animal brought for slaughter, and shall reject any animal that may appear to him unfit for human consumption. Every animal so rejected shall be forth—with removed by the owner from the slaughter—house premises. Every animal passed by the Inspecting Officer shall be marked and removed to the inner yard of the slaughter—house for slaughter after payment, if the slaughter—house belongs to the Committee, of the prescribed fees; but no meat shall be sold or exposed for sale at the slaughter—house.

4. The slaughter—house shall be open every day during such hours as the Municipal Committee may from time to time fix; and if the slaughter—house belongs to the Committee, a person appointed or authorised by the Municipal Committee shall remain during these hours at the slaughter—house for the issue of receipts for fees, which shall be in form appended.

*Form referred to in Rule 4*

Received from ________ the sum of ________ ______, being fees for slaughtering ______, which has/have —— been passed by the Inspecting Officer as fit for human consumption.

*Secretary, Municipal Committee, Shegaon.*

Dated ________ 190

Part VI—*Penalties.*

Any person who infringes any of the rules specified in Parts I, II, III and IV of this Notification, or who in contravention of the rules specified in Part V of the Notification shall be found in possession within the inner yard of the slaughter—house of any animal which has not been duly passed and marked shall, on conviction before a Magistrate, be punishable with fine which may extend to fifty rupees.

2. The rules for the inspection and proper regulation of the slaughter—houses made under Section 116 (*i*) (*e*) and Section 116 (2) of the Law and published with *Hyderabad Residency Orders* Notification No. 234, dated the 11th July 1890, so far as they relate to the Shegaon Municipality are hereby cancelled.

B. ROBERTSON,
Chief Secretary to the
Chief Commissioner,
Central Provinces.

*Enclosure to*
No. 759 of 1903—04

The above Notification is published for the general information and guidance of the people.

Dated Shegaon 20th February 1904 } V. G. Deshmukha Secretary Shegaon Municipal Committee.

## नोटीस

मारोती वल्लद बनसीराव देशमुख व-स्ती मौजे घाट नांदरे तालुके मेहकर जिल्हा बुलढाणा यास:—

खालीं सही करणार याजकडून नोटी-स देण्यांत येतें कीं मी तुह्मास गहाण रकम रुपये ३०० चे लिहून देऊन माझे मालकीचें शेत तारण दिलें आहे. या गोष्टीस सुमारें ३-४ वर्षे झालीं. हल्लीं रकम देण्यास मी तुमचे घरीं आलों व व्याजसुद्धां रकम देत असतां तुह्मी घेतली नाहीं. सबब तुमचे या गहाणा बद्दल दामदुपट रकम रुपये ६०० जीवराज वल्लद हन्सराज मारवा-डी वस्ती मळसुर ता. बाळपुर यांचे पाशी जमा ठेविले आहेत. ते तुह्मी पावती देऊन न्यावे या पुढे मी तुमचे दस्त ऐवजाचे रकमेचे व्याजाचा जबाबदार राहणार नाहीं. ता-रीख २४।२।०४ इसवी.

सही
मारोती वल्लद कमळाजी
माळी वस्ती मळसुर
ता. बाळापूर दस्तुर
खुद्द

## नोटीस

बेशमी भीवराम मारवाडी राहणार रत-नपूरी जिल्हा आकोला तालुके बाळापूर पेठ शेगांव यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे मजळ पैकीं कापसाचा सौदा खंडी सातचा शेगांव भावचा त्याचा भाव रुपये ९६॥ खंडी प्रमाणें माझे पाशी तारीख ७।२।०४ रोजीं केला तो माल तुह्मास तारीख ९।२।०४ रोज मंगळवार रोजीं देण्याचा; कापसाचा नमुना तुमचे गाडीवर ठरला या प्रमाणें तारीख ८।२।०४ रोजीं तुमची गाडी व गडी माझ्यानें दुसऱ्याचा कापुस विकण्या करितां शेगांवीं नेली होती त्या दिवशीचा भाव मंदा होता हे आपल्यास आपल्या गड्यानें सांगितल्या वरून तुह्मी गाडी भरली नाहीं तर मी तुमचे घरीं रात्रीं पायऱ्या महारास घेऊन आलों होतो. तुह्मास विचारतां तुह्मी सांगितलें कीं माझी गाडी मोडली आहे. तुह्मी शेगांवीं चला, मीही येतो. जो मागल्या कापसाचा भाव होईल त्या प्रमाणें नफा तोटा एक मेकास देऊ घेऊ. त्या दिवशी ह्मणजे तारीख ९।२।०४ रोजीं मागल्या कापसाचा भाव शेगांव येथें दर खंडीस रुपये ९० पन्नास प्रमाणें होता तर दर खंडीस रुपये ६॥। पावणेसात प्रमाणें सात खंडीचे रुपये ४७। सव्वासेचा-ळीस ते रुपये आठ दिवसाचे आंत द्यावे. तसें तुह्मी न केल्यास कोर्ट मार्फत फिर्याद करून फिर्यादीचे व या नोटीसीचे खर्चासुद्धां तुह्मा पासून घेतले जातील. कळावे ही नोटीस दिली. तारीख २३।२।०४

सही
शीवलाल वल्लद राधाकृष्ण मार-
वाडी राहणार उरळ तालुके
बाळापूर जिल्हा आकोला
पेठ शेगांव.

ॐनमश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अभ्रक सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

ह्यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व धारण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर किंतीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ४६ आणे पडेल. अनुपान सर्व सांवत रोखीनें किंवा व्ही पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर: —

३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु०
११९ गो० ३ रु० १६९ गो० ४ रु०
२७१ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३ वर्षे आंवरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

## ORIENTAL GOVERNMENT SECURTY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du- under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policie matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the etp, do not delay. There ares numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Frospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*

---

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारावर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम ।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ·॥-




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो ।
ढुंढते फिरते हरेक जिस्म कदरदां है हम ॥

दांतावर जाळें जमणें, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतांनीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग वा पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

---

## मुंबई बँकचीं सेव्हिंग्स बँक

या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेवितां येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवितां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

---

## स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

जनरल मरचन्टस्

काळबा देवी पोस्ट
मुंबई.

---

## जाहिरात

## केडाबर खात्रीचें औषध

हटकून गुण डबीस २ रुपये.

व्ही. एम. जोशी

पोलिस टाऊन नजीक उमरावती

प्रांत वऱ्हाड.

---

वाचा ! वाचा ! !

( मौजच मौज. हसूंच हसूंच )

तुमचा वेळ आनंदात जावा अशी तुमची इच्छा आहे काय !

असल्यास खालील पुस्तकें एकवार वाचाच.

मोठमोठ्यांचे अभिप्राय मिळालेले आहेत.

### नवीन तयार झालेली पुस्तकें.

बंधुप्रेम अथवा सुंदरराव हंबीरराव,
किं० १॥ रु.

भगिनीप्रेम अथवा कामांध राजपुत्र.
किं० १ रु०

दोन्ही एकदम घेणारास २ रुपयांत मिळतील. व्ही. पी. ट. ख. माफ.

वासुदेव जनार्दन लेले
बुकसेलर-मिरज.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे 'वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.